कादंबरीसंग्रह ऐतिहासिक पुस्तकमाला नं० १३.

रावबाजी.

अथवा

महाराष्ट्राचें दुर्दैव !!

हें

ऐतिहासिक नाटक

अनंत नारायण भागवत

(माधवराज्यारोहण, वसईचा मोहरा, पृथ्वीराज आणि संयोगिता, पितृबंधमोचन भाग १ ला, सटवाई [डचुऐना], माधवनिधन. इत्यादि पुस्तकांचे कर्ते)

यांनीं लिहिलें

तें

पांडुरंग बळवंत देवल

यांनीं

पुणें येथें " श्री भागवत " छापखान्यांत छापिलें.

किंमत दहा आणे ..रकोर्दीत ..

रावबाजी नाटकांतील पात्रें.

श्रीमंत बाजीरावसाहेब. ....पेशवे.

त्रिंबकजी डेंगळे. ....त्यांचे कारभारी व मंत्री.

खुशरुजीशेट मोदी. ....रेसिडेन्सी वकील.

सदाशिव माणकेश्वर. ....पेशव्याकडील वकील.

गंगाधरशास्त्रीं पटवर्धन. ....गायकवाडांच्यातर्फे पुण्याच्या दरबारीं आलेला वकील.

बापूसाहेब मैराळ. ....पटवर्धनांचे नायब.

गोविंदराव गायकवाड. ....आनंदराव व फत्तेसिंग गायकवाडाचा आप्त.

भगवंतराव. ....गोविंदराव गायकवाडाचा दासी पुत्र.

(वरील दोघे) त्रिंबकजीचे हेर.

ताई. ....पुण्यांतील एक खटपटी बायको.

पार्वतीबाई. ....बापू मैराळाची बायको.

भीमा. दासी.

हुजरे, जासूद, पंढरपुरच्या देवळांतील भजनी मंडळी, मारेकरी वगैरे.

स्थळें.—पुणें, आणि पंढरपुर.

...रकोर्दीत

प्रस्तावना.

गोत्रजहत्या, ब्रह्महत्या आणि गोहत्या इत्यादि दुष्ट कृत्यें एके दिवशीं एके वेळीं करून पापाचा मोठा थोरला संचय केला आणि पेशव्यांच्या मसनदीवर बसून आपण एकट्यानें राज्यसूत्रें चालविण्याची प्रबल इच्छा कशी तरी पुरी करून घ्यावी ह्मणून " रावबाजीच्या " वडिलांनीं कांहीं दिवस धडपड चालविली असतां, त्यांच्या धांगडधिंग्यानें महाराष्ट्र राज्याची इमारत जी अगदीं खिळखिळी होऊन गेली होती आणि डळमळूं लागून अगदीं पडण्याच्या बेतांत आली होती, त्यावेळीं ज्या राज्यकारस्थानपटूंनीं आपल्या बुद्धिच्या जोरावर ती पंचवीस तीस वर्षें सांवरून धरली, त्यांपैकीं अग्रगणी आणि मराठी राज्याचा मुख्य आधारस्तंभ जे " यशवंत फडणीस नाना " ते इ० स० १८०० मध्यें कालाच्या भक्ष्यस्थानीं पडल्यानंतर, तिचा तो मुख्य आधार नाहींसा झाल्यामुळें ती जमिनीवर कोसळण्याच्या बेतांत आली, यांत नवल तें काय ? त्यांच्या निधनसमयीं जें कित्येकांनीं त्यावेळीं भाकित केलें होतें, तेंच पुढें अठरा वर्षांनीं खरें झालेलें सर्वांच्या अनुभवास आलें.

'सवाई माधवराव पेशव्यांची कारदीर्द त्यांच्या चुलत्याच्या कारकीर्दीपेक्षां देखील सवाई करून दाखवीन,' अशी मोठी उमेद धरून ज्यांनीं आपल्या आयुष्याचा बहुतेक शेवटचा भाग त्याच कामाकरितां जिवापाड मेहनत करण्यांत घालविला, परंतु ज्यांच्या मेहनतीचें चीज महाराष्ट्रवासी जनांच्या दुर्दैवानें 'सवाई माधवरावाच्या अकाली मृत्यूमुळें' झालें नाहीं, इतकेंच नव्हे तर ते त्या अपघाताच्या माराखालीं अगदीं दडपून गेले असतांही त्यांनीं आपलें ब्रीद, आपला अभिमान, आपली स्वराष्ट्रप्रीति इत्यादि गोष्टी आपल्या अखेरीपर्यंत सोडल्या नाहींत. "रावबाजीच्या" कारकीर्दींत त्यांनीं सर्व गोष्टी

त्यांना प्रतिकूळ असतांही स्वराष्ट्राच्या अभिमानाप्रीत्यर्थ आपल्या कर्तव्य-कर्मास जागून तें पूर्वीप्रमाणेंच मोठ्या उत्साहानें काम केलें.

नाना फडणवीस वारल्यानंतर चहूंकडे बजबजपुरी माजली आणि रावबाजीला व त्यांच्या खुषामती मंडळीला 'मनःपूतं समाचरेत' वागण्याला अगदीं मोकळें मैदान सांपडलें. त्यांच्या या स्वेच्छाचारी वर्तनाचा आणि दुष्कृत्यांचा परिणाम सर्व राष्ट्रास भोगावा लागला.

"एवढें मोठें राष्ट्र नाहींसें होण्याला एकटा रावबाजीच (ह्मणजे रावबाजी ही एक व्यक्ती) कारण झाला असें नाहीं, तर सभोंवतालची आणि स्वराष्ट्राचीच स्थिती त्यावेळीं बदलली होती;" असें कोणी ह्मणतील, पण "राजा कालस्य कारणं" या तत्वांत अगदींच अर्थ नाहीं असें नाहीं. ज्याच्यामुळें राष्ट्राची स्थिती बदलते व जो अपरोक्ष आणि परोक्ष रीतिनें ती स्थिती बदलण्यास कारण होतो, त्याच्याच माथ्यावर अपयशाचा बहुतेक भाग आहे, ही गोष्ट कोणी नाकबूल करील असें वाटत नाहीं. चांगल्या मनुष्याला जशीं चांगलीं मनुष्यें मिळतात, तशींच वाईटाला वाईट मिळतात, हा सर्व साधारण सिद्धांत आहे. तोंच प्रकार रावबाजीचा झाला.

रावबाजीच्या जनकांनीं ब्रह्महत्या करून जसें आपलें नांव अजरामर करून ठेवलें, तसेंच रावबाजीनींही एक ब्रह्महत्या करून आपण त्यांचे खरे पुत्र आहोंत असें सर्व जगास दाखविलें; आणि ती देखील पंढरपुरासारख्या महाक्षेत्रांत, आणि प्रत्यक्ष विठोबाला साक्षी ठेवून ! या कृत्यांत यमधर्माला दुसरा चांगला साक्षी, त्यांच्या दुष्ट कृत्याच्या पुराव्याकरितां आणण्याची त्यांनीं भानगडच ठेविली नाहीं !!

जीं कारणें पुढें पेशवाई बुडण्याला साधनीभूत झालीं, तीं मुख्य आधार धरून त्यावर हें नाटक लिहिलें आहे, नाटकाचा काल इ० स० १८१५ च्या जुलई महिन्यांत गंगाधर शास्त्र्याला मारण्याच्या पूर्वीचा कांहीं महिने आहे. गंगाधर शास्त्र्याच्या मृत्यूमुळें पुढें प्रकरण पेटत चाललें, तें पुढें २।३ वर्षें

पेटत पेटत जाऊन अखेरीस स्वराष्ट्राची होळी झाली. " गंगाधर शास्त्री यांचा मृत्यू " येथें हें नाटक संपविलें आहे, कारण पुढें सांगण्याची कांहीं जरूर राहिलीच नाहीं.

एकदां ठेंच लागली ह्मणजे आपण जसें जपून पाऊल टाकतों, किंवा एकदां विषारी सर्पानें आपल्याला दंश केला ह्मणजे त्याच्या वेदनांचा आपल्याला अनुभव असल्यामुळें आपण त्याविषयीं जसें जास्त सावधपणानें वागतो, तसें आपण पुनः प्रसंग आला असतां सावधपणानें वागूं लागलों, किंवा मागच्या अनुभवाचें आपल्याला यामुळें वेळींच स्मरण झालें तर फार चांगलें होईल, एवढ्या उद्देशानें मीं हें नाटक लिहिलें आहे. बाकी " रावबाजी " वर नाटक किंवा दुसरा एखादा ग्रंथ लिहून त्याच्या दोषाचें आविष्करण करणें, ह्मणजे आपली मांडी आपणच उघडी करून दाखविण्यासारखें आहे.

नाटकांतील संविधानक बहुतेक खरें आहे. त्याला आधार बखरी, ऐतिहासिक गोष्टी, दंतकथा व पुणें आणि बडोदा ग्याझिटिअर्स हीं आहेत. नाटकांतील बहुतेक पात्रें ऐतिहासिक आहेत. ताई, भीमा, पार्वतीबाई आणि नारोबा हीं पात्रें काल्पनिक आहेत. ताईविषयींची दंतकथा पुण्यांत प्रसिद्ध आहे. तिसऱ्या अंकाच्या शेवटच्या प्रवेशांत बाजीरावाची जी स्थिती दाखविली आहे, तीबद्दल पुण्याची अंबराई प्रत्यक्ष साक्ष देत आहे. खुशरुजीशेट मोदी याच्या मृत्यूचें खरें कारण त्याला विषप्रयोग झाला असावा, असा इंग्लिश ग्रंथकारांचा दृढ समज आहे. गंगाधर शास्त्र्याच्या मृत्यूची खरी खटपट ज्या दरबारचा तो वकील होता, त्याच दरबारच्या त्याच्या पूर्वीच्या वैऱ्यांच्या हातून झाली आहे. बाजीराव आणि त्रिंबकजी हे पुढें नांवाला कारण झालें. आतां एवढें खरें कीं, ती कामगिरी त्यांनीं होऊन बजावली.

त्रिंबकजीचें कारस्थान; ताईचा निर्लज्जपणा आणि त्याचा भयंकर परिणाम; बापू मैराळाचा स्वाभिमान आणि उदात्त विचार; पार्वतीबाईचा भोळसरपणा पण जाज्वल तेज; दोन्ही डगरीवर हात ठेवल्यामुळें मोदी शेटची

दोन्हीकडून झालेली हानि; बाजीरावाचा मूर्खपणा, धरसोडपणा आणि नीचपणा; वगैरे गोष्टी यांत यथामति दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

एकंदर बाजीरावाची सर्व कारकीर्द लक्षपूर्वक पहातां रावबाजीसारखा राजा गादीवर येणें ह्मणजे महाराष्ट्राचें दुर्दैवच खरोखर उदयाला आलें असें-च ह्मणावें लागतें!

सरतेशेवटीं हें ऐतिहासिक नाटक, (कादंबरीसंग्रह ऐतिहासिकपुस्तक-मालेपैकीं तेरावें पुष्प) ज्या संग्रहाच्या आश्रयदात्यांच्या आश्रयावर प्रसिद्ध झालें, त्यांचें आभार मानून व पुढें असाच आश्रयाचा लाभ मिळण्याबद्दलची उमेद बाळगून, ही लांबलेली प्रस्तावना पुरी करतो.

आपला नम्र,

पुणें ता० ३० आगष्ट १९०१.

अनंत नारायण भागवत
ग्रंथकर्ता.

रावबाजी.

अथवा

महाराष्ट्राचें दुर्दैव.

अंक १ ला.

प्रवेश पहिला.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील त्रिंबकजीचा दिवाणखाना.

पात्रें—त्रिंबकजी आपल्याशीं विचार करीत बसला आहे.

त्रिंबकजी—(आपल्याशीं) या सदोबा माणकेश्वर हरदासबोवाचें आणि त्या टोपीवाल्याकडील वकील खुशरूजी पारसुटल्याचें इतकें मेतकूट जमेल असें श्रीमंताना व मला कधींच वाटलें नव्हतें! गायकवाडाकडे असलेल्या अमदाबादच्या मामल्यामुळें तर ते दोघेजण अगदीं एक झाल्यासारखें झालें आहेत. त्या मामल्यासंबंधानें टोपीवाले मध्यस्थी पडून त्यांच्या वशिल्यानें, आणि त्यांच्या हिमायतीवर पटवर्धन शास्त्री श्रीमंताच्या दरबारीं येऊन प्रत्यक्ष श्रीमंताना ह्मणजे शास्त्र्याच्या मालकाच्या मालकास लांब लांब, आणि मोठ्या आढ्यतेच्या गोष्टी सांगूं लागला आहे! याच पुणें शहरांत फडक्यांच्या घरीं पुराण सांगणाऱ्या आणि सर्व जगास मूर्ख ह्मणणाऱ्या या शहाण्या शास्त्र्यानें भर दरबारांत श्रीमंतांशीं बोलताना आपण कोणाशीं बोलत आहोंत याचा विचार करावयाचा होता. पण तो या वेळीं त्याला सूचणार नाहीं. कारण आपण गायकवाडाचे दिवाण, आपल्याला टोपीवाल्याचें उत्तम सहाय्य आहे, शिवाय आपण सरकारी कामाकरितां वकील ह्मणून त्यांच्या

मार्फत आलों आहोंत, तेव्हां आपण कोणाला कांहीं बोललों तरी चालेल अस त्याला वाटत आहे. अरे शास्त्र्या, प्रत्यक्ष तुझे यजमान इकडे तिकडे भटक्या मारूं लागले ह्मणजे मग तूं त्यांचा दिवाण कोणीकडे जाशील व तुझी गती काय होईल ? (विचार केल्याप्रारखें करून) अमदाबादच्या मामल्याचें कारण उपस्थित झालें हें एकपरी बरेंच झालें ह्मणायचें ! यामुळें कांहीं कारस्थानें बाहेर पडलीं, व आणखीही पडण्याचा संभव आहे. हा सदोबा आणि तो पारसुटला मोदी आंतून एक असल्यामुळें इकडची तिकडे व तिकडची इकडे खरी खबर मुळींच कळत नसे. आंतून या दोघांचें चांगलें सूत आहे, हें आतां शास्त्री येथें आल्यामुळें अनायासेंच बाहेर आलें. त्यायोगानें गायकवाडाच्या गादीबद्दल खटपट करणारा खुळा गोविंदराव गायकवाड, गुजराथेंत आपल्याला मोठी जहागीर मिळावी, किंवा आपलाही गादीवर वारसा आहे ह्मणून हक्क सांगणारा गोविंदराव गायकवाडाचा दासीपुत्र वेडापीर भगवंतराव, पटवर्धन शास्त्र्याला व त्याच्या ओंजळीनें पाणी पिणाऱ्या फत्तेसिंगाला हुसकून देऊन पूर्वीची आपली दिवाणगिरी मिळवूं पहाणारा मूर्ख सितारामपंत माजी दिवाण वगैरे, गायकवाडींतील वेडीं खुळें आमच्या तडाक्यांत या शिवाय कधींच सांपडलीं नसतीं; आपणच आपल्या पायानें चालत आलेल्या या गर्दभराजांवर आपलें काम होईपर्यंत हवीं तितकीं ओझीं लादायला व यांच्याकडून वाटेल तें काम करून घ्यायला आतां कांहीं हरकत नाहीं. तीं आतां त्यांचे कान धरून जशीं वळवावीं तशीं खास वळतील. आपल्या जातीवर जाऊन कदाचित् ओरडूं लागलीं तर पाठींत दोन बडगे खुशाल लगवायला देखील अडचण नाहीं. काम झाल्यावर खुशाल हांकलून देतां येतील. अरे लुच्चा सदोबा, श्रीमंताचें आजपर्यंत अन्न खाऊन त्यांच्याशीं बेइमानी करून त्या टोपीवाल्याकडच्या पारसुटल्या वकिलास मिळालास व आपली तुंबडी भरलीस अंः ! बरें आहे ह्मणावें. या दोघांचा भेद केल्याशिवाय दोघांचीं वर्मे कर्मे समजणार नाहींत. कर्नाटकच्या सरसुभेदारीच्या जागेचें आमिष दोघांच्याही तोंडाला लावलें आहे, तेव्हां तेच दोघांच्या वैमनस्याला चांगलें सबळ कारण आहे. हेंच उद्यांच्या बसंतपंचमीच्या दरबारांत

घडवून आणिलें कीं एक मार्ग मोकळा झाला. मग पुढें पटवर्धन शास्त्री, व आडून तीर मारणारा त्याचा मुतालीक बाप्या मैराळ, हीं दोन गायकवाडीतलीं खुळीं, आणि तें सितारामपंत माजी दिवाण याचे काय करायचे तें हलकें हलकें पुढें पाहूं. या कामांत कोणाचें नुकसान होवो, अगर नफा होवो; कोणी भाग्यास चढो, अथवा पडो; कोणाचा घात होवो अगर कोणाचें काय वाटेल तें होवो; मला तें श्रीमंतांच्या मर्जीकरितां केलें पाहिजे व मी तें करणार. त्यांच्या मर्जीशिवाय मी कशाचींच पर्वा करीत नाहीं. कारण सुमारें बारा वर्षांपूर्वी मी या पुण्यांत जासूद होतो व पोटाकरितां मला चारी दिशेला धांवावें लागत होतें. तो मी, आज वैभवाच्या उंच शिखरावर बसून सर्व प्रकारचें सौख्य भोगीत आहे व त्यांचा मुख्य मसलतगार झालों आहे. हें सर्व त्यांच्या कृपेचें फळ. तेव्हां त्यांची मर्जी राजी राखण्याकरितां वाटेल तें कृत्य करायला मला तयार असलेंच पाहिजे. बरें, त्या सदोबामध्यें आणि त्या पारसुटल्यामध्यें बऱ्याच दिवसापूर्वी लावून दिलेल्या ठिणगीनें आपला प्रभाव कितपत केला आहे तो मला पहिल्यानें पाहिला पाहिजे. ती जर धुमसत असली तर मला तिला फुंकर घातला पाहिजे. वेळप्रसंगीं तिच्यावर मला तेलाचा थेंबही सोडिला पाहिजे. बरें, कदाचित् ती विझून गेली असली तर मला ती पुनः पेटविली पाहिजे; ह्मणजे ती आपला प्रभाव दाखविल्याखेरीज कधीं रहाणार नाहीं. पण तो होनाजी कां बरें आला नाहीं. इतक्यांत यावा. विठ्या अरे विठ्या—

(विठ्या हुजऱ्या येतो.)

विठ्या—जी धनीसाहेब.

त्रिंबकजी—विठ्या, बेटांतून होनाजी अद्याप कां आला नाहीं, तें जरा कोतवालचावडीपर्यंत जाऊन पाहून ये पाहूं. त्याला जाऊन फार वेळ झाला आहे.

विठ्या—जी धनीसाहेब. हा आतां धांवतच जातो. (तो जातो.)

त्रिंबकजी—भगवंतरावाला होनाजी ह्मणून त्या पारशाच्या नोकरींत ठेवल्यामुळें, आणि गोविंदरावाला गुणाजी ह्मणून पटवर्धन शास्त्र्याच्या हुजऱ्यां-

त राहण्यास सांपडल्यामुळें दोहोंकडची अगदीं बातमी रोजच्यारोज समजण्याला आतां मुळींच हरकत पडत नाहीं. तो सर्वज्ञ ह्मणविणारा, पुण्यांतील सर्व दरबारच्या मंडळीस मूर्ख ह्मणणारा, गर्विष्ठ, डौली, आणि स्तुतिप्रिय पटवर्धन शास्त्री केव्हांच आमच्याकडे वळला असता, पण तें बाप्या मैराळ त्याचा मुतालीक भोंकणारें कुत्रें त्याच्याजवळ नेहमीं असल्यामुळें आमच्या मसलतीची पुष्कळदां घाण होते. त्या गुलामाच्या गळ्याला मला चांगला भक्कम साखळदंड बांधून त्याला पिंजऱ्यांत तरी टाकला पाहिजे किंवा त्याचें भोंकणें अजिबात बंद होण्याची तजवीज तरी केली पाहिजे. नाहीं तर तें ओरडून सर्वांना जागें करील.

(पडद्यांत.)

विठ्या—होनाजीराव चला चला लवकर ! धनीसाहेब तुमची केव्हांची वाट पाहत आहेत. चला एकदम आंत चला. वर्दी बिर्दी कशाला पाहिजे. (दोघे पुढें होऊन) धनीसाहेब, हे पहा होनाजीराव, मी चावडीच्या जरा पुढें जातों तों मला हे तिकडून दिसले. तसेंच घेऊन आलों.

त्रिंबकजी—ठीक केलेंस ! बरें, तूं खालच्या दरवाजाशीं बैस. राबता बंद. कोणाला सध्यां वरती येऊं देऊं नकोस.

विठ्या—जी हुकूम. (जातो.)

त्रिंबकजी—(तो गेलासें पाहून) या होनाजीराव, होनाजी हें टोपण नांव आतां आपण एकटें असतांना कशाला पाहिजे. या भगवंतराव, या असे गादीवर बसाहो, लांब कां ? मी तुह्माला होनाजी ह्मणून हांक मारणें आणि तुह्मीं त्याप्रमाणें वागणें, हें सर्व शिष्टाचार बाहेर लोकांना दाखविण्यापुरतें मात्र करावे लागतात. तुमच्या मोठेपणाला व कुळाला तें बरें दिसत नाहींत. पण करणार काय ? वेळप्रसंगीं मोठ्याला सुद्धां आपल्या कामाकरितां प्रत्यक्ष आपल्या चाकराचे देखील चाकर व्हावें लागतें ! !

भगवंत—त्यांत काय आहे ? जे सोंग घेतलें असेल त्याची बतावणी अगदीं हुबेहुब झालीच पाहिजे.

त्रिंबक—मोठ्या कुळांतील माणसाच्या अंगीं सुज्ञपणा जन्मतःच असतो.

त्याचप्रमाणें आपलें वर्तन आहे. बरें तें असो. तुमचें काम कितपत वठत चाललें आहे, बरेंच चांगलें रंगाला आलें कीं नाहीं ?

भगवंतराव—त्याविषयीं आपल्याला मुळींच काळजी नको. पूर्वी जितके ते दोघे मित्र होते, तितके ते आतां एकमेकांचे हाडवैरी बनत चालले आहेत. थोडक्याच दिवसांत ते एकमेकांचे गळे कापायला तयार होतील. " सदाशिवराव माणकेश्वराच्या व शास्त्र्याच्या पुष्कळ गुप्त भेटी होत असतात. तुमच्याबद्दल नालस्ती तो शास्त्र्याजवळच करून राहिला नाहीं तर, त्याच्याकडून बडोद्याच्या रेसिडेन्टास लिहवून त्याच्या मार्फत अलपिष्टन साहेबाचेंही मन त्यानें वाईट करून टाकलें आहे. तुम्हाला कर्नाटकची सरसुभायत देण्याचें श्रीमंतांच्या मनांतून फार आहे, पण हा तुमचा स्नेहीच तुम्हाला मध्यें आड येतो. शिवाय जेव्हां जेव्हां साहेबाच्या भेटीस जातो तेव्हां तेव्हां तो तुमच्या विरुद्ध साहेबास अनेक प्रकारच्या वाईट गोष्टी सांगतो; साहेबाची तुमच्यावर आतांशा नाराजी होण्याला दुसरा कोणी कारण नसून तुमचा मित्रच सर्व प्रकारें कारण आहे, " अशा अनेक तऱ्हेच्या तुम्ही सांगितलेल्या व पदरच्या कांहीं लाविलेल्या गोष्टी मी मोदी शेटजीस वेळ प्रसंग पाहून सांगितल्यानें त्यां दोघांमध्यें पिळदार तेढे इतके पडत चालले आहेत कीं, ते तरवारीच्या घावाशिवाय या जन्मांत कधीं सुटावयाचे नाहींत !

त्रिंबक—वा, शाबास ! शहाण्या माणसाची बलाय दूर. ज्या कामांत पडावें त्यांत मनुष्यानें आपली स्वतांची कांहीं तरी अक्कल खर्च केली पाहिजे; आणि ती केली तरच हातीं धरलेल्या कामांत यश येण्याची कांहीं तरी आशा. नाहीं तर पाठीवरून गोण्या वाहून टाकणाऱ्या बैलाप्रमाणें एखाद्या सांगकाम्या मनुष्याशीं गांठ पडली ह्मणजे मग तेथें काय करणार ! तुम्ही आपली कामगिरी चांगली रंगारूपाला आणिलींत.

भगवंत—आतां आपण एक महत्वाची गोष्ट अशा वेळेला केलीत कीं मग दोघांचे मुडदे त्यांच्याच हातानें पडून रक्ताचे पाट वाहिलेले पहाण्याची वेळ सुदैवानें चार सहा महिन्यांत आलीच असे समजा. यापेक्षां आणखी तुम्हाला आपल्या कामाची फत्ते कशी पाहिजे ती सांगा !

त्रिंबकजी—कोणची कोणची बरें ती! श्रीमंताच्या मर्जीप्रमाणें जर सर्व होत आहे तर तें करण्यास माझ्याकडून मुळींच उशीर नाहीं. माझ्या हातून होण्यासारखें असेल तर तें मी तावडतोब करीनच, पण जर तें माझ्या हातचें नसलें तरी मी तें हरप्रयत्नानें केल्याशिवाय कधीं राहणार नाहीं.

भगवंत—दुसरें कांहीं नाहीं, श्रीमंताकडून कर्नाटकची सरसुभेदारी त्या मोद्यास कसेंही करून लवकर देववा. अहो फारा दिवसाकरितां नको पण चार सहा महिन्याकरितां तरी देववाच. ती त्याला देवविली कीं याचें माथें फिरलेंच. मग ते दोघे एकमेकांचीं डोकीं फोडण्यास हरप्रयत्न करतील. कोणाला काय, आपण दिलेली वस्तु वाटेल तेव्हां आपल्याला परत घेतां येते.

त्रिंबकजी—त्या सरसुभेदारीकरितां तो सदाशिव माणकेश्वर श्रीमंताच्या एकसारखा पाठीस लागला आहे, व त्याला ती देण्याचें श्रीमंतांनीं कबूलही केलें आहे. त्यांतून पाहीन खटपट करून.

भगवंतराव—पाहीन असा नुसता आशिर्वाद नको. श्रीमंताजवळ तुह्मी आपली कशींही भीड खरचून ती त्याला देववाच. तुमचें सांगणें श्रीमंत कधीं-ही मोडणार नाहींत.

त्रिंबक—असें आपलें सर्वांना वाटतें एवढेंच! बाकी खरा प्रकार निराळाच आहे. तो तुह्माला किंवा लोकांना तरी सांगून काय उपयोग.

भगवंत—सदाशिव माणकेश्वर त्या सुभेदारीकरितां खटपट करीत असून, त्याला ती श्रीमंतांनीं कबूल केली असताही त्याच्या हाडवैऱ्यास मिळालेली पाहून, त्याच्या अंगाचा संतापानें आणि मत्सरानें भडका झाल्याशिवाय कधीं राहणार नाहीं. दोघे मग एकमेकाला अगदीं पाण्यांत पाहूं लागतील, आणि आपलें काम अनायासेंच होईल. एवढ्याकरितां मोदीशेट आपल्या भेटीस रात्रीं येणार आहेत. मी आपलें हें त्यांच्या मनांतील इंगित युक्तीनें काढून घेतलें.

त्रिंबकजी—काय, शेटजी माझ्या भेटीस येणार! एवढी तसदी शेटजी कशाला घेतात.

भगवंत—ते आपणहूनच तयार झाले आहेत. त्याबद्दल त्यांना तसदी मुळींच वाटत नाहीं.

त्रिंबक—बरें तर त्यांना रात्रींच घेऊन या. तुमच्याशिवाय बरोबर दुसरें कोणी नसेल अशी तजवीज ठेवा, ह्मणजे झालें. उगीच या गोष्टीचा बोभाटा कशाला. गुपचिप कोणच्या रस्त्यानें यावयाचें व कोणत्या ठिकाणीं अशा कामाकरितां भेटावयाचें हें तुह्माला सांगावयला नकोच.

भगवंत—त्यांत माझ्याकडून चूक व्हावयाची नाहीं. रात्रीपर्यंत आपण श्रीमंतास भेटून याबद्दल नक्की ठरवून ठेवा व उद्यांच्या दरबारांत द्या बार उडवून! ह्मणजे तुमचे वकीलसाहेब हें असें कसें झालें याबद्दल आश्चर्य करीत राहतील.

त्रिंबक—मी तें फार करून जुळवून आणतोंच!

भगवंत—बरें तर येतों मी!

त्रिंबक—ठीक आहे. मी नेमलेल्यावेळीं आपली वाट पहात बसतों.

भगवंत—हो, त्रिंबकजी, आणखी एक तुह्माला विचारायचें होतें.

त्रिंबक—खुशाल विचारा. जसा मी श्रीमंताचा दास आहे तसाच आपलाही आहे. आपण कामगिरी सांगावी आणि ती या त्रिंबकजीनें बजवावी. याखेरीज माझी कांहींच इच्छा नाहीं.

भगवंत—दुसरें कांहीं नाहीं. थोडेसें खर्चायला पाहिजे आहे. आमच्या वेषामुळें आमच्याजवळ असलेलें आह्माला बाहेर काढतां येत नाहीं. आणि खर्चाची तर तंगाई आहे, तेव्हां—

त्रिंबक—त्याची आपण इतकी फिकीर कशाला करितां. गायकवाडींतल्या राजपुरुषाला श्रीमंतांकडे मागण्याचा हक्क आहेच; आणि त्यांच्याजवळ जें कांहीं असेल नसेल त्याचें नीट रक्षण करणें हें श्रीमंताचें व आमच्या सारख्या आज्ञाधारक चाकराचें कर्तव्यकर्मच आहे. कुठें आहे तें? सुरक्षीत स्थळीं असेल तर तें तेथेंच राहूं द्या. नसेलें तर हें घर तुमचेंच आहे, तुमची ठेव तुमच्याच घरीं आहे असें समजा. सध्यां हें घ्या खर्चायला. (त्याला थोड्याशा पुतळ्या देतो.) आजच्या करितां एवढें पुरेलना? उद्यां आणखी घेऊन जा. पण सांगितलेलें मात्र ध्यानांत असूं द्या. बरें पण बडोद्याकडील कशी काय खबरबात आहे.

भगवंत—गोविंदरावची व माझी बऱ्याच दिवसांत भेट झाली नाहीं. उद्यां परवा मी त्यांची भेट घेऊन सर्व हकीकत आपणास कळवीन. साधल्यास त्यांनाच इकडे घेऊन येईन.

त्रिंबक—फारच उत्तम! हो तुह्माला जशी अडचण आहे तशीच त्यांनाही असेल, करितां हें आणखी घेऊन जा. (आणखी त्याला पुतळ्या देतो.)

भगवंत—(पुतळ्या घेऊन व उठून) त्रिंबकजी—त्रिंबकजी—तुह्मी केलेलें सहाय्य—आह्मी—

त्रिंबक—याचेंच तर मला वाईट वाटतें. माझें आतां किती गौरव कराल. पुरें झालें. आपण सर्व एकच आहोंत. (भगवंतराव जातो) (आपल्याशीं) एकाच नादीं भरली ह्मणजे सर्वस्व गमवणारी ही अशीच मंडळी आह्माला पाहिजेत. आजच्या याच्या बोलण्यावरून गायकवाडींतलें बरेंचसें नामांकित जवाहीर आपल्या घरीं आयतेंच आज नाहीं उद्यां चालून येणार असा रंग दिसतो. चालून आलेल्या लक्ष्मीला पाठ देणारा मनुष्य अस्सल मूर्खांतला मूर्खच असला पाहिजे. आतां भगवंतरावानें सांगितल्याप्रमाणें श्रीमंताकडे जाऊन कर्नाटकची सरसुभेदारी त्या मोद्याला उद्यांच्या दरबारांत देण्याबद्दल सांगून ठेवलें पाहिजे. आज त्याला दिली तरी उद्यां ती त्याच्याकडून हिसकावून घ्यायला किती वेळ लागतो. (जातो.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—मस्तानी महाल.

पात्रें—ताई येते.

ताई—(आपल्याशीं) मागच्या सुखदुःखाचा, त्यांतून दुःखाचा तर विचार कधींच करूं नये. तो केला कीं पुढच्या सुखांत विरजण पडलेंच. पण एखादें वेळीं मागची आठवण झाली, आणि त्या वेळच्या माझ्या गरिबी स्थितीची आणि आतांच्या स्थितीची मी तुलना करूं लागलें ह्मणजे इतकें अंतर पडलेलें पाहून माझें मन आनंदानें भरून जातें. जो वाडा, जे महाल आपल्या

दृष्टीस पडावे, ह्मणून मी दहा बारा वर्षांपूर्वीं खटपट करीत होतें, जेथें आह्मा-ला कोणी जाऊं देत नसे, वाड्यांत यायचें झालें तर सतराहजार परवानग्या, व आठरा हजार वर्द्या द्याव्या लागत असत, कधीं वाड्यांत येण्याचा प्रसंग आलाच तर चैत्राच्या महिन्यांत हळदीकुंकवाच्या निमित्यानें मात्र यायचा. त्याच वाड्यांत आज मी मालकिणीसारखी फिरतें आहे; वाटेल तेथें मी बसलें, वाटेल तेथें मी फिरलें, वाटेल तें मी केलें, तरी आज मला बोलणारे कोण आहे ? वाड्यांत जेव्हां मी एखादे वेळीं येत होतें, त्यावेळीं मोठमोठ्या श्रीमंत सरदारांच्या, व सावकारांच्या बायका सोन्यामोत्याच्या दागिन्यांनीं लढले-ल्या, मोठमोठीं लुगडीं, पैठण्या, शालू, पातळें नेसलेल्या, इकडे तिकडे वावरत असलेल्या पाहून 'देवा असें भाग्य माझ्या कपाळीं आहे कां ?' असें मला कितीकदां वाटत असे; माझ्या डोळ्यांतून मी असल्या भिकारड्याच्या घरीं पडल्याबद्दल कितीकदां पाणी गळलें असेल. पण देव आतां माझी सर्व हौस पुरवीत आहे. लेईन, नेईन, करीन सवरीन तेवढें थोडें आहे. जनाची, मना-ची, आपल्याची, दुसऱ्याची, पर्वा व लज्जा मीं काय म्हणून करावी ? ती मला काय देणार ? ती एकीकडे ठेवून जर मी राजघराण्यांतील स्त्रियांप्रमाणें सुख आणि ऐश्वर्य भोगीत आहे तर तिला नुसती घेऊन मला काय करायाचे आहे. दळण कांडण करणें, केर पोतेरें करणें, सैंपाक करणें, आणि सारा दिवस व रात्र संसाराचें काबाड कष्ट करणें, फार झालें तर पोरें बाळें होऊन तीं जगलीं वाचलीं तर कदाचित् विहीण किंवा सासू होऊन बसणें आणि मग लेकी सुनांवर अंमल गाजविणें, यापेक्षां जास्त ती काय देते. आज माझ्या हातीं शेकडों, हजारों, लोकांवर अंमल चालविण्याचें आहे. वाटेल त्याचें व वाटेल तिचें बरें वाईट आज मला करितां येतें आहे; आपल्या जि-वाला वाटेल तें सौख्य लावून घेण्याचें माझ्या हातीं आहे, यापेक्षां आणखी जास्त माझ्या सारख्या गरिब स्थितींतील बायकोच्या हातीं काय असावें ? तो दिवस खरोखरीच धन्य कीं ज्या दिवशीं श्रीमंताच्या व त्रिंबकजीच्या मी नजरेस पडलें. दुसऱ्याचें बरें वाईट करण्याचें जिच्या अंगीं आज शक्ती आहे, तिनें आज त्यांना एखादा मामला देऊन मोठ्या योग्यतेस चढविलें नसतें

काय ? पण तें त्यांच्या नशिबीं पाहिजे होतें. त्रागा करून गेले कोठें तरी देशांतराला ! नाहीं तर बसले असतील कोठें तरी अंगाला राख लावून. नाहींत हें एकपरी बरेंच आहे. मला प्रथम वाड्यांतून पैठणी मिळाली त्याबद्दल काय आकांडतांडव केलें ! पण—जाऊं दे मेली ती मागची रडकथा. तिची आठवण करूं नये तेंच चांगलें. (थोडा वेळ थांबून.) उद्यां कोणची कोणची बसंत पंचमीबद्दल पातळें द्यायचीं तें ठरविण्याकरितां मी त्रिंबकजीस बोलावणें पाठविलें, पण तेही आले नाहींत व त्या रांड भीमीचाही अद्याप पत्ता नाहीं. त्यांच्या मागें शेंकडों कामें पण या टवळीनें तर लवकर यावें कीं नाहीं.

(इतक्यांत त्रिंबकजी येतो.)

त्रिंबकजी—(तिच्याजवळ जाऊन बसतो) कितीही निकडचीं व कसलीही महत्वाचीं कामें असलीं तरी ताईकडचें बोलावणें आलें कीं, तीं सर्व एका बाजूला ठेवून इकडे प्रथम यावें लागतें. कारण ताईकडचें बोलावणें ह्मणजे श्रीमंताच्या ढालाईताच्या बोलावण्यापेक्षां देखील जास्त निकडीचें असतें. तो बिचारा थोडासा दम घेण्यास तरी अवकाश देतो, पण हा श्वास सुद्धां घेऊं देत नाहीं.

ताई—जिकडे तिकडे ताईच्या नांवाचा मात्र डंका ! एकादें तसेंच कांहीं निकडीचें काम असल्याशिवाय मी कधीं तरी आपल्याला बोलावणें पाठवितें कां ? मला माहीत नाहीं वाटतें कीं, श्रीमंतांचा आपल्यावरच पूर्ण भरंवसा असल्यामुळें आपल्यामागें पेशवाईतलीं किती कामें, किती राज्यांतल्या भानगडी आहेत त्या ! त्यांतून दिवसांतून एकदां केव्हां तरी शंकराचें दर्शन घ्यायचें हा माझा नेम आज किती वर्षांचा आहे, हें आपल्याला माहीत नाहींना जसें ?

त्रिंबक—देव, भक्तांच्या हृदयांत नेहमीं बसलेलाच आहे. त्यांच्या हृदयस्थानाशिवाय त्याला बिचाऱ्याला सुखाचें व विश्रांतीचें दुसरें स्थानच सांपडत नाहीं. जी काय त्याला थोडीबहुत विश्रांती मिळत असेल ती त्याच ठिकाणीं. बाहेर पडला कीं त्याला हें कर तें कर, याला सोडीव, त्याच्याकडे धांव, या

जगाच्या उपाधि त्याच्या मागें लागल्याच! या मागच्या सुटाव्या व थोडा वेळ विश्रांति मिळावी, ह्मणून एकानें हिमालयाच्या गुहेचा स्वीकार केला व दुसऱ्यानें समुद्रांत बुडी मारिली, पण तेथें देखील बिचाऱ्यांना विश्रांति मिळाली नाहीं. पार्वतीचें व गंगेचें भांडण व लक्ष्मीची नेहमीची कटकट हीं लचांडें तेथेंही त्यांच्यामागें आहेतच. भक्तांच्या ह्रदयस्थानांत बसल्यावर मग मात्र त्यांचें कांहीं चालत नाहीं.

ताई—एवढें तरी त्यांच्या तडाक्यांतून राहिलें, नाहीं तर बिचाऱ्या देवांची फारच त्रेधा उडाली असती.

त्रिंबक—तो एखादें असें (तिच्या उराला हात लावून) विश्रांतीचें स्थान करून ठेवतोच. मी सरकारी, कांहीं मामल्याची व सुभ्याचीं कामें पहात होतों व कोणाला कोणच्या मामलती द्यावयाच्या हें ठरविण्याच्या व आणखी कांहीं महत्वाच्या कामासंबंधानें विचार करीत बसलों होतों, इतक्यांत आपल्याकडचा ढालाईत आला; मग काय तीं सर्व कामें जशींच्या तशींच अर्धवट टाकून तसाच इकडे आलों. पेशवाईतल्या मामलतीच्या कामापेक्षां आपल्याकडच्या मामल्याचीं कामें फार महत्वाचीं आहेत.

ताई—तीं रोजचींच आहेत. आज नाहीं उद्यां झालीं तर चालतील.

त्रिंबकजी—तें खरें, पण उद्यां बसंत पंचमीचा दिवस आहे, सर्व कागदावर श्रीमंतांचे शिक्के मोर्तबें उद्यांच्या दरबारांत झाले पाहिजेत; तेव्हां तें सर्व कसें काय करावयाचें तें आज आधीं सर्व ठरवून ठेविलें पाहिजे ह्मणून त्याची इतकी निकड! नाहीं तर तीं आज झालीं काय आणि चार महिन्यांनीं झालीं काय सारखींच! बरें आपले ते मामले कोणचे; ज्याच्याकरितां इतकें निकडीचें बोलावणें पाठविलें!

ताई—तीं अवांतर कामें जशीं महत्वाचीं आहेत व तीं उद्यां बसंत पंचमीच्या सुमुहूर्तावर झालीं पाहिजेत, त्यापैकींच माझेंही काम महत्वाचें आहे, व तेंही उद्यांच्याच दरबाराला झालें पाहिजे.

त्रिंबक—पण तें येथें कोण लेक नाहीं ह्मणतो आहे! सरकारी कामापेक्षां अत्यंत महत्वाचें हेंच काम आहे असें एकदां सोडून शंभरदां ह्मणतोना?

आणि आणखी लक्ष वेळ सुद्धां ह्मणेल. पण तें कोणचें तें तर अद्याप बाहेर येतच नाहीं.

ताई—तें आपल्या लक्षांत नाहीं वाटतें.

त्रिंबकजी—नाहीं! मागें कामाचा लकडा पुष्कळ असल्यामुळें एखादे वेळीं स्मरण रहात नाहीं. आपण कां स्मरण करून देत नाहीं.

ताई—याच मस्तानी महालांत संक्रातीच्या करीच्या दिवशीं जेव्हां श्रीमंतांनीं आपल्या हातांनीं शेलक्या शेलक्या बायकांस लुगडी वाटलीं, त्यावेळीं बसंत पंचमीच्या दिवशीं पातळें देऊं असें आपल्याला सांगितलें होतें, तें आहे कां आपल्या लक्षांत?

त्रिंबक—हो, हो, त्याचें आह्माला विस्मरण झालें खरें, माफ करा.

ताई—मग बसंत पंचमी उद्यां आहे. उद्यां जर श्रीमंतांना त्याचें स्मरण झालें तर मग आयत्यावेळीं मी जबाब काय देणार! फजिती होऊन जाईल, इतकेंच नव्हे तर श्रीमंतांची मर्जी खप्पा होईल तें निराळें.

त्रिंबक—खरें, अगदीं खरें! तुह्मी फार चांगलें स्मरण केलेंत. बरें मग त्याबद्दल आपलें काय ह्मणणें आहे व काय केलें पाहिजे; या दोहींबद्दल एकदम हुकूम व्हावा ह्मणजे त्याप्रमाणें सर्व व्यवस्था लावण्याची तजवीज आतां करतों. हं: बोला बोला लवकर! उशीर किती! (ताई त्याच्याकडे हांसत पहात रहाते.) असल्या कामाला कोण हा चेंगटपणा! दौलतराव शिंदे यांना पाटीलबोवाची सरदारी देतांना श्रीमंत माधवराव पेशव्यानीं व नानानीं जांभुळा एवढ्या मोत्याची अमोल्य माळ जी नजराणा ह्मणून सरकारांत घेतली, त्या पाणीदार मोत्यापेक्षां येथील (तिच्या हनुवटीला हात लावून) मुक्ताफळांची किंमत किती तरी पटीनें जास्त आहे.

ताई—सांगतें पण! शंभर महेश्वरीं उंची पातळें, शंभर नागपुरी करवती कांठी पातळें, शंभर चंदेरी जरीकांठी पातळें, शंभर दीडशें बऱ्हाणपुरी जरीकांठी शालू व तितकेच जरीकांठी मंदिली खण; उद्यां बसंती रंगवून दोनप्रहरच्या पूर्वीं तयार पाहिजेत. यांत खाशा बाईसाहेबाचें वगैरे लचांड कांहीं

फार्स्तू पाने चार पडली आहेत

दृष्टीस पडावे, ह्मणून मी दहा बारा वर्षांपूर्वी खटपट करीत होतें, जेथें आह्मा-ला कोणी जाऊं देत नसे, वाड्यांत यायचें झालें तर सतराहजार परवानग्या, व आठरा हजार वर्द्या द्याव्या लागत असत, कधीं वाड्यांत येण्याचा प्रसंग आलाच तर चैत्राच्या महिन्यांत हळदीकुंकवाच्या निमित्यानें मात्र यायचा. त्याच वाड्यांत आज मी मालकिणीसारखी फिरतें आहे; वाटेल तेथें मी बसलें, वाटेल तेथें मी फिरलें, वाटेल तें मी केलें, तरी आज मला बोलणारे कोण आहे ? वाड्यांत जेव्हां मी एखादे वेळीं येत होतें, त्यावेळीं मोठमोठ्या श्रीमंत सरदारांच्या, व सावकारांच्या बायका सोन्यामोत्याच्या दागिन्यांनीं लढले-ल्या, मोठमोठीं लुगडीं, पैठण्या, शालू, पातळें नेसलेल्या, इकडे तिकडे वावरत असलेल्या पाहून ‘ देवा असें भाग्य माझ्या कपाळीं आहे कां ? ’ असें मला कितीकदां वाटत असे; माझ्या डोळ्यांतून मी असल्या भिकारड्याच्या घरीं पडल्याबद्दल कितीकदां पाणी गळलें असेल. पण देव आतां माझी सर्व हौस पुरवीत आहे. लेईन, नेईन, करीन सवरीन तेवढें थोडें आहे. जनाची, मना-ची, आपल्याची, दुसऱ्याची, पर्वा व लज्जा मीं काय म्हणून करावी ? ती मला काय देणार ? ती एकीकडे ठेवून जर मी राजघराण्यांतील स्त्रियांप्रमाणें सुख आणि ऐश्वर्य भोगीत आहे तर तिला नुसती घेऊन मला काय करायाचे आहे. दळण कांडण करणें, केर पोतेरें करणें, सैंपाक करणें, आणि सारा दिवस व रात्र संसाराचें काबाड कष्ट करणें, फार झालें तर पोरें बाळें होऊन तीं जगलीं वाचलीं तर कदाचित् विहीण किंवा सासू होऊन बसणें आणि मग लेकी सुनांवर अंमल गाजविणें, यापेक्षां जास्त ती काय देते. आज माझ्या हातीं शेकडों, हजारों, लोकांवर अंमल चालविण्याचें आहे. वाटेल त्याचें व वाटेल तिचें बरें वाईट आज मला करितां येतें आहे; आपल्या जि-वाला वाटेल तें सौख्य लावून घेण्याचें माझ्या हातीं आहे, यापेक्षां आणखी जास्त माझ्या सारख्या गरिब स्थितींतील बायकोच्या हातीं काय असावें ? तो दिवस खरोखरीच धन्य कीं ज्या दिवशीं श्रीमंताच्या व त्रिंबकजीच्या मी नजरेस पडलें. दुसऱ्याचें बरें वाईट करण्याचें जिच्या अंगीं आज शक्ती आहे, तिनें आज त्यांना एखादा मामला देऊन मोठ्या योग्यतेस चढविलें नसतें

काय ? पण तें त्यांच्या नशिबीं पाहिजे होतें. त्रागा करून गेले कोठें तरी देशांतराला ! नाहीं तर बसले असतील कोठें तरी अंगाला राख लावून. नाहींत हें एकपरी बरेंच आहे. मला प्रथम वाड्यांतून पैठणी मिळाली त्याबद्दल काय आकांडतांडव केलें ! पण—जाऊं दे मेली ती मागची रडकथा. तिची आठवण करूं नये तेंच चांगलें. (थोडा वेळ थांबून.) उद्यां कोणची कोणची वसंत पंचमीबद्दल पातळें द्यायचीं तें ठरविण्याकरितां मी त्रिंबकजीस बोलावणें पाठविलें, पण तेही आले नाहींत व त्या रांड भीमीचाही अद्याप पत्ता नाहीं. त्यांच्या मागें शेंकडों कामें पण या टवळीनें तर लवकर यावें कीं नाहीं.

(इतक्यांत त्रिंबकजी येतो.)

त्रिंबकजी—(तिच्याजवळ जाऊन बसतो) कितीही निकडचीं व कसलीही महत्वाचीं कामें असलीं तरी ताईकडचें बोलावणें आलें कीं, तीं सर्व एका बाजूला ठेवून इकडे प्रथम यावें लागतें. कारण ताईकडचें बोलावणें ह्मणजे श्रीमंताच्या ढालाईताच्या बोलावण्यापेक्षां देखील जास्त निकडीचें असतें. तो बिचारा थोडासा दम घेण्यास तरी अवकाश देतो, पण हा श्वास सुद्धां घेऊं देत नाहीं.

ताई—जिकडे तिकडे ताईच्या नांवाचा मात्र डंका ! एकादें तसेंच कांहीं निकडीचें काम असल्याशिवाय मी कधीं तरी आपल्याला बोलावणें पाठवितें कां ? मला माहीत नाहीं वाटतें कीं, श्रीमंतांचा आपल्यावरच पूर्ण भरंवसा असल्यामुळें आपल्यामागें पेशवाईतलीं किती कामें, किती राज्यांतल्या भानगडी आहेत त्या ! त्यांतून दिवसांतून एकदां केव्हां तरी शंकराचें दर्शन घ्यायचें हा माझा नेम आज किती वर्षांचा आहे, हें आपल्याला माहीत नाहींना जसें ?

त्रिंबक—देव, भक्तांच्या हृदयांत नेहमीं बसलेलाच आहे. त्यांच्या हृदयस्थानाशिवाय त्याला बिचाऱ्याला सुखाचें व विश्रांतीचें दुसरें स्थानच सांपडत नाहीं. जी काय त्याला थोडीबहुत विश्रांती मिळत असेल ती त्याच ठिकाणीं. बाहेर पडला कीं त्याला हें कर तें कर, याला सोडीव, त्याच्याकडे धांव, या

जगाच्या उपाधि त्याच्या मागें लागल्याच ! या मागच्या सुटाव्या व थोडा वेळ विश्रांति मिळावी, ह्मणून एकानें हिमालयाच्या गुहेचा स्वीकार केला व दुसऱ्यानें समुद्रांत बुडी मारिली, पण तेथें देखील बिचाऱ्यांना विश्रांति मिळाली नाहीं. पार्वतीचें व गंगेचें भांडण व लक्ष्मीची नेहमीची कटकट हीं लचांडें तेथेंही त्यांच्यामागें आहेतच. भक्तांच्या हृदयस्थानांत बसल्यावर मग मात्र त्यांचें कांहीं चालत नाहीं.

ताई—एवढें तरी त्यांच्या तडाक्यांतून राहिलें, नाहीं तर बिचाऱ्या देवांची फारच त्रेधा उडाली असती.

त्रिंबक—तो एखादें असें (तिच्या उराला हात लावून) विश्रांतीचें स्थान करून ठेवतोच. मी सरकारी, कांहीं मामल्याची व सुभ्याचीं कामें पहात होतों व कोणाला कोणच्या मामलती द्यावयाच्या हें ठरविण्याच्या व आणखी कांहीं महत्वाच्या कामासंबंधानें विचार करीत बसलों होतों, इतक्यांत आपल्याकडचा ढालाईत आला; मग काय तीं सर्व कामें जशींच्या तशींच अर्धवट टाकून तसाच इकडे आलों. पेशवाईतल्या मामलतीच्या कामापेक्षां आपल्याकडच्या मामल्याचीं कामें फार महत्वाचीं आहेत.

ताई—तीं रोजचींच आहेत. आज नाहीं उद्यां झालीं तर चालतील.

त्रिंबकजी—तें खरें, पण उद्यां बसंत पंचमीचा दिवस आहे, सर्व कागदावर श्रीमंतांचे शिक्के मोर्तबें उद्यांच्या दरबारांत झाले पाहिजेत; तेव्हां तें सर्व कसें काय करावयाचें तें आज आधीं सर्व ठरवून ठेविलें पाहिजे ह्मणून त्याची इतकी निकड ! नाहीं तर तीं आज झालीं काय आणि चार महिन्यांनीं झालीं काय सारखींच ! बरें आपले ते मामले कोणचे; ज्याच्याकरितां इतकें निकडीचें बोलावणें पाठविलें !

ताई—तीं अवांतर कामें जशीं महत्वाचीं आहेत व तीं उद्यां बसंत-पंचमीच्या सुमुहूर्तावर झालीं पाहिजेत, त्यापैकींच माझेंही काम महत्वाचें आहे, व तेंही उद्यांच्याच दरबाराला झालें पाहिजे.

त्रिंबक—पण तें येथें कोण लेक नाहीं ह्मणतो आहे ! सरकारी कामापेक्षां अत्यंत महत्वाचें हेंच काम आहे असें एकदां सोडून शंभरदां ह्मणतोना ?

आणि आणखी लक्ष वेळ सुद्धां ह्मणेल. पण तें कोणचें तें तर अद्याप बाहेर येतच नाहीं.

ताई—तें आपल्या लक्षांत नाहीं वाटतें.

त्रिंबकजी—नाहीं! मागें कामाचा लकडा पुष्कळ असल्यामुळें एखादे वेळीं स्मरण रहात नाहीं. आपण कां स्मरण करून देत नाहीं.

ताई—याच मस्तानी महालांत संक्रातीच्या करीच्या दिवशीं जेव्हां श्रीमंतांनीं आपल्या हातांनीं शेलक्या शेलक्या बायकांस लुगडी वाटलीं, त्यावेळीं बसंत पंचमीच्या दिवशीं पातळें देऊं असें आपल्याला सांगितलें होतें, तें आहे कां आपल्या लक्षांत ?

त्रिंबक—हो, हो, त्याचें आह्माला विस्मरण झालें खरें, माफ करा.

ताई—मग बसंत पंचमी उद्यां आहे. उद्यां जर श्रीमंतांना त्याचें स्मरण झालें तर मग आयत्यावेळीं मी जबाब काय देणार! फजिती होऊन जाईल, इतकेंच नव्हे तर श्रीमंतांची मर्जी खप्पा होईल तें निराळें.

त्रिंबक—खरें, अगदीं खरें! तुह्मी फार चांगलें स्मरण केलेंत. बरें मग त्याबद्दल आपलें काय ह्मणणें आहे व काय केलें पाहिजे; या दोहींबद्दल एकदम हुकूम व्हावा ह्मणजे त्याप्रमाणें सर्व व्यवस्था लावण्याची तजवीज आतां करतों. हंः बोला बोला लवकर! उशीर किती! (ताई त्याच्याकडे हांसत पहात रहाते.) असल्या कामाला कोण हा चेंगटपणा! दौलतराव शिंदे यांना पाटीलबोवाची सरदारी देतांना श्रीमंत माधवराव पेशव्यानीं व नानानीं जांभुळा एवढ्या मोत्याची अमोल्य माळ जी नजराणा ह्मणून सरकारांत घेतली, त्या पाणीदार मोत्यापेक्षां येथील (तिच्या हनुवटीला हात लावून) मुक्ताफळांची किंमत किती तरी पटीनें जास्त आहे.

ताई—सांगतें पण! शंभर महेश्वरीं उंची पातळें, शंभर नागपुरी करवती कांठी पातळें, शंभर चंदेरी जरीकांठी पातळें, शंभर दीडशें बऱ्हाणपुरी जरीकांठी शालू व तितकेच जरीकांठी मंदिली खण; उद्यां बसंती रंगवून दोनप्रहरच्या पूर्वीं तयार पाहिजेत. यांत खाशा बाईसाहेबाचें वगैरे लचांड कांहीं

कामाचें नाहीं. तें तुमचें तुह्मी निराळें पाहून घ्या. उगीच मध्यें भानगड कामाची नाहीं. सांगितलेलीं सणगें उद्यां माझ्या ताब्यांत आलींच पाहिजेत.

त्रिंबकजी—पण इतक्या थोड्या अवकाशांत आपली ही सर्व तयारी आणि ती मनाप्रमाणें व्हावी कशी? कदाचित् इतकीं सणगें मिळतील, रंगाऱ्यांना वेठीला धरून अगर त्यांच्या पाठींत दंडे लगावून तीं रंगवून तयारही होतील, पण त्यांत आवडी निवडीचें लचांड आहेना, तें उरकणार कसें?

ताई—अवांतर जशीं राज्याचीं कामें उरकतात तसेंच हेंही झालेंच पाहिजे. श्रीमंताच्या घरीं कांहीं कमी आहे कीं काय? श्रीमंत बाजीरावसाहेब यांच्या कारकीर्दीत जर आह्माला मनाप्रमाणें मिळूं नये तर केव्हां मिळावें. पै न पै आणि चिंदीन चिंदीचा हिशेब घेणारे व पेशव्यांची दौलत राखतो असें ह्मणून आपलें घर भरणारे, ते यशवंत फडणीस नाना कारकून यांना मरून आज पंधरा वर्षें झालीं! त्यांच्या वेळेला दौलत राहिली आणि आतां असा खर्च केला ह्मणून गेली असें थोडेंच झालें आहे?

त्रिंबक—असें ह्मणतों कोण? ज्यांनीं श्रीमंतांचा आश्रय केला, त्यांच्या सर्व इच्छा व हेतू श्रीमंतांनीं पूर्ण केलेच पाहिजेत. गरिबाला श्रीमंतांनीं दिल्याशिवाय असें नांव घेण्याजोगें मिळणार तरी कसें? गरीबांना देण्यांतच श्रीमंतांना त्यांच्या श्रीमंतीचें भूषण; व त्यामुळेंच त्यांची कीर्ति चहूंकडे होते. नाहीं तर कुबेरासारखे धनाचे रक्षक होण्यांत मोठेपणा मुळींच नाहीं.

ताई—मग काय, होईलना सर्व उद्यां दूपारपर्यंत तयारी? झालीच पाहिजे. नाहीं झाली व श्रीमंत रागावले तर मग माझ्याकडे नाहीं. मी साफ त्यावेळीं आपल्याकडे बोट दाखवून कानावर हात ठेवीन.

त्रिंबकजी—होईल बोवा! तर मग श्रीमंतांबरोबर दुपारचा दरबार आटोपल्यानंतर इकडचा हा समारंभ पाहायाला मिळणार व आमच्या नेत्रांचें सार्थक होणार! बरें, ज्यांना या देणग्या द्यायच्या आहेत, त्या सर्व गांवांतीलच आहेत किंवा देशोदेशच्या आलेल्या सरदारांच्याही आहेत. त्यांच्या बरोबर त्या बडोद्याच्या पटवर्धन शास्त्र्याच्या घरची मंडळीही येणार आहेत कीं नाहीं.

ताई—श्रीमंतांची तेवढ्याकरितांच तर ही सर्व खटपट आहे. संक्राती-

च्या दिवशीं त्या मुळींच आल्या नाहींत, ह्मणून आतां ही युक्ति योजिली आहे. मोठ्या बाईसाहेबांच्या आग्रहावरून असें करायचें हें उगीच नांव आहे. अंतस्थ हेतू हा आहे हें त्यांना कशानें कळणार! त्या आहेत भोळ्या आपल्या!

त्रिंबक—हा सर्व समारंभ होणार कोठें, व केव्हां?

ताई—आरसेमहालांत, आणि संध्याकाळचा दरबार आटोपला ह्मणजे!

त्रिंबक—स्वारी कोठें बसणार?

ताई—त्याची केली आहे तजवीज! ते मात्र कोणाच्या दृष्टीस पडणार नाहींत, तेथून मात्र सर्व त्यांच्या दृष्टीस पडतील. ती पलिकडची खोली! तिच्या खिडकींतून सर्व दिसतें.

त्रिंबक—मी जवळच तेथेंच कोठें तरी असेन! पाहूं कसा काय बसंत पंचमीचा रंग उडतो तो! (इतक्यांत मध्यरात्रीचा गजर होतो.) काय मध्य-रात्र झाली ना? बरें तर येतों मी! मला आणखी एक मोठें निकडीचें काम आहे. (उठतो.)

ताई—जेव्हां तेव्हां मेली अशीच घाई! थांबाना जरासें!

त्रिंबक—एक गृहस्थ मला आतां भेटायला येणार आहेत.

ताई—त्यांची भेट अशा वेळेला! असे कोण ते गृहस्थ आहेत.

त्रिंबक—त्याची पंचाईत तुला कशाला! मला त्यांची रात्रींच भेट घेणें जरूर आहे.

ताई—पण जरा, जरा थांबा! मला आणखी कांहीं सांगायचें आहे.

त्रिंबक—ज्यांना भेटण्याचें मीं वचन दिलें आहे त्यांची भेट घेऊन त्यांना वाटेस लावतों, मग आपल्या सेवेला तयारच आहे. कदाचित् मला जर उशीर लागला तर आपणच तिकडे यावें. पण नको, रात्रीच्या वेळीं या नाजूक पायांना श्रम देणारा कोण अधम असेल तो असो, माझ्या हातून तें काम मुळींच होणार नाहीं. मीच आपल्या सेवेसीं सादर होईन.

ताई—बोलण्यांत खूप साखर पेरता येते. (दोघे जातात.)

प्रवेश तिसरा.

स्थळ--त्रिंबकजीची खोली. दिवा जळत आहे, कागद पसरले आहेत.

पात्रें—खुशरूजी शेट आणि त्रिंबकजी बोलत बसले आहेत, व भगवंतराव उभा आहे.

त्रिंबकजी—शेटजी, अगदीं तुह्मी बोलल्याप्रमाणें वेळेवर आलांत !

मोदी—त्रिरमकजी, ते आह्माला सांगायला नाहीं पाहिजे. आह्मी माणस जसा बोलेल तसा करेलबी. उगीच सगरा बोलूशानी बभ्रा करणार नाय. आह्मी टोपीवाल्या बडाबडा साहेब लोकांपाशीं राहिला आहे. आह्मी संमदा समजतो. आह्मी तुमच्या दरबारचा रिवाजबी जानतो, व टोपीवाल्याचाबी जानतो. ए आमच्या होनाजीनें आह्माला तुमचा ह्मणना सांगितल्याबराबर आह्माला लई लई मोठा आनंद झाला. आमचा दील खुषीनें समदा भरून गेला; आन आह्माला ते वखत असा वाटला कीं, त्रिरमकजीला उडून जाऊन मिलूं कीं कसा करूं. आह्मी ते वखतीच येनार होता पण ए आमचा होनाजी बोलले कीं आह्मासनी राती बोलावलां है. आतां नाय. तेव्हां आह्मी चीप बसले. रात झाली तवा आह्मी यासनी घेऊन गुपचुप चुपकीनें आले. तुह्माला पाहून आमचा दिल बरा खुश होतो. त्रिरमकजी, तुह्मी आमचा खरा दोस्त. तो साला सदासिव माणकेसर बडा लुच्चा माणस. आह्मी बोलते, ते सरका लुच्चा बेइमान माणस ए तुमच्या रियासतेत नसल. पहिले तेने आमच्या संगत चांगला मेल ठिवला; आन आतां तेचा काम झाल्या बराबर आमच्याशीं साला दगाबाजी करायला लागला. आह्मी तेचा बाला ऐकनार ? सिरमंताजवळ, रेसिडेन्ट साहेबाजवळ सब दूर आह्मी तेचा नांवाचा सगरा बोंबाबोंब करून सोरनार. ते आह्माला काय कमी समजते. पण आमचा दोस्त त्रिरमकजी, तुह्मी आमच्या कामाचा काय केला ? ते सगरा आधीं सांगा, मग दुसरी बात.

त्रिंबकजी—(इकडे तिकडे पाहून) शेटजी, हा तुमचा माणुस चांगला विश्वासूक आहेना ? नाहीं तर—

मोदी—तेचे विषयीं बिलकुल फिकीर नहीं. तो आमचा चांगला इमानदार गुजराथेतला आहे. तुह्मासनी तेचा संशय येत असेल तर आह्मी त्यासना बाहेर जाण्यास सांगतो. (होनाजीकडे पाहून) होनाजी तूं बाहेर उभा रहा.

त्रिंबकजी—होनाजी तुमचा तसाच विश्वासूक असला तर माझी हरकत नाहीं. नाहीं पण नको. मोठमोठ्या महत्वाच्या कामाचा जो बिघाड होतो तो याच विश्वासूक ह्मणविणाऱ्या लोकांकडून होतो. जे प्रथम प्रथम मोठे इमानदार ह्मणून ह्मणविले जातात, तेच मागून अव्वल दर्जाचें लुचे व बेइमान असे निघतात. जा तूं बाहेरच उभा रहा. कोणाला आंत मात्र येऊं देऊं नकोस. (होनाजी त्रिंबकजीकडे पाहून जातो.)

मोदी—अछा, आमच्या कामासंबंधीं तुह्मी शिरमंतापासी गोष्ट काढिली होती, तेचा काय ह्मनना परला. ते आह्माला कर्नाटकची सुभेदारी देन्याला राजी झाला कीं नाहीं. शिरमंत जर आमचा एवडा काम करेल तर आह्मी पेशवे सरकारचेबी मोठे मोठे काम रेसिडन्सींतून फोरन करून देल. ते करून देल कीं नाय, ए बाबतींत शिरमंतास आणि तुह्मास आमचा ऐतबार आलाच आहे. ए जो आतां एल्फिनस्टन साहेब नया रेसिडन्ट आला है, ते बडा खराब आंग्रज है. ते आपल्यालाच समद्याहून शेहाना, आन अक्कलबंद समजते. तेचा आमचा पटत नाहीं. आह्मी तेचे हाताखालीं आतां नोकरी करन्याला राजी नाहीं. आपला पेहेला कर्नल क्लोज साहेब रेसिडन्ट होता, तो पेशवे सरकारच्या कामाला इतनी देरी कभी झाली नसती. ए अमदाबादच्या मामल्याचा इतनासा काम तेचेसाठीं ए बडा अक्कलबंद साहेबनें इतना धांदा करूनशेनी पाडून टाकला. ए बडोद्याचा सास्त्री वकीलबी लई आपनी हुसारी दाखविते. बिचमे बिचमे बहोत पागल मानससरके बकते. तेचा साहेबाचा, तुमच्या अमदाबादच्या मामल्याचा शिरमंत बाजीराव साहेबाच्या मर्जीमाफक समदा निकाल आह्मी थोड्या महिन्यांत करून देल, ए बद्दल आह्मी तुमच्या गल्याची सोगन घेते. आह्माला कर्नाटकमधीं सुभेदारीच्या जागेवर जाऊं द्या ह्मणजे तिकरे आमच्या साहेब लोकांत बहोत बहोत पैचान है. तेचेंमार्फत संधान बांधून ए रेसिडन्टची बदलीच बिलायतेहून करवून आनतो. तुम्ही बघून

तर ध्या. ए एल्फिनस्टन जोंपर्यंत ए कामावर है तोंपर्यंत तुमचा कधीं सुधारनार नाहीं. ए समदा बिचार करेल. ए आह्मी सच बात बोलते. पिछे तुम्हाला आमची याद येईल. तेवा ते आमचा काम जल्दी झाला पाहिजे. तेची तजवीज पहेले करा.

त्रिंबक—शेटजी, तुमचे काम झालेंच म्हणून समजा.

मोदी—ते आह्मासनी नुसता मिठी मिठी बाता नाहीं पाहिजे. तेबद्दल शिरमंताच्या शिक्काचा हुकूम बहूत जलदी आह्माला मिलाला पाहिजे, तवा आह्मी खरा समजेल. आह्मी तुमच्याकडे आला ह्मणजे ते सदासिव मानकेसर एकला साला काय करेल ? आह्मी इकडे आला म्हणजे तुम्ही तेचीबी ते कामावरून बदली करून टाका. बेटांत त्येला कामाला पाठवूं नका. आम्ही आमच्या दुसऱ्या दोस्ताला समदा सांगून ठेवेल. आम्ही कर्नाटकमधीं गेला ह्मणजे तुमचा जो भोसले, पिंढारी, निजाम समधा दूर गुपचुप खटपट चालली आहे तेची खबरबी कुनाला कलनार नाहीं. नाहीं तर तेबद्दल पेसवे सरकारची व टोपीवाल्याची आतांच लढाई होएल. आम्ही समदा रोकून धरला आहे. तेचाबी तुम्ही बिचार करेल. ए तुमचा सदासिव मानकेसर लुच्चा मानस, जो रेसिडन्टचे कामास भलतेच बाता सागते, ए तुमचा सत्यानास करेल. तुम्ही बघून तर ध्या, आम्ही कर्नाटकमधीं बसल्या बसल्या काय हिकमत लढिवितेते. ए समधाची बदली करून टाकेल. तुम्ही पहातच राहेल.

त्रिंबक—शेटजी, ती सुभेदारी तुम्हाला देण्याबद्दल पूर्वीच ठरलें आहे. हा पहा हुकूम. याच्यावर उद्यां दरबारांत श्रीमंतांचा शिक्का झाला म्हणजे झालें. (हुकूम दाखवितो.) (आपल्याशीं) या रितीनें या पारसुटल्याला आपल्या कबजांत घेणें हेंच या वेळीं रास्त आहे. एकदां ताब्यांत आल्यावर मग याला वाटेल तसा वेसण घातलेल्या बैलाप्रमाणें वळवितां येईल.

मोदी—(पाहून.) साबास, रावसाहेब तिरमकजी, तुम्ही खूप चांगला काम केला. आतां आम्हाला त्याचा एतबार आला.

त्रिंबक—पण याबद्दल तुमच्या दोस्ताला कसें वाटेल.

मोदी—कोन आमचा दोस्त. ते सदासिव मानकेसर! ते लुच्चा माणस, ते

आतां आमचा दोस्त नाहीं. बरा दुस्मन है. साला बहोत पैसा खाते व आपना घर भरते. सिरमंतास्नी ठकिविते. तेंच्या व तुमच्या डोल्यांत धूल टाकते. तुमचा पैसा खाऊन तुमचा एकबी काम करते नाहीं. उलटा टोपीवाल्याला मिलते. भलता भलता बकते व समद्या कामाचा बिघार करते, साला.

त्रिंबक—पण शेटजी याबद्दल सरकारांत आपण नजराणा काय देणार ?

मोदी—नजराना कसला देनार ! पाच पचास हाजार रुपये नजराना करेल. आनखी जादा काय मागते.

त्रिंबक—शेटजी, मग काम बिघडेल. तुमचा दोस्त दोन लाख रुपये नजराणा द्यायला तयार आहे. तुमचा त्यापेक्षां कांहीं जास्त पाहिजे.

मोदी—अरे साला, ते देते कुठला. शिरमंताचा खजाना लुटला तेतला देतो. ए खिस्यांतून कारला आन ते खिस्यांत टाकला. तेमधीं तेचा बाचा काय गेला. तुह्मी समदा भोरा माणस. तेचा कावा तुमासनी मालुम नाय. आह्मी आमच्या सारा जनममधीं इत्ता कमावला नाय, ते इत्ता नजराना देनार कुटला. तिरमकजी, अरे रावसाब, पेसवे सरकारजवल पेसाला काय साला तोटा परला, ते आमच्या जवल नजराना मागते. आह्मी पेसवे सरकारचा काम हटकून करून देल, ए बोलते.

त्रिंबक—शेटजी, तें सर्व खरें. श्रीमंतांजवळ पैसेही पुष्कळ आहेत हेंही कांहीं खोटें नाहीं, पण तुह्माला दरबारची रीत माहीत आहेना ? त्याप्रमाणें सर्व कांहीं झालें पाहिजे. त्याच्यापेक्षां जास्त नका देऊं ? त्याच्या इतका तरी नजराणा तुह्माला दिलाच पाहिजे.

मोदी—(विचार करून) अबब, दो लाख रुपया ! ! तिरमकजी थोरा कमती करो. बहोत है. आमचा इत्ती ताकद नाय.

त्रिंबक—शेटजी, तुह्मी जितका नजराणा कमती कराल तितका तुमचा दोस्त जास्त वाढवील. थोडक्या करितां मागें पुढें पाहूं नका. नाहीं तर फुकट हातची सुभेदारी घालवाल. अहो, दोन लाख दिले तर त्यांत झालें काय ? तेथें गेल्यावर चार सहा महिन्याच्या आंत दहा लाख रुपये कमवाल. त्याचा हिशेब तुमच्याकडून घेतो कोण आणि तुह्मी तरी देतां कसला !

मोदी—बरा, बरा, तुमच्या ह्मनना आह्माला चांगला वारला. आह्मी दोन लाख रुपिया नजरानाचा देल. पन साला एक लाखावर एकनार नाहीं. तिरमकजी एक एक लाख. (त्याच्या हनुवटीला हात लावतो.) पेसवे सरकारच्या खजानांत मफत रुपिया जाएल, त्यांत तुमासनी काय मिलनार. तुह्मी जो आमच्यासाठीं खटपट करेल, आन नजराना कमती करेल तो आह्मी तुह्मासनी भुलनार नाहीं. (त्याचा हात दाबतो.) तुह्मासनीबी–नजर–एक आपनी [डोळे मिचकावतो] दोस्तकी बात बोलते. समजला आह्मी काय ह्मणते.

त्रिंबक—शेटजी, पण श्रीमंत ऐकणार नाहींत.

मोदी—बरा, बरा बाबा. आह्मी तुमचीच बात ठिवते. आतां तर तुह्मी खुश झारा.

त्रिंबक—शेटजी, त्यांत माझें कांहीं नाहीं. पण नजराणा प्रथम आला पाहिजे; आणि तो उद्यां सकाळींच आला पाहिजे.

मोदी—तेची जरा साली पंचात है. दोन चार रोजांनीं हुकूम मिळाल्यावर पाठविला तर चालनार नाय ?

त्रिंबक—छे, छे, एक दिवसाची देखील गोष्ट बोलूं नका, मग दोन चार दिवसाची कुठली. नजराना प्रथम ! तुमच्या आमच्या दोस्तीबद्दलचें जें काय आहे तें पाहिजे तर मागाहून आलें तर चालेल. पण हें नाहीं चालायचें.

मोदी—बरा आह्मी तेची समदी तजवीज करून, ए होनाजीचे हातीं ऐवज पाठवील. ते तुह्मी पाहून घ्या.

त्रिंबक—येथें आल्यावर त्याची नको तुह्माला काळजी. सुभेदारी तुमचीच ह्मणून समजा.

मोदी—बरा, आह्मी आतां येते. सलाम. सलाम.

त्रिंबक—(उठल्यासारखें करतो) हंः, त्या नजराण्याबरोबरच तेही आलें तर चांगलेंच होईल. मग पाठीमागून लचांड नको. शिवाय ही गोष्ट कोणाच्याही कानीं जाऊं देऊं नका. हा होनाजी तुमचा चांगला विश्वासूक आहेना?

मोदी—मोठा बरा. मोठा विश्वासूक.

त्रिंबक—उजाडण्याच्या आंत सगळा ऐवज पटला पाहिजे. तुमच्या दो-

स्ताला जर ही बातमी समजली तर तो चार लक्ष रुपये देण्याला तयार होईल व सुभेदारी पटकावील. करितां ऐवजाची पूर्ण आठवण ठेवा. ऐवज, नजराणा, दोस्तीबद्दलची देणगी, सर्व उजाडण्याच्या पूर्वी येथें आमच्या घरी दाखल झालें पाहिजे.

मोदी—(आपल्याशीं) पहा साला, ऐवज, नजराना, देनगीबद्दल कसा मछीसारखा तरफरते. एबी साला लुच्चा अदमी दिसतें. (उघड) बराबर, तुह्मी बेफिकीर रहा.

त्रिंबक—या होनाजी बरोबरच येणारना सर्व. ठीक आहे.

मोदी—(त्याला हाका मारतो) होनाजी, होनाजी, अरे साला निजला काय ? (तो येतो) होनाजी, आह्मी जे काय बंगल्यावरून देईल ते चुपसे आनून यांच्या जवळ दे. दुसऱ्या कोणास देऊं नकोस. (तो मान हालवितो) सलाम. तिरमकजी सलाम. [त्याचा हात धरतो व जातो.]

त्रिंबक—[तो गेल्यावर] या दोघानीं आपलीं घरें चांगलीं भरलीं आहेत. अरे हरामखोरानों, श्रीमंतांशीं अशी बेइमानी अं: ! आतां या दोघामध्यें चांगलीं जुतेपैजार लागेल. एकमेकांचीं कारस्थानें आतां आपोआपच बाहेर येतील. वरची देणगी तेवढी खजिन्यांत जमा करावी व बाकीचा ऐवज आपल्याकडे अमानत जमा करण्याला कोणाच्या बापाचें भय नाहीं ! अशी कुलंगडीं जितकी उपस्थित होतील, तितकी आमच्या कामाला बळकटी जास्त !

[जातो.]

प्रवेश चवथा.

स्थळ—आरसेमहाला शेजारची ताईची बसण्याची व निजण्याची खोली.

पात्रें—त्रिंबकजी पलंगावर येऊन पडतो.

त्रिंबकजी—[आपल्याशीं] परमेश्वरानें जीं हीं इंद्रियें व हे अवयव, दिले आहेत आणि ज्यांच्या ज्यांच्याकडे जीं जीं कामें त्यानें नेमून दिलीं आहेत; तीं तीं कामें जर त्यांनीं केलीं नाहीं, अथवा आपण त्यांचा उपयोग

करून घेतला नाहीं तर त्यांत आपण देवाचे मोठे अपराधी होत नाहीं काय? बरें त्याची जर अशी इच्छा नसती तर त्यानें हीं दिलीं असतीं कशाला? त्याचा जर उपयोग करून घ्यायचा नाहीं तर तीं मग पाहिजेत तरी कशाला? त्यापेक्षां मुकें, आंधळें, लुलें होऊन बसणें कांहीं वाईट नाहीं. नेत्रांनों, आज मात्र तुमच्या जन्माचें सार्थक झालें! तुह्मी आपलें काम चांगलें केलेंत ह्मणून तुह्मीही पण तृप्त झालांत. परमेश्वरानें उत्पन्न केलेल्या सर्व सृष्टींतील एकेक अमोल चीजा डोळ्यांनीं पाहून त्यापासून मनाला आनंद मानून घेणें यांत जर कोणी पाप आहे असें ह्मणत असेल तर तो शतमूर्ख! नेत्रानों या वेळपर्यंत तुह्मी आपली कामगिरी चांगली बजावलीत, तुह्माला बराच त्रास झाला असेल करितां आतां कांहीं वेळ आपलें काम बंद ठेवून थोडीशी विश्रांति घ्या! (डोळे मिटून पडतो व पुनः अंमलशानें डोळे उघडून) अरे लबाडानों, तुमची अद्याप तृप्ति झाली नाहीं वाटतें. तुह्माला आपलें काम अद्याप करावेसें वाटतें? करा बापडें. ज्या अमोल आणि प्रेक्षणीय वस्तूंचा आपण आपल्या हृदय संपुटींत संग्रह करतों, त्या वस्तूंवर आपल्या तीक्ष्ण दृष्टीनें पहारा करणारे हे शिपाई जर झोंपी गेले तर भलताच चोर आंत शिरून सर्वच लुबाडून घेऊन जायचा. तेव्हां या पहारेवाल्यांना जागेच राहूं द्यावें. रहा बापड्यानों, तुमच्या मर्जीस येईल तसें रहा. (इतक्यांत ताई मोठे करवतीकांठी बसंती पातळ नेसून, अंगांत मंदिली चोळी घालून दागदागिन्यानीं लढलेली अशी येते.)

ताई—[आंत येऊन आणि समोरच्या आरशांत आपलें रूप न्याहाळून पाहून आनंदीत मुद्रेनें ह्मणतें] सध्यांच्या माझ्या स्थितीबद्दल मीं सुख मानावें कीं दुःख मानावें? दुःख मानलें तर मग सुख तरी आहे कुठें? वाटेल तिला विचारलें तरी, जी ती आपापल्या परीनें आपल्या कर्माची रडकथा गाऊन ' बाई माझ्या सारखी दुःखी मीच; माझ्या सारकी दुःखी दुसरी साऱ्या जगांत सांपडायची नाहीं. ' असेंच सांगतें. श्रीमंत पंतप्रधान बाजीराव पेशवे यांची बायको ह्मणजे महाराष्ट्र देशाची स्वामीण; जें करील तें थोडें, अशी जिची सत्ता ती देखील आपल्या ठिकाणीं दुःखीच आहे. बरें एखाद्या भटा-

भिक्षुकाची बायको, कीं जिला खायला वेळेवर मिळत नाहीं, व नेसायला धड लुगडें नाहीं तीही दुःखीच. तेव्हां सुखी कोण ? ज्या ज्या वेळीं जें जें होईल त्या त्या वेळीं त्यांतच सुख मानून घेऊन आयुष्याचा रोजचा दिवस दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा, व जगाचा विचार न करितां आनंदांत घालविला ह्मणजे झालें. त्यांतच सुख आहे. त्याप्रमाणें आजचा दिवस मला किती आनंदाचा जात आहे ! सर्वजणी मला किती मान देत होत्या. माझ्याशीं किती गोड गोड बोलत होत्या. मोठमोठ्या सरदारांच्या स्त्रियांनीं आपल्या घरीं येण्याबद्दल मला किती आग्रहाचीं बोलावणीं केलीं. माझी ओळख कोणत्या तरी उपायानें व्हावी व मीं त्यांच्याशीं दोन गोड शब्द बोलावे अशी कितीजणींनीं आपली इच्छा बोलून दाखविली. कितीजणी तरी माझ्या भाग्याचें वर्णन करीत होत्या, व त्याचें कौतुक करीत होत्या. माझा शब्द झेलण्यास कितीजणी तयार होत्या व असतात. असें या घटकेला माझें भाग्य असून उद्यां काय होईल याचा विचार करून मी आपल्या मनाला दुःखाची टोंचणी काय ह्मणून लावून घेऊं. सध्यांची घडी माझी. उद्यांची कोणाची हें कोणाला माहीत. अहाहा, या आरशांत दिसणारें माझें रूप पाहून मला किती आनंद होत आहे. मी माझें रूप आरशांत रोज पाहतें, पण आज जसें मला तें पाहून माझ्या डोळ्याचें पारणें फिटलें असें मला वाटत आहे, तसें पूर्वीं कधींच वाटलें नव्हतें. नेत्रानों, घ्या बरें पोटभर पाहून घ्या. (आरशांत पहात रहाते.)

त्रिंबक—(मच्छरदानींतून हलकेच उठून) आमच्यापेक्षां या आमच्या डोळे, कान, वगैरे इंद्रियांनाच आपापलीं कामें कशी चोख करावीं हें चांगलें समजतें हेंच खास ! मी बळजबरीनें डोळे झांकून स्वस्थ पडलों असतां, ते बेटे आपलें काम करण्यास जागे होऊन आपल्या पहाऱ्यावर कां तयार झालें याचें कारण आतां माझ्या ध्यानांत आलें. सर्व सृष्टींतील पदार्थ पशु, पक्षी, वगैरे प्राणी ब्रह्मदेवानें निर्माण केलें, पण त्यांना पाहून त्याच्या मनाचें समाधान झालें नाहीं, व त्याला आपल्या श्रमाचें चीज झालें असेंही वाटलें नाहीं; तेव्हां त्यानें शेवटीं मनुष्य प्राणी निर्माण केला. त्यावेळीं त्याच्या जिवाला थोडेसें समाधान वाटलें. मग त्यानें आपलें सर्व कौशल्य खर्च करून ही सुंदर स्त्री

जात निर्माण केली. तेव्हां स्वारीला अत्यानंद झाला. मग आपल्या श्रमाचें चीज झालें, आपल्या मनाला सदैव आनंद देणारी कायती हीच एवढी वस्तु असें समजून सर्व आपलें काम सोडून तो देखील या वस्तुकडे पहात राहून आज आपल्या डोळ्याचें सार्थक आहे असें मानूं लागला. तर मग आमच्याच डोळ्यांनीं पूर्णपणें तीच वस्तू पहाण्यांत काय पाप केलें आहे ? त्यांनीं खुशाल पाहून घ्यावें. न पाहणें हेंच खरें पाप. (तिच्या शेजारीं जाऊन उभा राहून एकदां आरशांत आणि तिच्याकडे नखशिखांत पहात राहतो.)

ताई—(आरशांत पाहून व लगेच त्रिंबकजीकडे पाहून जरा चपापून.) अगबाई हें काय ? आपली स्वारी येथें केव्हां आली. मला माहीत देखील नाहीं. इतका वेळ आपण कोठें होता. या समोरच्या दारानें आपण खास आला नाहीं. मुद्रा इतकी चमत्कारिक कशानें झाली ही !

त्रिंबक—(उत्तर न देतां तिच्याकडे पहात रहातो) झटलें—

ताई—पुरतें बोलावें तरी ! त्याशिवया मनुष्यानें समजावें काय ? आपण एकसारखें पहातां काय ?

त्रिंबक—दुसरें कांहीं पहात नाहीं. हं: डोळ्यानों खबरदार मध्येंच पापण्या लाविल्या तर !

ताई—हें काय हें असें करणें ! (त्याचा हात धरते व त्याला हालविते.)

त्रिंबक—मी जास्ती कांहीं करीत नाहीं. परमेश्वरानें ज्या इंद्रियाकडे जीं कामें नेमून दिलीं आहेत, तीं तीं नीट करतात कीं नाहीं हें पहातों. डोळ्याचें काम चांगल्या चांगल्या वस्तु पहाण्याचें.

ताई—आपण असें पहातां काय? येथें पहाण्यासारखें असें नवलपरीचें आज आपल्याला काय दिसतें आहे. मला वाटतें आपल्याला आज भ्रम झाला आहे.

त्रिंबक—ज्या वस्तुकडे एकसारखें पहातां पहातां ब्रह्मदेव देखील आपलें देहभान विसरला, मग तीच वस्तु मी पहाता पहातां भ्रमिष्ट झालों तर त्यांत नवल काय ?

ताई—पण असें पहातां तें काय ?

त्रिंबक—दरबारचें सर्व काम आटोपल्यावर मग संकेताप्रमाणें आपल्या-

कडच्या दरबारचा थाट पहाण्याकरितां श्रीमंताबरोबर येऊन तोही मनमुराद पाहिला. नंतर झालेल्या श्रमाबद्दल थोडीशीं विश्रांति घ्यावी ह्मणून या आरामस्थानीं येऊन डोळे मिटून पडलों; तों डोळे कांहीं केल्या लागेनात. ते आपले जागेच्या जागेच! तेव्हां मनांत आलें कीं आज असें काय होतें? असा जों विचार करीत पडलों आहे तों इतक्यांत त्यांना आनंद देणारी, आणि त्यांच्या पहाण्याचें खरें विषयस्थान, अशी एक अमोल्य वस्तु त्यांच्या समोर अवचित आली. तेव्हां तिच्याकडेच ते पहात राहिले. यांत त्यांच्याकडे काय बरें अपराध? असा त्यांचा जेव्हां पहाण्याचा हेकाच पाहिला तेव्हां मी देखील त्यांच्या कामांत मग अडथळा केला नाहीं. ह्मटलें पाहून घेऊंद्या त्यांना? होऊं द्या एकदां त्यांची तृप्ती.

ताई—(हांसून) पण आपण असें पाहिलें काय, तें आपण मुळींच सांगत नाहीं.

त्रिंबक—मोहकपणाच्या मूसींतून ओंतून काढिलेलें हें सुंदर आणि टवटवीत मुखकमल बरोबर ओंतलें गेलें आहे कीं नाहीं हें पहात होतों. (पुनः पाहून) हो बरोबर ओंतलें गेलें आहे. कोठें चूक झाली नाहीं. अगदीं बारीकसारीक देखील चूक झालेली दिसत नाहीं. कारण डाव्या गालावरचा व या वाटोळ्या हनुवटीच्या मध्यभागाचा, हे दोन्ही तीळ देखील मूळचेंच आहेत! मूस ओंतताना अशीच बारीक सारीक चूक राहून जाते. [पुनः पाहून] पण ती या ठिकाणीं खास झालेली नाहीं.

ताई—बरें तें कांहीं नवें नाहीं, पुरें झालें. [दोघे पलंगावर बसतात.]

त्रिंबक—हो आणखी सांगायचें राहिलें, आजचा हा बसंत पंचमीचा थाट.

ताई—असें काय? बरें पण स्वारी केव्हां आली.

त्रिंबक—दरबारचें सर्व काम आटोपलेंच होतें. फराळ वगैरे कांहीं करायचा नव्हता. तुमच्या कडचा दरबार आटोपून श्रीमंत आपल्या महालांत गेले आणि मीही इकडे तसाच या विश्रांति मंदिरांत आलों. आज आपल्याला श्रीमंतांच्या घरीं आलेल्या पाहुण्यांचा आदरसत्कार करण्यांत व देणग्या देण्याच्या कामांत बरीच मेहनत पडली आहे.

ताई—हातीं घेतलेलें काम धडपणीं शेवटास गेलें ह्मणजे जरा बरें वाटतें. पाहिलाना सर्व थाट.

त्रिंबक—पण त्या शास्त्र्याच्या घरच्या व बडोद्याकडच्या कोणीच आल्या नाहीं वाटतें. दोघी तिघीजणीच परक्या दिसत होत्या.

ताई—नाहीं त्यांच्या घरच्या कोणीच आल्या नाहींत. त्यामुळें श्रीमंतांच्या मनाचा थोडासा विरस झाला. नाहीं ह्मणायला शास्त्र्याच्या नायबाची मात्र बायको आली होती.

त्रिंबक—कोणची बरे ती. ती काजळी जरीचा शालू नेसून कडेवर मुलगा घेतलेली व जरा चिंचोळ्या तोंडाची, गोरीपान आणि सडपातळ बांध्याची होती ती !

ताई—होय तीच ती.

त्रिंबक—हं ! पहाण्यासारखी वस्तू खरी.

ताई—लागलें कां इतक्यांत तोंडाला पाणी सुटायला.

त्रिंबक—नाहीं तसें नाहीं कांहीं ! ह्मटलें पाहण्यासारखी वस्तु आहे इतकेंच हो. काल आपण जें सांगणार होता तें काय ?

ताई—तें कां (विचार करून) हो आपण मामले देण्याघेण्यासंबंधीं काल बोलला होता. तेव्हां एखादी मोठ्या मामलयाची जागा खालीं आहे कीं नाहीं ?

त्रिंबक—सध्या कांहीं नाहीं. पण तसेंच तुमच्या कोणी शिफारसीचें असलें तर त्याकरितां रिकामी करतां येईल.

ताई—माझ्या एका आप्ताकरितां पाहिजे आहे.

त्रिंबक—होईल. त्यांत काय मोठी गोष्ट आहे. या दरबारच्या कर्मकटकटी आतां येथें कशाला. आपल्याला बोवा झोंप येऊं लागली. डोळे मिटू लागले. हें पहा. (जांभया देतो.)

ताई—जावें निजावें. (दोघे जातात.)

अंक दुसरा.

प्रवेश पहिला.

स्थळ—त्रिंबकजीचा दिवाणखाना.

पात्रें—सदाशिव माणकेश्वर आणि त्रिंबकजी दोघे लोडाला टेकून बोलत बसले आहेत.

त्रिंब–अहो भाऊसाहेब, त्या पारसुटल्याला कर्नाटकची सरसुभेदारी श्रीमंतांनीं कशी दिली, याबद्दल तुह्माला जसें आज कित्येक दिवस आश्चर्य वाटत आहे, त्याचप्रमाणें मलाही वाटत आहे. यांतलें इंगित काय असावें व श्रीमंतांना त्याची एवढी भीड कशी पडली असावी, याविषयीं तुह्माला जसें गूढ पडलें आहे तसेंच मलाही पडलें आहे, मी त्याविषयीं आज इतके दिवस शोध करीत आहे, पण कांहींच थांग लागत नाहीं. बसंत पंचमीचे आधले दिवशीं रात्रीं कर्नाटकच्या सरसुभेदारीवर शेट मोदी यांची नेमणूक करण्याचें सरकारांतून ठरलें आहे. करितां आजच्या आज हुकूम वगैरे लिहून उद्यां शिक्क्यामोर्तबाकरितां दरबारांत तयार ठेवा, अशी एकदम आज्ञा झालेली ऐकून मी देखील जागच्या जागीं थक्क होऊन गेलों ! आपल्याला सुभेदारी देण्याबद्दल फार दिवसापासून ठरलें होतें, असें असून हें भलतेंच झालेलें पाहून मला देखील अत्यंत वाईट वाटलें. पण करणार काय ? आपण पडलों नोकर. हुकूमाचे ताबेदार. तेव्हां मुकाट हुकूम लिहून तयार करावे लागले; नाहीं तर श्रीमंतांची मर्जी लागलीच खप्पा व्हावयाची. त्याबद्दल बोलण्याची सुद्धां श्रीमंतांनीं कांहीं सवड दिली नाहीं. जाऊं द्या. त्याबद्दल आतां तुह्माला पुष्कळ जरी वाईट वाटलें तरी त्याचा उपयोग काय ? तो पारसुटला ह्मणजे त्या जागेवर फार दिवस टिकेल असें मला वाटत नाहीं. लवकरच त्याचा खेळखंडोबा होणार, हें माझें आपलें आजचें भविष्य तुह्मी लक्षांत ठेवा. तें खरें झालें कीं त्या जागेला लायक मनुष्य तुमच्याशिवाय दुसरा कोणी मला दरबारांत दिसत नाहीं. आतां असें श्रीमंतांनीं केल्यामुळें आपल्या दरबारच्या एका मोठ्या अनुभवी,

हुशार, आणि लायक मनुष्याच्या हक्काची थोडीशी पायमल्ली झाली हें मात्र खरें. त्यानें मोठा नजराणा दिला व आपल्याबद्दल थोडेंसें किलमिषही श्रीमंतांच्या मनांत आणून दिलें ह्मणून त्याचा डाव साधला, अशी आपली उडत उडत बातमी आहे. खरें खोटें परमेश्वर जाणें.

सदाशिव—त्याला सरसुभेदारी दिली याबद्दल मला इतकें वाईट वाटत नाहीं, पण यामुळें माझा मोठा हिरमोड झाला याचें मला अत्यंत वाईट वाटतें.

त्रिंबक—अहो भाऊसाहेब असें वाटणें अगदीं सहाजिक आहे. त्यानें जसें वकिलीचें काम आज बरीच वर्षे केलें आहे तसें तुह्मी देखील गोविंदराव काळ्याबरोबर भागानगरच्या नबाबाच्या दरबारी वकिलीचें काम केलें नाहीं काय ? मशीर उन्मुलुखासारख्या अटोकाट शहाण्या मुत्सद्याची कित्येक मनसुब्यांत, कित्येक मोठ्या भानगडीच्या कामांत तुह्मी जबाब देतांना अक्कल गुंग करून टाकली नाहीं काय ? शिवाय अलिकडे पांच सात वर्षे बेटावरच्या वकिलीचें काम कसें करीत आहांत हें सर्व जगाला जर महशूर आहे; तर या गोष्टी श्रीमंतांना अवगत नाहींत असें ह्मणणें कसें शोभेल ? त्यांच्या मनांतूनच तें कर्तव्य, त्याला कोण काय करणार. भाऊसाहेब, बोलायची गोष्ट नव्हे, पण या गोष्टींत आपला जसा हिरमोड झाला तसाच माझाही झाला आहे. मला सुद्धां ‘ ती मी तुला देणार ’ असें दोन चार वेळां श्रीमंत बोलले होते. त्या गोष्टीला कांहीं फार दिवस झाले नाहींत. मोदीची नेमणूक होण्याचें पूर्वीं सुमारें चार पांच दिवस. ही गोष्ट मी तुमच्याजवळ देखील बोललों नाहीं. आतां आपली ओघाला गोष्ट आली व तुह्मी आह्मी आतां समदुःखी झालों ह्मणून बोललों.

सदाशिव—काय त्रिंबकजी, श्रीमंत तुह्मालाही असेंच बोलले होते.

त्रिंबक—अहो, तुमच्या–तुमच्या–गळ्या शपत मला असें बोलले होतें. पण मला त्याबद्दल आतां फारसें वाईट वाटत नाहीं. कारण हें जेव्हां खरें होईल तेव्हां मात्र त्या ह्मणण्यांत कांहीं तथ्यांश होता, असें मी पूर्वींच आपल्या मनांत ठरवून ठेवलें होतें. माझी नवी आणि तुमची फार दिवसाची

आशा, एवढेंच काय तें तुमच्या माझ्या वाईट वाटण्यांत अंतर. बाकी दोघे-ही सारखेच.

सदाशिव—मला नाहीं तर तुह्माला तरी ती मिळावयाची होती. पण मध्येंच ही लपंडावी झाली कशी ? याचेंच मला राहून राहून फार आश्चर्य वाटतें. नजराण्याबद्दल ह्मणत असाल तर मला जर आधीं कळतें तर त्यानें जो नजराणा दिला, त्याच्या चौपट नाहीं पांचपट नजराणा मी सरकारांत दिला असता. वाटेल तें केलें असतें, पण हातची सरसुभेदारी कधीं जाऊं दिली नसती. असो आतां काय, हातची गोष्ट गेली. (उसासा टाकतो.)

त्रिंबक—(मनाशीं) मोदी ह्मणत होता तें कांहीं खोटें नाहीं बरें. लुच्चानें सरकारचा खजिना लुटून आपलें घर चांगलें भरलें आहे. बरें जातों कोठें. केव्हां तरी येईलच जेथल्या तेथें. (उघड) भाऊसाहेब, हातची गोष्ट समूळ गेली असें समजूं नका. आपण दोघे एकचित्त होऊन ती हातची जाऊं द्यायची, मग आपला मुत्सद्दीपणा तो काय राहिला ? तुह्माला मिळो अगर मला मिळो, कोणाला मिळाली तरी आपण दोघे जिवलग मित्र असल्यामुळें त्याबद्दलचा आनंद दोघांना सारखाच. मला नको ती. तुह्मालाच त्यांत यश येऊं द्या. मला त्यांत आनंद आहे. नजराण्यामुळेंच असें झालें असेल, तर वेळप्रसंग आल्यास मी आपलें आतांचें ह्मणणें श्रीमंतांच्या कानावर घालण्यास कधीं विसरणार नाहीं. ही तुह्मी खात्री ठेवा. आतां आपण दोघांनीं मिळून त्याच्या कारभाराच्या कागाळ्या जितक्या लवकर श्रीमंतांच्या कानावर येतील अशी तजवीज केली पाहिजे. ह्मणजे वर्ष सहा महिन्याच्या आंत त्याला सरसुभेदारीच्या जाग्यावरून खालीं ओढलाच.

सदाशिव—त्रिंबकजी, त्याला वर्षसहा महिने कशाला पाहिजे. आतांच बोभाटे थोडे बहुत यायला लागले आहेत. आणखी दोन चार महिन्यांत तुह्मीच ऐकाल त्याच्या कारभाराचे पोवाडे.

त्रिंबक—येऊं द्या, जितके लवकर बोभाटे येतील तितके आपल्याला पथ्यकारकच आहेत. मला जेव्हां जेव्हां संधी मिळत जाईल तेव्हां तेव्हां मी त्याच्या कागाळ्या श्रीमंतांच्या कानावर घालीनच, पण तुह्मालाही जेव्हां

चांगली वेळ सांपडत जाईल तेव्हां तुह्मीहीं श्रीमंतांना थोडा थोडा मजकूर श्रुत करीत जा.

सदाशिव—त्याच्या विषयींच्या मी सांगितलेल्या गोष्टी श्रीमंतांना कितपत पसंत पडतील व त्यांचा त्यांवर कितपत भरंवसा बसेल याची मला खात्री देतां येत नाहीं. तेव्हां तें काम तुह्मीच परभारें करणें हें चांगलें.

त्रिंबक—हो, आपण ह्मणतां तें एक अंशीं खरें आहे. बरें ती कामगिरी तुह्मी बजावली पाहिजे.

सदाशिव—कोणची ती!

त्रिंबक—दुसरी कोणची नाहीं. आज आपण शास्त्री वकिलास दरबारांत अमदाबादच्या मामल्यासंबंधानें बोलण्यास घेऊन येण्याकरितां त्यांच्याकडे जाणार आहांत, तेव्हां त्यांच्या कानावर या मोदीच्या गोष्टी घालून त्यांच्या मार्फत रेसिडेन्ट साहेबाच्या कानावर त्या सर्व हलके हलके जातील असें करा; आणि साहेबाच्या भेटीच्या वेळीं जेव्हां तुह्माला चांगली संधी सांपडेल तेव्हां तुह्मीही त्यांच्या कानांत हळूच मंत्र फुंकित रहा. ह्मणजे अनायासेंच काम होईल.

सदाशिव—तें मी करीन. त्याविषयीं नको तुह्माला काळजी. अरे पारसुटल्या, तुला सरसुभेदारी पाहिजे नाहीं? पाहीन आतां त्या जागेवर किती दिवस टिकतोस तो. ‘ इतो भ्रष्टः ततो भ्रष्टः ’ अशी जर तुझी स्थिती थोड्या दिवसांत केली नाहीं तर मी नांवाचा सदाशिव माणकेश्वरच नव्हे.

त्रिंबक—(मनाशीं) या गध्याला अजून वाटतें आहे कीं, कर्नाटकची सरसुभेदारी आपल्याला केव्हां तरी मिळणार. ठेवली आहे लेका तुझ्या बापानें! मोठमोठे मैत्रीचे साखळदंड अशाच घणाच्या घावानें तुटतात. (उघड) तसें तसेंच केलें पाहिजे, ह्मणजे त्याला इकडे तोंड दाखवायला जागा राहणार नाहीं आणि तिकडेही राहणार नाहीं. सर्व प्रकारानें आणि चहूंकडून असा सुरुंग तयार करून ठेवतां कीं, बत्ती दिल्याबरोबर त्याच्या चिंधड्या चिंधड्या उडाव्या. बरें तुह्माला त्या शास्त्री वकिलाकडे आज रंगाच्या दरबाराला बो-

लावण्याला जाण्याबद्दल आज्ञा झाली आहेना, तेव्हां आपण तिकडे जा, आणि मी इकडे दरबारच्या व्यवस्थेकरितां जातो.

सदाशिव—ठीक आहे. (उठतो.)

त्रिंबक—सांगितलेलें मात्र विसरूं नका. काळ्या कुळकुळीत कातळाचा दगड फोडायचा आहे, तेव्हां सुरुंग खोदण्यास एव्हांपासूनच सुरवात होऊं द्या. (तो जातो) (मनाशीं) पूर्वीं ठेवलेल्या ठिणगीचा धुमसून थोडासा आतां जाळ होऊं लागला आहे. वेळोवेळीं थोडें थोडें तेल टाकीत गेलें कीं थोड-क्याच वेळांत भडका होऊन चहूंकडे आगीचा डोंबाळा होऊन जाईल.

(जातो.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—पुण्यांतील पटवर्धनं शास्त्र्याचा राहण्याचा वाडा.

पात्रें—गंगाधर शास्त्री पटवर्धन आणि त्यांचा मुतालिक बापू मैराळ हे बोलत बसले आहेत, व जवळ गुणाजी हुजऱ्या वारा घालीत उभा आहे.

बापू मैराळ—तात्यासाहेब, पाहिलीतना येथील दरबारची रीत आणि कारभार. दोन वर्षांमागें मी जेव्हां याच कामाकरितां येथें सरकारच्या हुकु-मानें आलों होतों त्यावेळीं श्रीमंत बाजीराव पेशव्यांनीं याच अमदाबादच्या मामल्याबद्दल व मागील घेण्याच्या हिशेबाबद्दल असेंच अखेरपर्यंत भिजत घोंगडें घालून ठेवलें. एकाही गोष्टीचा निकाल ह्मणून केला; नाहीं. आज कर-तों उद्यां करतों, आमचा त्याबद्दल विचार चालू आहे, मागचे हिशेब आ-ह्माला पाहिले पाहिजेत; असेंच त्यांनीं चालविलें होतें. शेवटीं कंटाळून मला परत यावें लागलें. त्या सर्व गोष्टी खऱ्या कीं खोट्या हें सर्व आपणास आतां एक दीड वर्षाच्या अनुभवावरून समजून चुकलेंच असेल. इतकें असून आ-पल्या हलकट लोकांच्या नादीं लागून आणि त्यांच्या सांगण्यावरून सरका-रापाशीं मात्र माझ्या नालायकीचा बोभाटा केला व दुसरा वकील पाठवा ह्मणून सांगितलें. येथें कसाही शहाणा, कसाही चतुर, कितीही अनुभवी

असा मोठा पंचहत्यारी मनुष्य आला तरी त्याची अक्कल पेशव्याच्या दरबारीं गुंग व्हावयाचीच.

गंगाधर—बापू तूं ह्मणतोस तें सर्व माझ्या अनुभवास येत चाललें. या दरबारची सर्व मंडळी अगदीं अज्ञ, पशु व ओल्ड पद्धतीची, असून, त्यांना कोणत्याही कार्याचें महत्व कळत नाहीं आणि त्यांना टाईमची किंमत व आपल्या दरबारचें इन्टरेस्ट कशांत आहे हें मुळींच समजत नाहीं. या ठिकाणीं सर्व फूल्स् एकत्र झाले आहेत. त्यांत श्रीमंत तर काय पशुनाम् पशुपतिः आहेत.

बापू—दरबारची मंडळी, ज्यांच्या सल्लामसलतीनें सर्व राज्याच्या घडामोडी व्हावयाच्या व कारभार चालावयाचा, त्या मंडळीची पूर्वपिठीका पाहिली ह्मणजे कारभार कसा चालत असेल याची कल्पना सहज होते. एक त्रिंबकजी डेंगळे—ज्यांनीं आजपर्यंत जासूदगिरी केली, ज्यांना पांढऱ्यावर काळें कसें करायचें हें माहीत नाहीं, विद्येचा आणि ज्यांचा उभा दावा, लोकांच्या माना कशा मुरगाळाव्या हें मात्र ज्यांना चांगलें माहित असून श्रीमंतापुढें तोंडपुजेपणा कसा करावा एवढें मात्र ज्यांना कळतें, असें मुख्य मंत्री आणि सल्लागार! दुसरे मंत्री शागीर्दाच्या कामांत तरबेज असलेले! तिसरे याज्ञिकीच्या कामांत सर्वोत्कृष्ट, चवथे वैजनाथभट्ट भागवत. पांचवे दिक्षीत, सहावा हरदास, एखादा गवई, अशा मंडळीच्या दरबारांत स्वराज्याचा कारभार चालायचा. परराज्यांतील भानगडीच्या कामाचीं बोलणीं व्हावयाचीं व निकाल लागायचे! नाहीं ह्मणायला तेवढें एक मात्र साधारण वाकबगार गृहस्थ त्यांतल्या त्यांत बरे असे दिसतात, ते सदाशिव माणकेश्वर.

गंगा—थोडेसें संभाषण करावेसें मनाला जे प्रशस्त गमतें तें त्याच्याशींच. तो थोडासा या ब्रुटसूपेक्षां कांहीं बरा व एक्सपीरियन्स्ड आहे. बापू, मागील बाकीच्या हिशेबाचें प्रकरण जर चाळीस लक्षावर तुटलें तर बरें, असें नाहीं कां तुला वाटत. पांच सात लक्षांच्या कायमच्या वसुलाचा महाल तोडून देण्यापेक्षां एकदां रोकड ऐवज देऊन टाकला ह्मणजे झालें. तसें नाहींच घडलें तर अमदाबादचा मामला आपल्या हातचा जाणार. तें आपल्याला व इंग्लिश

रेसिडेन्टास मुळींच असंमत आहे. त्याबद्दल आपण सरकारांत लिहिल्यास आज दोन महिने झाले. तिकडून अद्याप उत्तर आलें नाहीं. तेव्हां महाराजांना आपण केलेलें बोलणें पसंत आहे कीं नाहीं याबद्दल संशय प्राप्त होतो. तूं आज पुनः पत्र लिही व मुद्दाम सांडणीस्वाराबरोबर रवाना कर. आणखी बापू तिकडील व आपल्याकडील अगदीं सिक्रेट न्यूज या दरबारांत कशा कळतात याचें मला मोठेंच सखेदाश्चर्य वाटतें. मला एकाचा मोठा संशय आहे, व तो खरा असावा अशी माझी दिवसेंदिवस खात्री होत चालली आहे.

बापू—कोणचा, कोणचा तो.

गंगाधर—त्या डिझ्!नेस्ट शेटजीबद्दल. तोच सिक्रेट फोडीत असला पाहिजे असें माझें मत आहे. पेशव्यांच्या राज्यांत सरसुभेदारीच्या कामावर असून रेसिडेन्सीच्या वकिलाचेंही काम त्याच्याकडे आहे, तेव्हां संशय येण्यास जागा आहे कीं नाहीं !

बापू—बरोबर आहे.

गंगाधर—मी याबद्दल एल्फिनस्टन साहेबास पुढच्या भेटींत खास सांगणार. त्याच्याकडे दोन्ही कामें इकडची व तिकडची असणें ही पालिसी चांगली नाहीं. सर्व कामाचा बिघाड होतो व निकाल लागत नाहीं. त्यानें अशीच कांहीं तरी कामगिरी केली असली पाहिजे. त्याशिवाय त्याला बाजीरावानें सरसुभेदारी दिली नाहीं. तो खास ट्रेचरस् व फेथलेस मनुष्य आहे. त्या पारशाला एक कोणते तरी काम सोडण्यास लाविलेंच पाहिजे.

(इतक्यांत सदाशिव माणकेश्वर येतो.)

सदाशिव—(ऐकून आपल्याशीं) ज्याचें बीजारोपण मी आज ज्यां येथें करणार होतो, त्याचें तें पूर्वीच येथें होऊन चुकलें आहे हें एक आपलें सुदैवच समजायचें. आतां फक्त वेळोवेळीं जलाचा वर्षाव करून त्याला अंकूर आणवून त्याचा वृक्ष बनवायचा एवढेंच बाकी आहे, तेवढें आपल्याला सहज करितां येईल. शेटजी, पाहूं आतां कर्नाटकची सरसुभेदारी आपल्याला किती दिवस लागते ती !

बापू—(त्यांस पाहून) यावें, यावें वकिल साहेब, असें असें यावें.

गंगाधर—(त्यांस आपल्या शेजारी घेऊन) कां वकील साहेब, कसें काय ? आज आपली स्वारी किं निमित्य ! कांहीं तरी इम्पारटन्ट अत्यंत महत्तम महत्वाचें कार्याकरितां आपलें आगमन झालें असेल. अस्तु, पेशवे सरकारच्या दरबारची कशी काय वार्ता आहे. आणखी कांहीं आमच्या सरकारच्या बिझिनेसबद्दल खुलासा होतो आहे कां ?

सदाशिव—त्याबद्दल श्रीमंतांचा अद्याप नक्की विचार झाला नाहीं. पण तो लवकरच होईल असें वाटतें. आज मी श्रीमंतांकडून आपल्यास, मुतालिक साहेबास आणि आपल्याकडील सर्व मंडळीस वर्षप्रतिपदेच्या दरबाराकरितां व रंगाच्या समारंभाकरितां निमंत्रणास आलों आहे. सर्वांनीं अगत्य आलेंच पाहिजे असें श्रीमंतांनीं आग्रहपूर्वक सांगितलें आहे.

गंगाधर—याकरितां कां आपण आलांत ! वंडर, व्हेरी स्ट्रेंज. राज्यांतील दुसरीं महत्वाचीं कार्यें एका बाजूला ठेवून तुमच्या दरबारच्या मंडळीला हे रंग, नाच, तमाशे, गाणीं बजावणीं, इच्छा भोजनें, यज्ञ–याग वगैरे गोष्टी सुचतात कशा याचेंच मला वारंवार वंडर वाटतें. दरबारची सर्व मंडळी मला पंक्षी–पठाण दिसतें.

सदाशिव—श्रीमंतांच्या दरबारीं जर अशा गोष्टी होऊं नयेत, तर व्हाव्यात तरी कोठें. श्रीमंतांना सर्वांचा परामर्ष घेणें भाग आहे.

बापू—तें खरें. पण सर्व काळ आणि वेळ तिकडेच घालवावा हें चांगलें नाहीं, इतकेंच तात्यासाहेबाचें ह्मणणें आहे. वकील साहेब, तुह्मीच साधारण विचार करा कीं, आपल्या दरबारीं येऊन आह्माला सुमारें दीड वर्ष होत आलें. आमचें एकही ह्मणणें आपल्याला पसंत पडत नाहीं. व आपला खरा हेतू काय आहे, हेंही आपण स्पष्ट खुलासेवार सांगत नाहीं. आपण आज दीड वर्षांत कोणत्या एका तरी कामाचा निकाल लावलांत कां ? सर्व येथून तेथून घोंटाळा करून ठेवला आहे. देणेंकरी जसा आपल्या सावकारास आज उद्यांचे शेंकडो वायदे करून चाळवितो त्याप्रमाणें श्रीमंतांनीं या मामल्यासंबंधानें मांडले आहे. अखेर निकाल काय होणार याचें भविष्य मीं पूर्वींच

करून ठेवलें आहे, पण तात्यासाहेबाची खात्री करून देण्याकरितां स्वस्थ बसलों आहे. आतां त्यांचीही ती होत चालली आहे.

गंगाधर—बापू, तुह्मी ह्मणतां तसें माझ्या अनुभवास येत चाललें आहे. पण मी आतां त्यांचे वायदे ऐकत येथें स्वस्थ बसणार नाहीं. आजपर्यंत बहुत बहुत शांति धरली. आतां तसेंच येथें पडून राहण्याची सांप्रतची स्थिती नाहीं. पुढच्या भेटीला, कशाला आजच दरबारांत मी श्रीमंतांस याबद्दल शेवटचें विचारणार आणि लागलीच तोच मजकूर रेसिडेन्ट साहेबांच्या कानावर घालून स्वग्रामीं जाण्याची तयारी करणार. रेसिडेन्ट साहेब जाणें आणि श्रीमंत पंतप्रधान बाजीरावसाहेब पेशवे सरकारचें दरबार जाणें व तें काम जाणें. तिकडून निकाल होईल तोच त्यांना पसंत पडेल.

सदाशिव—वकीलसाहेब ह्मणतात त्यांत कांहीं गैर नाहीं. पण या गोष्टीचा विचार आमच्या दरबारांत होत आहे.

बापू—नाहीं कोण ह्मणतो. आज वर्षोंगणती चालला आहे. हें तुमच्या दरबारचें ह्मणणें व ही लपंडावी कधींच संपणार नाहीं.

गंगाधर—ओ नो, असले लपंडाव आतां माझ्यापुढें मुळींच चालायचे नाहींत. आतां मी एक घाव आणि दोन तुकडे करणार. बरें तें असो. वकिल साहेब, आपल्या येथील नवीन सरसुभेदारांचा कारभार कसा चालला आहे. फार करून असाच असेल ?

सदाशिव—(मनाशीं) यांच्याच तोंडून निघेल तेवढें बरें आहे. आपण त्यांत पुढारीपणा घेतला नाहीं ह्मणजे झालें. वेळोवेळीं आपली ठिणगी मात्र ठेवीत जावी, ह्मणजे आपोआप काम होत जाईल. शिवाय आपण कानावर हात ठेवायला मोकळे ते मोकळेच.

बापू—वकील साहेब, तो पारशी तुमच्याकडे शिरला कसाहो. त्याच्याशिवाय तुमच्याकडे त्या जागेला लायक असा दुसरा मनुष्यच नव्हता काय ?

सदाशिव—तें मीं काय सांगावें ! श्रीमंतांची मर्जी.

गंगाधर—हो, एखाद्या शागिर्दापेक्षां तो पुष्कळ शहाणा आहे. शिवाय

बेटांत जाऊन समजावण्याचें व बोलण्याचेंही काम त्याच्याकडेच आहे ना ? हं: शाबास, यांत श्रीमंतांनीं पालिसी ढवळी खरी.

बापू—तो शहाणा आहे, त्या अर्थी काम बरें करीत असेल खरें. पण एकंदर कामावरून त्याच्या कारभाराचें लक्षण व धोरण दिसून आलें असेल. नाहीं ?

सदाशिव—अद्याप चांगलेंसें कांहीं लक्षण दिसून आलें नाहीं, पण थोडक्याच दिवसांत दिसून येईल असा रंग दिसतो. बापूसाहेब, कुंभाराची सून कितीही दिवस घरांत बसून राहिली तरी केव्हांना केव्हां तरी उकिरड्यावर राख टाकायला यायचीच. आह्मी सांगण्यांत काय अर्थ आहे. थोडक्याच दिवसांत आपणही मोदीसाहेबाच्या कारभारासंबंधानें ऐकाल. ते शहाणे सुरते टोपीवाल्याकडचे सर्व कामाचे वाकबगार लोक, त्यांची गोष्ट काय सांगायची ! ते आपल्या कामांत हुशार असणारच. आणखी शेट साहेबाकडे कामाचा रगाडाही जास्त आहे. त्यांना सर्व धोरणें सांभाळावीं लागतात. बरें आहे, मी आज्ञा घेतों. श्रीमंतांनीं अगत्य अगत्य बोलावलें आहे. आपणा सर्वांस आलेंच पाहिजे. त्याशिवाय रंगाच्या समारंभाला आरंभ व्हावयाचाच नाहीं.

गंगाधर—नाहीं, अवश्य येऊं ! श्रीमंत आमच्या कामाचा लवकर निकाल करतील तर बरी गोष्ट आहे, आह्माला येथें आतां अवधी नाहीं. असें आपण श्रीमंतांस सुचवावें.

सदाशिव—सूचना करण्याचें तेवढें काम मी करीन. (बापू विडा देतात व सदाशिव माणकेश्वर जाऊं लागतो.) (जातां जातां) (मनाशीं) आज सूतोवाच केलें आहे तेवढें पुरें. पुढें आणखी.

गंगाधर—बापू तें पत्र लिहून तयार करा, व आज जासुदाबरोबर रवाना करा. गणूजी, जासूद जोडीस तयार रहाण्यास सांगा.

बापू—आज्ञेप्रमाणें तयार करतों.

(सर्व जातात.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील दरबारचा दिवाणखाना.

पात्रें—श्रीमंत बाजीराव साहेब, त्रिंबकजी डेंगळे आणखी दरकदार सरदार वगैरे मंडळी आपापल्या दर्जाप्रमाणें बसली आहे.

श्री. बाजीराव—त्रिंबकजी, सकाळीं वाड्यांत एवढा आरडा ओरडा कसलारे चालला होता.

त्रिंबकजी—श्रीमंत, कांहीं वर्षापूर्वी सुपें, सासवड, खेड वगैरेचे मामले करमरकराकडे ठेक्यानें दिले होते; अवांतर ठेकेदारापेक्षां करमरकरांनीं आपली बोली जास्त लाविली आणि त्याप्रमाणें त्यांच्या नांवानें त्या मामल्याचे सरकारी शिरस्त्याप्रमाणें पट्टे वगैरे करून दिले. त्याच्या बद्दलची जमानत सदाशिव पेठेंत राहणाऱ्या खंडेराव सराफानें दिली होती. करमरकरांच्या ठेक्याप्रमाणें त्यांच्याकडून मामल्याचा वसूल वेळेवर व्हावयाला जो पाहिजे होता तो झाला नाहीं. अर्ध्यावर सरकारची बाकी त्यांच्याकडे तुंबली आहे. तगादे करितां करितां कांहीं बाकी वसूल झाली. तरी निदान दोन लक्ष बाकी त्यांच्याकडे अद्याप सरकारची येणें आहे. त्यांचें घरदार सर्व चीज वस्त लिलांव केली, तेव्हां त्याचा सगळा कायतो पन्नास हजाराचा ऐवज पटला. बाकी दीड लक्ष रुपये सरकारी घेणें त्यांच्याकडे अद्याप निघत आहे. त्यांच्याकडून बाकी वसूल होण्याचा जेव्हां कांहीं रंग दिसेना, तेव्हां त्याच्या जामीनदारास बाकीबद्दल तगादा लावला. तो लुच्चा कवडीचुंबक सराफ बाकी लवकर देईना. त्यानें असेंच एक वर्षभरपर्यंत वायदे लावून चाळविलें. आज त्याला ढालाईत धाडून पकडून आणिलें.

बाजीराव—यांत गैर काय झालें!

त्रिंबक—त्याला पकडून आणून बाकीबद्दल काय तोड करतोस ह्मणून विचारलें, तर तो हरामखोर सरळ जबाब देईना. तेव्हां मला त्याचा अतिशय संताप आला. त्या संतापाच्या भरांत, श्रीमंतांच्या पायापाशीं मी खोटें बोलत नाहीं, मी त्याला एक ठोंसा लगावला; त्या बरोबर त्यानें मोठ्यानें ओरडून

सगळा वाडा गर्जून टाकला व मूर्च्छा आल्याचें ढोंग केलें. त्या सोंगाची त्यानें बतावणी चांगली केली. सुमारें दोन चार घटका तो तेथें तसाच पडून राहिला. मग त्याला त्याच्या घरीं पोंहचविलें, व त्याच्या घरावर पहारे ठेविले. दुपारी तो मेला अशी खबर आली. त्याच्या घरची सर्व मंडळी व शहरचे लोक त्याच्या मरणाचें खापर माझ्या माथीं फोडीत आहेत. त्याला मरण खरें कोणत्या रितीनें आलें, अथवा तें त्यानें आणिलें हें एका परमेश्वरास माहीत. त्या ब्राह्मणावर हात टाकल्याबद्दल श्रीमंतांच्या पाया शपत मला आतां फार वाईट वाटत आहे. ब्राह्मणाच्या मरणाला मी मात्र व्यर्थ कारण झालों.

बाजीराव—त्रिंबकजी, जाऊंदे. त्याबद्दल तूं आपल्या मनाला मुळींच वाईट वाटून घेऊं नकोस. तूं कांहीं तरी कारणाशिवाय असें कधीं करणार नाहींस, ही माझी पक्की खात्री आहे. माझा तुझ्यावर पूर्ण भरंवसा आहे. सरकारी वसूलवासलातीच्या कामांत अशी हयगय, इतका सुस्तपणा व दयामाया दाखवून कांहीं उपयोगी नाहीं. आजपर्यंत त्याचे वायदे ऐकिले हीच मोठी चूक झाली. याबद्दल त्याला झाली ही शिक्षा योग्य आहे. त्याच्या घरावर पहारे आहेतना ? ठीक आहे. त्याची सर्व मालमत्ता वसुलांपेठे सरकारांत जमा कर. मामले घेण्याचे वेळीं मोठे गोड वाटतें, ज्याच्या त्याच्या उड्या पडत असतात आणि वसुलाचा भरणा करण्याच्या वेळीं ही रड. तुझ्या मारण्यानें तो मेला नाहीं. तो कांहीं तरी खाऊन मेला. एका ठोंस्यानें कांहीं कोणी मरत नाहीं; बरें मेला असला तरी हरकत नाहीं. अशा रितीनें मरून जाऊन त्यानें सरकारची बाकी मात्र बुडविली.

त्रिंबक—दुसऱ्या लोकांनीं श्रीमंतांच्या कानावर भलताच मजकूर घालावा त्यापेक्षां जें आपल्या हातून झालें आहे, तें खरें खरें श्रीमंतांस विदीत केलें असतां बरें, ह्मणून चरणाजवळ आधींच मजकूर श्रुत केला आहे. मला श्रीमंतांच्या पायाशिवाय दुसरा आधार नाहीं व त्याशिवाय माझें दुसरें दैवत नाहीं. देव्हाऱ्यांत डोळे झांकून आणि बौध्य अवतार धारण करून बसणा-

ज्या देवांची सेवा चाकरी करून जें काय मिळणार, त्याच्या सहस्रपटीनें जास्त हे श्रीमंतांचे चरण मला देत आहेत.

बाजीराव—त्रिंबकजी, तूं माझा कलिजा आहेसरे. सर्व कामांत अशीच दक्षता ठेवीत जा.

त्रिंबक—दहापांच हजारांची गोष्ट असती तर मी तें इतकें मनावर घेत-लेंच नसतें. कारण हें मामल्याचें काम आहे. कुळें पळून जातात, पाणी पुरेसें नसतें, पाऊस बरोबर पडत नाहीं, नासतें, टोळधाडी पडतात, वगैरे अनेक कारणांनीं कुळाकडे बाकी थकते, नाहीं असें नाहीं. तेवढ्याकरितां सरकारचा मुळींच तगादा नसतो. आतां एका कुळाकडे सरकारची दीड लक्ष रुपये बाकी तशीच राहूं दिली, तर इकडे सरकारचे कारखाने चालायचे कसे ?

बाजीराव—सरकाराला सर्वांची काळजी असते. वेळप्रसंगीं खजिन्यांतून पैसे द्यावे लागतात. या वसुलाच्या कामांत कोणाची तक्रार ऐकत जाऊं नकोस. कमीत कमी वर्षाचें कांठीं निदान चाळीस पन्नास लक्ष रुपये शिल्लक राहिलीच पाहिजे. लोकांचें कांहीं झालें तरी ऐकायचें नाहीं.

(इतक्यांत भालदार चोपदार ललकारत गंगाधर शास्त्री पटवर्धन, बापू मैराळ वगैरे मंडळी येते.)

त्रिंबकजी—(मनाशीं) आपल्या बैलांचा तांडा पुढें करून मागून जसा लमाण येत असतो, त्याप्रमाणें आपल्या लवाजम्याची लांबच लांब मालिका लावून आणि आपला थाट लोकांना दाखवीत येणारे पटवर्धन शास्त्र्याखेरीज दुसरें कोण असणार. (उघड) यावें, वकीलसाहेब, यावें. बापूसाहेब, असें यावें. (सर्वांस निरनिराळ्या ठिकाणीं बसवितो.) बापूसाहेब, श्रीमंतांच्या निमंत्रणास वकीलसाहेबांनीं मान देऊन आज रंगास येण्याची तसदी घेतली, त्यामुळें श्रीमंतांस फारच आनंद होत आहे.

बापू—श्रीमंतांच्या आमंत्रणास कोण बरें मान देणार नाहीं. अशी संधि आज आली त्यामुळें वकीलसाहेबांसही तितकाच आनंद झाला आहे. पण ज्या कार्याकरितां वकिलसाहेब येथें आले आहेत, तें काम लवकरच झालें असतां त्यांना त्या दिवशीं आजच्या आनंदापेक्षां जास्त आनंद होईल.

गंगाधर—श्रीमंत पेशवे सरकारच्या दरबारीं येऊन मला सुमारें दीड वर्ष होत आलें. अद्याप सरकारी कामासंबंधीं पूर्वदिवसाचा प्रकार आहे. त्यांत कांहीं कमीजास्त झालेलें नजरेस येत नाहीं. ही पालिसी उभय पक्षांसही श्रेयस्कर नाहीं, व होण्याचें सुचिन्ह दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

बाजीराव—वकीलसाहेब, आपलें ह्मणणें वाजवी आहे. आपल्या कार्याला वरच दिवस झाले हें आह्मांलाही कबूल आहे. पण त्याला आमचा अगदीं नाईलाज आहे. या दरबारच्या फारा दिवसाच्या हिशेबाच्या भानगडी आहेत, त्याचा निकाल लागण्यास दिवसगत लागणार. पण आतां आपणाला आम्ही फार दिवस थांबवून धरीत नाहीं. लवकरच निकालास प्रकरण काढतों.

गंगाधर—हें काम लवकर निकालास येईल अशी आह्मी मोठी होप धरतों. येथील काम आटोपल्यावर आह्माला परत बडोद्यास लवकर गेलें पाहिजे. तेथें बखेडे बरेंच माजले आहेत, ते सर्व मोडून तेथें कामाची नवीन सिस्टीम व रिफार्म सुरूं करून सर्व कामें सुरळीत चालवावयाची आहेत. त्याबद्दलची सर्व रिसपान्सीबिलीटि रेसिडेन्ट साहेबांनीं आमच्या मस्तकावर ठेविली आहे.

बाजीराव—काय ह्मणालात? आपण नवीन सिसिटीम, सिसिटीम तें काय?

गंगाधर—नवीन सिस्टीम, सिस्टीम, ह्मणजे नवीन प्रकारची राज्यशासन पद्धती. ती तेथें सुरूं केली आहे. ती पुरी केली पाहिजे. नाहीं तर धड हें नाहीं आणि तें नाहीं, असें होऊन सर्व डिपार्टमेन्टमध्यें घोंटाळाच घोंटाळा माजून जाईल. तशी राज्यशासन पद्धती श्रीमंतांनीं आपल्या दरबारांत सुरूं करावी. त्यांत दरबारचें अत्यंत मोठें इन्टरेस्ट आहे. पण ती आपल्या येथील लोकांना रुचणार नाहीं. ते सर्व ओल्ड फूल्स आहेत.

बाजीराव—आमच्याही विचारास आपलें ह्मणणें येतें. पण त्याला आपल्यासारखा मोहरक्या पाहिजे. तेव्हां तें सर्व सुरळीत चालणार.

गंगाधर—अलबत, त्या कामाकरितां एखाद्या वाईज स्टेट्समनची नेसिसिटी अवश्य आहे. तो मनुष्य मोठ्या स्ट्रांग क्यारेक्टरचा व वुईलचा असला पाहिजे, आणि त्याला वाकरसाहेबासारख्या रेसिडेन्ट सांहेबांचे चांगलें

पाठवल पाहिजे. नाहीं तर तेथील माजी सीतारामपंत दिवाणासारखी मूर्ख, लुच्ची, बदमाष आणि अप्पलपोटी मंडळी आपली तुंबडी भरून आपसांत तंटे लावून दरबारचें नुकसान केल्याशिवाय कधीं राहणार नाहीं. हरदास, पुराणिक, भट्ट, जासूद याचें तें काम नव्हें.

सदाशिव—(हळूच त्रिंबकजीच्या कानाशीं लागून) श्रीमंतांच्या या बोलण्याचा भावार्थ काय ?

त्रिंबक—त्यांतील भावार्थ तसाच गूढ आहे. अहो मोठे ते मोठे ! त्यांचें अंतःकरण कोणाला कळणार ? (बापू मैराळाकडे वळून) यांतला भावार्थ आपल्या लक्षांत येऊन चुकला असेल.

बापू—नाहीं माझ्या देखील लक्षांत आला नाहीं.

त्रिंबक—हें आपण उगीच वेड्याचें सोंग घेतां ?

बाजीराव—माझें ह्मणणें तरी तेंच आहे. जो ज्या कामाचा वाकबगार नाहीं त्याच्या हातून तें काम कधींच होणार नाहीं. जोंपर्यंत आपण येथें आहांत तोंपर्यंत थोडथोडी नवीन पद्धती कशी सुरू करायची, याबद्दल आपण योग्य सल्ला नित्य देत जावी. आम्ही ती मोठ्या खुषीनें ऐकूं. यामुळें येथें आपलें राहणें जास्त दिवस झालें तर, त्याबद्दल आपल्यावर मुळींच ठपका येणार नाहीं. आह्मी बडोद्यास लिहूं. तें दरबार काय आणि हें दरबार काय दोन्ही आपणास सारखींच आहेत.

त्रिंबक—मी ह्मणतो कीं त्या दरबारपेक्षां याच दरबारची मातबरी जास्त आहे. जो पुरुष गायकवाडीच्या गादीवर बसेल, त्याला बहुमानाचा व गादीनशीनचा पोषाक देऊन कायम करण्याचा याच दरबारचा अधिकार आहे, हें वकीलसाहेबास देखील माहीत असेल.

गंगाधर—पूर्वकालीं तशी स्थिती होती. पण सांप्रतकाळीं वस्तुस्थिति तशी नाहीं. वसईच्या तहामुळें दोन्ही दरबारचीं नातीं सारखींच झालीं आहेत.

त्रिंबक—पण तो अधिकार व हक्क अद्याप कायम आहे.

बाजीराव—आह्माला राज्याची नवीन पद्धत घालून दिल्याबद्दल मोठा आनंद होईल, व त्याबद्दल वकीलसाहेबांचा आह्मी मोठा मानसन्मान करूं.

गंगाधर—त्या गोष्टी सध्यां होऊं शकत नाहींत. आमच्या मागें आमच्या महाराजांची या कामासंबंधानें अगदीं निकड लागली आहे. श्रीमंतांनीं याचा निकाल लवकर केल्यास ठीक आहे, नाहीं तर रेसिडेन्ट साहेबांच्या हातीं हें काम सोंपवून आह्मी बडोद्यास निघून जाऊं. हें श्रीमंतांनीं पूर्णपणें लक्षांत ठेवावें.

बाजीराव—वकीलसाहेब आपल्या ह्मणण्याप्रमाणें लवकरच निकाल लावूं.

(इतक्यांत कारखानदार येऊन रंगाच्या तयारीची वर्दी देतो.)

वकीलसाहेब चलावें. त्रिंबकजी सर्वांना खालच्या मंडपांत घेऊन चला.

(सर्वजण जातात. पडद्यांत रंगाची गडबड व गलबला होतो.)

प्रवेश चवथा.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील चौक.

पात्रें—चांदीच्या कड्यांच्या झोंपाळ्यावर सर्व स्त्रियां बसल्या आहेत. रंग व गुलाल गोटे उडत आहेत, असा पडदा उघडतो. ताई, पार्वतीबाई वगैरे स्त्रिया बसल्या आहेत.

ताई—(लगबगीनें इकडे तिकडे फिरून) अहो कारखानदारसाहेब, रंगाच्या कढया आणखी भरून तयार करण्यास सांगा. गुलालाचे थैले व गुलाल गोट्यांच्या शेंकडों पाट्या येथें आणून ठेवा. भिमे, ए सटवे, बाईसाहेबांस रंग खेळण्याकरितां घेऊन ये. त्या यायच्या नाहींतच, पण आपल्याला त्यांना मोठ्या मानानें बोलावलें पाहिजे. खरें ह्मटलें ह्मणजे, हा सर्व समारंभ त्यांच्या घरचा. त्यांनीं पुढें होऊन आपल्या घरीं आलेल्या बायकांचा समाचार घेतला पाहिजे. पण तें त्यांना कांहीं नाहीं. आपल्या महालांतून त्यांना मुळीं कधीं बाहेरच पडायला नको. भिमे, मी ह्मणतें तें खरें कीं खोटें ग?

भीमा—(मनाशीं) बये, तुझ्यासारख्या बाईचा पगडा वाड्यांत बसला ह्मणजे सत्वशील बायकांची अशीच माती व्हावयाची. (उघड) ताई मी आपल्या सांगितल्याप्रमाणें सर्व करतें.

ताई—[जरा रागानें डोळे वटारून] काय ह्मणालीस.

भीमा—नाहीं ह्मटलें ताईसाहेब, मी सांगितल्याप्रमाणें करतें.

ताई—मग त्याला वायदे कसले एवढे सांगतेस. चटकन चालती कां होत नाहींस. टवळे, सटवे, अवदसे जा लवकर. गुलाल संपला, व कढया रिकाम्या होत चालल्या हें तुला दिसत नाहीं. (ती जाऊं लागते) अग ए श्रीमंतांना जाऊन वर्दी दे. त्या बरोबर (तेव्हां हळूच कानांत सांगतें). त्रिंबकजीसही सांग. त्यांस वरच्या गच्चीवर असण्यास कांहीं हरकत नाहीं असें मीं सांगितलें आहे ह्मणून कळीव. ते तेथें आले ह्मणजे मला निरोप सांग. [ती जाते] (बापू मैराळाच्या बायकोकडे वळून ह्मणते) पार्वतीबाई, आज सुद्धां वकिलीण बाईनीं येणें केलें नाहीं. त्यांचे पूर्वीचे यजमान जे फडके, त्यांच्या घरच्या स्त्रिया श्रीमंतांच्या घरीं कशा राबतात हें तुह्मी पहातच आहां, मग त्यांना श्रीमंतांच्या वाड्यांत येण्यास कोणती बरें हरकत आहे. पूर्वीच्या नात्याप्रमाणें ह्मटलें तर श्रीमंत त्यांच्या यजमानाचे यजमान आहेत, असें असून त्यांनीं एवढी आढ्यता कशाला धरावी. मला वाटतें याचमुळें बाईसाहेबही आल्या नसाव्यात. त्यांना व श्रीमंतांना याबद्दल फार वाईट वाटलें असावें. आजची याद खुद्द श्रीमंतांकडून झाली आहे. त्या नाहीं आल्या पण तुह्मी तरी बोलावल्यासारख्या आलात यायोगानें मला मोठा आनंद होतो. आल्या गेल्याशिवाय मनुष्याची ओळख होणार कशी व सहवास तरी होणार कसा. तुह्मी आणि त्या बडोद्याहून बरोबरच आलांत. त्याला चार सहा महिने झाले. तितक्या वेळांत तुह्मी दोन तीन वेळ आला; ह्मणून तुमची व माझी ओळख झाली. मला किनई तुह्मी माझ्या जिवलग मैत्रिण, अगदीं पाठच्या बहिणीप्रमाणें वाटतां. त्यांनीं एकदां सुद्धां वाड्यांत पाऊल ठेवलें नाहीं. मला वाटतें त्यांचा स्वभाव तुटक आहे.

पार्वती—असें नाहीं कांहीं. त्यांच्या मनांतून यायचें होतें. पण यजमान साहेबांनीं आज्ञा दिली नाहीं. तेव्हां त्यांनीं मला जाण्यास सांगितलें; आणि म्हणून मी आलें.

ताई—असेंच बोलावलें म्हणजे येत जा. बरें, तुमच्या बडोद्यासही रंग होत असेल; नाहीं ?

पार्वती—हो, होतो. मी कधीं वाड्यांत गेलें नाहीं.

ताई—काय तर तुमच्या दृष्टीस असा राजवाड्यांतील समारंभ कधींच पडला नाहीं म्हणायचा.

पार्वती—हो असें खरें !

ताई—प्रत्येक सणाला असे समारंभ करावे, सर्व स्त्रियांनीं आपल्या वाड्यांत यावें, आपण त्यांना देणग्या द्याव्या, अशी श्रीमंतांना व त्यांचे मुख्य मंत्री त्रिंबकजी डेंगळे यांना याबद्दल मोठी हौस आहे. अशा समारंभाला ते पुष्कळ पैसे खर्च करतात. कोणाला ह्मणजे कोणत्या तरी निमित्यानें श्रीमंतांकडून कांहीं पोंहचलें नाहीं असें झालेंच नाहीं. संक्रांतीच्या दिवशीं प्रत्येक बायकोला तांब्यांची एकेक घागर, एकेक मोठें लुगडें आणि जरीकांठी खण; अशा दोन हजार बायकांस श्रीमंताकडून वाणें वाटलीं गेलीं. बसंत पंचमीच्या दिवशीं तुह्मी होताच. आज देखील रंग झाल्यानंतर सर्व स्त्रियांना उंची पातळें व खण देण्याचें ठरलें आहे. त्याप्रमाणें जामदारास हुकुमही दिला आहे. असें प्रभू मागें झालें नाहींत व पुढेंही होणार नाहींत.

पार्वती—पण समारंभांत बाईसाहेब नाहींत हें कसें ? बसंती पंचमीच्या दिवशीं देखील त्या नव्हत्या.

ताई—अहो श्रीमंत करतात तें त्यांना आवडत नाहीं. असेंच तर जिकडे तिकडे आहे. दांत आहेत तर चणे नाहींत आणि चणे आहेत तर दांत नाहींत. स्वभावापुढें कांहीं इलाज आहे कां ? हं: पार्वतीबाई, गुलाल गोटे घ्या, फेंका. आतां येथें संकोच धरूं नका, चालूंद्या मीच प्रथम फेंकते. (ती गुलाल उधळते) सगुणाबाई, सत्यभामाबाई चालूंद्या. अरे नारोबा रंगाचे बंब चालीव. पार्वतीबाई, ही घ्या तुह्मी पिचकारी. (रंग उडवितात, गुलाल गोटे फेंकतात.)

पार्वतीबाई—(हातांत पिचकारी घेऊन). ताई, मला किनई नाहीं बाई उडवितां येत. मला लाज वाटते. माझ्या कानांत रंग गेला.

ताई—अहो त्यांत अवघड तें काय ? ही अशी उडवायची ! [असें ह्मणून पिचकारी उडविते] उडवा आतां. [भिमी येते.]

भीमा—(ताईच्या कानाशीं लागून) त्रिंबकजी, व सरकार गच्चीवर आले आहेत.

ताई—बरें, टवळे जामदाराकडे जाऊन पातळांचीं दिंडें आणून ठेवण्यास सांगितलेंस कीं नाहीं.

भीमा—हो आतां तिकडेच जातें.

ताई—रांडे, अद्याप तिकडे गेलीच नाहींस. दोन घटका नुसता निरोप सांगण्यातच घालविलास. जा टळ एकदांची.

भीमा—[आपल्याशीं] अवदसे, थांब एखादा असाही दिवस येईल कीं ज्या दिवशीं तूं माझ्या पाया पडशील, मी तुझी वेणी धरून तुला फरफरा ओढीन व सगळ्या पुण्याला तुझें खरें रूप दाखवीन. [ती जाते]

ताई—[स्त्रियांकडे पाहून] बायानों, कांहीं एक संकोच न धरितां रंग खेळा. मला वाटतें आपण झोंपाळ्यावर बसून कांहीं जणींनीं गाणीं ह्मणावीं. रमाबाई, सत्यभामाबाई हं:, ह्मणा गडे. त्याशिवाय मजा नाहीं. [झोंपाळ्यावर बसतात.

रमा—आह्माला गाणें येत नाहीं.

ताई—सत्यभामाबाई तुह्मी ह्मणा. श्रीमंत सवाई माधवराव पेशवे रंग खेळले होते तें गाणें तुह्माला चांगले ह्मणतां येतें. तें ह्मणा बरें कां. [ती गाणें म्हणतें.]

पार्वती—खरेंच बाई, यांचा गळा किती तरी गोड आहे. पुन: तें ऐकावेसें वाटतें.

ताई—पार्वतीबाई, तुमची मर्जी असेल तर त्या पुन: ह्मणतील, पण तुह्मी देखील एखादें ह्मटलें पाहिजे. तुमच्या तोंडचें आह्माला कधीं ऐकायला सांपडणार.

पार्वती—ताई, मला गळा नाहीं बरें. नाहीं तर मी ह्मणायला कांकू मुळींच केली नसती.

ताई—जसें येईल तसें ह्मणा.

पार्वती—ह्मणतें बापडी. [ती गाणें ह्मणते]

ताई—वा, किती तरी गोड म्हटलेंत. शाबास, हें घ्या तुम्हाला बक्षिस. [असें म्हणून तिच्या अंगावर पिचकारी व गुलाल टाकते.]

पार्वती—ताई ही कां बक्षिसी दिलीत. मग मी तुम्हाला देईन. (ती पिचकारी घेऊन तिच्या अंगावर उडविणार तों मध्यें त्रिंबकजी येतो. त्याच्या अंगावर ती पिचकारी उडते. पार्वतीबाई चपापते, व हातांतील पिचकारी टाकून लाजून बाजूला उभी राहते.)

त्रिंबक—ताई, ताई कांहीं कमी नाहींना? कोणतेंही कमी पडूं देऊं नका. गुलाल गोट्याच्या पाट्या व रंगाच्या कढया तयार आहेत. त्याचप्रमाणें पातळांचीं दिंडेंही वरतीं आणून ठेविलीं आहेत. तुमचा रंग खेळणें झाल्यानंतर सर्वजणींना नवीन पातळें दिल्याशिवाय जाऊं देऊं नका. ओलवस्त्यानें कोणीही घरीं जाऊं नये, अशी श्रीमंतांची आज्ञा आहे. हं: चालूंद्या तुमचा रंग!

ताई—मी त्याचबद्दल निरोप पाठविला होता. काय आपल्याही अंगावर रंग उडालाना?

त्रिंबक—(हळूंच) अहो मुद्दाम आमच्या अंगावर कोणी रंग टाकावा, इतके भाग्यवान आह्मी आहोंत कुठें! येतां येतां सहज त्यांच्या हातचा अंगावर पडला, यांतच आह्मी आपल्याला दैववान समजतों. ताई, कोल्हा काकडीला राजी!

ताई—नशिबवानांचीं कामेंच तीं. कोणीकडून तरी आपोआप अंगावर येऊन पडला कीं नाहीं.

त्रिंबक—बरें तुह्मी ह्मणाल तें खरें. आह्मी जातों. तुमच्या खेळण्याच्या कामांत आणि आमच्या डोळ्याच्या पाहण्याच्या कामांत उगीच व्यत्यय नको. [जरा बाजूला होतो, तों बाजीराव पेशवे येतात.]

बाजीराव—[त्रिंबकजीस बाजूला घेऊन] त्रिंबकजी, गड्या कशी मौज चालली आहे. हें पाहून मनाला मोठा आनंद होत आहे. कायरे त्या पटवर्धन शास्त्र्याची यांतील बायको रे कोणची? ती सडपातळ आहे ती. ती तर पोरगेली दिसते.

त्रिंबक—[मनाशीं] आमचें ज्या ठिकाणीं लक्ष गेलें, त्याच ठिकाणीं

यांचेंही मन धांव घेत आहे. तेव्हां यांस आतां झुंकाडी देऊन वरच्यावर उडविलें पाहिजे. [उघड] त्यांच्यापैकीं कोणीच, आले नाहींत. तो शास्त्री मोठा घमेंडखोर व गर्विष्ट आहे. त्याला या गोष्टी आवडत नाहींत.

बाजीराव—बरें आज नाहीं उद्यां केव्हां तरी येईल. ताईला सांगितलें ह्मणजे झालें. ही देखील रूपानें कमी नाहीं. बरें चल पाहूं मग. बाजीराव मनांत आणील तें करील. (रंग उडतो.व सर्वजणी जातात.)

अंक तिसरा.

प्रवेश पहिला.

स्थळ—त्रिंबकजीची खोली.

पात्रें—भगवंतराव, गोविंदराव आणि त्रिंबकजी.

गोविंदराव—त्रिंबकजी, या शास्त्र्याला जर तुह्मी परत बडोद्यास जाऊं दिलें तर तुमचें सर्व काम बिघडलें ह्मणून समजा. तेव्हां त्याला कसेंही करून येथून परत जाऊं देऊं नका. निदान आणखी चार सहा महिने तरी जाऊं देऊं नका. त्यानें कांहीं दिवसापूर्वीं मुद्दाम सांडणीस्वाराबरोबर पत्र पाठविलें आहे; हें मीं तुह्माला त्या दिवशींचे त्या दिवशींच कळविलें होतें. काल तो टोपीवाल्याकडे जाऊन आला आणि त्यानें ' आह्मी लवकर निघून येतो, इकडील कामाचा निकाल लागत नाहीं, तेथें आल्यानंतर रेसिडेन्ट साहेबांच्या मार्फत उलगडा करून घेऊं. त्यांच्याच मध्यस्तीनें कामाचा निकाल लागेल, एरव्हीं लागण्याचें चिन्ह नाहीं.' असें काल पुन्हां मुद्दाम पत्र पाठविलें. तेव्हां सावध रहा बरें.ही शिकार येथून एकदां कां तुमच्या हातांतून सुटून गेली म्हणजे मग हातीं लागणें कठीण. आपलीं सर्व कारस्थानें बाहेर पडतील.

भगवंत—त्रिंबकजी, हें पहा दिवाण सीतारामपंताचें पत्र. त्यांत ते या शास्त्र्याच्या अंमलदारींमध्यें बडोद्याचे लोक किती त्रासून गेले आहेत तें लिहीत आहेत, त्यावरून तुमची खात्री होईल. अहो, अनंतराव महाराज ह्म-

णजे निव्वळ शंभू. फत्तेसिंग बोवा ते फत्तेसिंग बोवा. त्यांना हा शास्त्री ह्मणजे शहाणपणाचा पुतळा वाटतो. ते त्याला केवळ देव समजतात. या लुच्च्यानें टोपीवाल्याचा हात शिरकावून, आपलें स्थान भक्कम करून, टोपीवाल्याचे व त्या उभयतां बंधूंचे कान फुंकून आमच्या सारख्या त्यांच्या वंशजाची धूळदाण मांडिली आहे. आमच्यावर नानातऱ्हेचे खोटें आळ आणून आह्माला देशोधडी लावलें आहे, व तेथील आमच्या आप्तांच्या आतां तो माना मुरगाळीत आहे. अनंतराव व फत्तेसिंग गायकवाडांनीं ज्या गोविंदराव महाराजांच्या पोटीं जन्म घेतला, त्यांच्याच पोटीं आह्मीही घेतला आहे. आह्मी दासीपुत्र झालों ह्मणून काय झालें. वडिल तर आमचे एकच कीं नाहीं. आमचा गायकवाडींत कांहींएक हक्क असूं नये, आह्मी आपलें घरदार सोडून देशांतरी भटकत रहावें, आणि आपलें नांव छपविण्याकरितां यःकश्चित हुजऱ्याची नोकरी करावी अः ! धिःकार असो आह्माला. हें सर्व या हरामखोर शास्त्री कारभाऱ्याचें काम आहे. प्रत्यक्ष तरुताबाई महाराणी बाईसाहेबाला यानें त्राही भगवान केलें आहे, ज्यानें आमच्या आप्तांचे हाल केलें आहेत व आह्माला देशोधडी लाविलें; त्याला त्याच्या कारभाऱ्याच्या गादीवरून आह्माला हुसकावून देतां येऊं नये काय ? आह्माला त्याची मुंडी मुरगाळण्यास संधी सांपडली पाहिजे. अरेरे, काय करूं ! हा शास्त्री माझ्या तावडींत केव्हां सांपडेल आणि मी याची मान केव्हां मुरगाळीन असें मला झालें. जाऊन करूं कां तें काम !!

त्रिंबक—भगवंतराव महाराज, हें काय ? धीर धरला पाहिजे. तसें करण्याची आज स्थिति नाहीं. तो आज फौजबंद आहे. त्याला टोपीवाल्याचें चांगलें पाठबळ आहे. मोठ्या विषारी काळ्या सर्पाला युक्तीनें धरून पेटाऱ्यांत घातला पाहिजे, किंवा अडचणींत धरून ठेंचून तरी टाकला पाहिजे. तो मोकळा मैदानांत असतां, त्याच्या शेंपटीवर पाय देऊन त्याला आज चिडविणें हें धोक्याचें काम आहे. तुह्मी उभयतांनीं आजपर्यंत जशी कामगिरी बजावलीत व कष्ट सोसलेत, त्याचप्रमाणें आणखी कांहीं वेळ कळ सोसा. तुमच्या श्रमाचें चीज खास झाल्याशिवाय राहणार नाहीं.

गोविंद—पटवर्धन शास्त्री कांहीं अंशीं बरा मनुष्य आहे, पण त्याचा मुतालिक तो बाप्या मैराळ तो त्याच्या हातांत दिवटी देतो; त्यामुळें शास्त्री मजकूर मग लागतात दिवट्या पाजळायला. 'येथील काम असेंच आहे, कांहीं निकाल व्हावयाचा नाहीं, येथें सर्व शागिर्द, हरदास, जासूद मंडळी भरली आहे, एकालाही अक्कल नाहीं,' वगैरे रोज त्याच्या कानाशीं किटकिट करून त्याचें मन त्यानें बहकून सोडलें आहे. त्यामुळें काम जास्त बिघडतें. तेव्हां त्याचाही बंदोबस्त केला पाहिजे.

भगवंत—अहो त्रिंबकजी, कष्ट कष्ट ह्मणून माझ्यासारख्या राजपुत्रानें किती सोसावें. अहो यःकश्चित मी त्या पारसुटल्याचा चाकर किहो बनलों ! आणखी मीं काय करावें सांगा. हें पहा, (असें ह्मणून गांठोडें खालीं ठेवतो.) हें आमच्या मावशीनें गुपचूप खर्चास पाठविलें आहे. याचा मला या माझ्या स्थितींत काय उपयोग ! सर्व चोरीचा मामला.

त्रिंबक—(गांठोडें सोडून) आपण जी ठेव माझ्या जवळ ठेवणार होता ती हीच वाटतें.

भगवंत—त्यापैकीं थोडीशी आहे व आजही आणखी आली आहे.

त्रिंबक—(जवाहिर हातांत घेऊन) वा, एकेक जिन्नस पाहण्यासारखा आहे. नागपुरच्या भोंसल्याजवळ आणि बडोद्याच्या गायकवाडाजवळ बहुमोल आणि अप्रतिम जवाहिर असल्याचें आजपर्यंत नुसतें कानानीं ऐकत होतों, आतां त्यापैकीं कांहींसें दृष्टीस पडल्यामुळें दृष्टी निवली. ज्याप्रमाणें लौकिक ऐकत होतो त्याप्रमाणें हें आहे खास ! गोविंदराव, पहा तर खरें या हिऱ्याचें तेज ! तसेंच मोत्याचें पाणी कसें आहे. दाणा अगदीं एकजात वाटोळा आहे. त्याचप्रमाणें ही माणकाची लहानशीच आंगठी आहे, पण ती मंगळाच्या चांदणीप्रमाणें चमकत आहे.

गोविंद—मीं सर्व पाहिलें आहे.

त्रिंबक—हो तुमच्या घरीं या चिजा काय कमी आहेत. आमच्या सारख्याच्या नजरेस या चिजा पडण्याचा संभव नसल्यामुळें आह्मांला त्यांचें एवढें कौतुक वाटतें इतकेंच. (तें पाहतां पाहतां) अरे, ही यांत चिट्ठी क-

सली ! भगवंतरावजी, पहा बरें ती तुह्मी वांचून ! कांहीं ती तुमच्या गुप्त मजकुराची असली तर ती आपण कशाला वाचावी. (मनाशीं) हें हातीं आल्यावर त्या कागदाच्या चिटोऱ्याला घेऊन मला काय करायचें आहे. असेल कांहीं तरी पांढऱ्यावर काळें केलेलें, झालें; दुसरें, त्यांत रडकथेशिवाय असणार काय ? आणि असलें तरी येथें कोणा लेकाला वाचतां येतें.

भगवंत—(गोविंदरावास चिठ्ठी दाखवितो) ते दोघे एकमेकांकडे पाहून चकित होतात.

त्रिंबक—भगवंतराव महाराज, गोविंदराव, कां असे तुह्मी चकित कां जाहलांत ? काय आहे असें यांत. तुमच्या चेहऱ्यावरून त्यांत कांहीं तरी चमत्कारिक मजकूर असावा असें मला वाटतें. (एकीकडे) यापेक्षां ती चिठ्ठी फार महत्वाची असली पाहिजे. तें काय आहे तें प्रथम पाहिलें पाहिजे. हें स्वस्थपणें पाहतां येईल. (असें ह्मणून गांठोडें बांधून ठेवतो.)

गोविंद—शेवटीं सितारामपंतास कैदेंत टाकलें अं: ! हें सर्व या लुच्चाचें कारस्थान. त्यानें येथून लिहून परभारें काम करविलें.

त्रिंबक—काय, सितारामपंतास कैद केलें. केव्हां !

भगवंत—झालें, पंधरा दिवस झालें. आमच्यापैकीं मुख्यास त्यानें कारागृहांत घातलें. आमचे पायच आतां मोडल्यासारखे झालें. त्रिंबकजी, यानें येथें बसल्या बसल्या जर फत्तेसिंग महाराजाकडून हें कारस्थान केलें, तर तो तेथें गेल्यावर काय अनर्थ करील हें सांगवत नाहीं. कसेंही करून याला येथून परत बडोद्यास जाऊं देतां कामा नये.

त्रिंबक—अशी गोष्ट झाली अं: ! ठीक आहे. भगवंतरावजी, आणा ती चिठ्ठी इकडे. मी आतां श्रीमंतांकडे जाऊन त्यांच्या कानावर ही गोष्ट घालतों व कांहीं तरी युक्ति काढून त्याला सध्यां राहून घेण्याचें ठरवितों. भगवंतराव, तुह्मी याविषयीं आणि तुमच्या कामाविषयीं बेफिकीर असा. गोविंदराव तुह्मी आपल्या कामगिरी आतां जास्त सावधगिरीनें रहा व काय काय गोष्टी होतात त्याची बातमी रोज देत चला. जा. सदाशिव माणकेश्वर व बापू मैराळ यांजवर चांगली नजर ठेवा.

दोघे—त्यांत आळस होणार नाहीं. (ते जातात)

त्रिंबक—(ते गेलेसें पाहून) हें आतां माझ्या हातीं आलें. कित्येक वेळां खुळ्यांच्या बरोबर आपलें काम साधून घेण्याकरितां खुळें व्हावें लागतें.

(जातो.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—शनवारचा वाडा.

पात्रें—बाजीराव आणि त्रिंबकजी.

त्रिंबक—-रंगाच्या दरबारच्या दिवशीं, त्या शहाण्यांतल्या शहाण्या पटवर्धन शास्त्र्यानें श्रीमंतांच्या दरबारास शागिर्द, जासूद वगैरे मंडळींचें दरबार ठरविलें, हें असेलच श्रीमंतांच्या ध्यानांत. आपल्या शहाणपणाची केवढी त्याला आढ्यता; तो आपल्या बोलण्यांत त्याची किती ऐट दाखवीत होता. प्रत्येक वेळेला त्या फिरंगी भाषेंतील शब्द मध्येंच किती घुसडीत होता. बडोद्यास गेला, थोडेसें फिरंगी बोलायला यायला लागलें, तितक्यांत रेषा उपटली आणि टोपीवाल्याच्या मदतीनें जरा कुठें कारभार हांकायला लागला तो लगेच त्याला दोन बोटें स्वर्ग उरला व सर्व जग ह्मणजे महा मूर्ख असें त्याला वाटूं लागलें. पण ह्मणावें, फडक्यांच्या घरीं आपण देखील कांहीं वर्षें पुराणच वाचीत होता. हा पटवर्धन शास्त्री ते दिवस विसरला. त्याचे डोळे फाटले; अधिकाराच्या धुंदीनें तो वेडा झाला आहे, ह्मणून त्याला आपण कोठें व काय बोलतों याचें भान राहिलें नाहीं. त्या दिवशीं मला असा राग आला होता कीं सांगतां सोय नाहीं. पण काय करावें ? श्रीमंतांकडे व त्या वेळच्या समयाकडे पाहून गप्प बसावें लागलें. त्याच्याच तोडीचा त्याचा तो मुतालिक बापू मैराळ. श्रीमंत, या शास्त्र्यानें टोपीवाल्याच्या हिमायतीवर बडोद्यास फारच अनर्थ करून सोडला आहे. काय सांगू, येथून त्यानें बसल्या बसल्या माजी दिवाण सीतारामपंत यांस कैद करविलें. गहिनाबाई, तख्ताबाई वगैरे बाया मंडळी याच्या जाचानें अगदीं त्रासून गेली आहेत. याबद्दल मजजवळ लेखी पुरावा आहे. हा पहावा. (असें ह्मणून पत्र पुढें करतो) तिकडची मंडळी ह्मणते कीं जर हा शास्त्री इकडे लवकर येणार नाहीं, किंवा

मुळींच येणार नाहीं, तर आह्मी आपल्यास मोठे भाग्यवान समजूं. तेथील लोकांस छळायचें असेल ह्मणून तो तिकडे जाण्यास घाई करतो, हेंही श्रीमंतांच्या त्याच्या त्या दिवशींच्या बोलण्यावरून ध्यानांत आलेंच असेल.

बाजीराव—काय आहेरे वाच पाहूं!

त्रिंबक—[मनाशीं] आली पुनः पंचाईत! [उघड] या पत्राचें अक्षर मोठें खराब आहे. कांहीं केल्या लागत नाहीं. पहातों प्रयत्न करून. [वाचल्यासारखें करतों] मीं सांगितलें तेंच त्यांत लिहिलें आहे. श्रीमंत हें पत्र असें आधून मधून आलें नाहीं. अगदीं खुद्दाकडून येथें जी दोन खुद्द मंडळी आहेत, त्यांच्याकडे आलें आहे.

बाजीराव—कोण? भगवंतराव आणि गोविंदराव यांजकडे आलें आहे. काय, तर ते अद्याप येथेंच आहेत.

त्रिंबक—होय कांहीं महत्वाच्या कामाकरितां मीं त्यांना येथें ठेवून घेतलें आहे; व दोघांकडे दोन कामें सांगितलीं आहेत. तीं कामें ते इतक्या इमानदारीनें आणि हुशारीनें बजावीत आहेत कीं, त्यांच्याबद्दल कोणाला हें खरें कोण याविषयीं शंका सुद्धां येत नाहीं.

बाजीराव—त्रिंबकजी, तूं त्यांच्याकडे अशीं कोणचीं कामें सांगितलीं आहेस.

त्रिंबक—श्रीमंत, आतां आपल्या जवळ चोरून कशाला ठेवूं. भगवंतराव याला होनाजी ह्मणून त्या पारसुटल्यापाशीं नोकर ठेविला आहे आणि गुणाजी ह्मणून गोविंदराव खुद्द पटवर्धन शास्त्र्यापाशीं हुजरे ह्मणून आहेत.

बाजीराव—शाबास, त्रिंबकजी शाबास! ज्या त्या कामांत तुझी अशी हुशारी माझ्या नजरेस येते, त्यामुळेंच तूं मला नेहमीं आवडतोस; व तुझ्यावर सर्व कामें विश्वासानें सोंपवावीशीं वाटतात. माझी आज्ञा जेवढ्याबद्दल होतें तेंवढेंच काम करून तूं राहत नाहींस, तर आपल्या अक्कलहुशारीनें तें तूं जास्त करतोस.

त्रिंबक—ही श्रीमंतांची मजगरिबावर कृपा आहे. मी काय यःकश्चित् माणूस. केवळ श्रीमंतांच्या पायाची धूळ. या पायाच्या धूळीनेंच माझ्या क-

पाळाचीं वाईट अक्षरें पुसून त्या ठिकाणीं दुसरीं चांगलीं अक्षरें लिहिलीं व मला वैभवास चढविलें. माझ्या सारखीं हजारों माणसें श्रीमंतांच्या पदरीं आहेत. जन्मोजन्म या पायाची चाकरी करण्यास मिळावी व माझ्या चाकरीनें मीं माझ्या प्रभूचें मन सदोदित राजी राखावें; यापेक्षां माझें देवापाशीं कांहीं-एक मागणें नाहीं. पण दुसऱ्याचें चांगलें झालेलें पहावत नाहीं, असे सदाशिव माणकेश्वरासारखे विघ्नसंतोषी लोक कांहीं कमी नाहींत म्हणून करद्वय जोडून ही—

बाजीराव—तो लुच्चा, बेईमान, अरे त्याच्यासंबंधीं मीं तुला जी कामगिरी सांगितली होती त्याचें कसें काय झालें ?

त्रिंबक—त्याच कामाकरितां भगवंतरावाला शेट मोदीपाशीं ठेवलें आहे. सरकार, त्या कामांत भगवंतरावानें चांगली हुशारी दाखविली. पूर्वी ते दोघे जितके जिवलग स्नेही होते, तितकेच ते आतां एकमेकांचे हाडवैरी बनत चालले आहेत. त्यांत कर्नाटकची सरसुभेदारी मोदीस दिल्यामुळें सदाशिव माणकेश्वर त्याच्यावर एकसारखा दांत ओंठ खात आहे; व त्याच्या कारभाराच्या रोजच्या कागाळ्या माझ्यापाशीं येत आहेत. त्या म्हणजे सर्वथैव खोट्या आहेत असें मी म्हणत नाहीं. कांहीं तरी शेटजीच्या कारभारांत पाणी मुरत आहे. तो, दिलेला नजराणा वसुल केल्याशिवाय व ज्ञातारपणीं स्वस्थ बसून खातां यावें म्हणून आपली तुंबडी भरल्याशिवाय कधीं राहणार नाहीं. कारण टोपीवाल्याकडे आतां त्याचें पूर्वीप्रमाणें वजन नाहीं. सदाशिव माणकेश्वरानें शास्त्र्याकडून रेसिडन्टाच्या कानांवर त्याचे बोभाटे घालून त्याचें कारस्थान बरेंच उघडें पाडलें आहे. आणखी कांहीं दिवस वाट पाहून त्याला परत बोलवावा, व त्याच्या कडून त्याच्या कारभाराचा हिशेब घेववावा. म्हणजे दोघांचें असें जुंपेल कीं ते एकमेकांचे गळे कापायला खास तयार होतील; आणि आपलें काम अनायासेंच साधेल ! सदोबा माणकेश्वर असामी कांहीं कमी नाहीं. त्या दोघांनीं संगनमत करून आजपर्यंत श्रीमंतांच्या खजिन्यांत पडणारी भर परभारें आपल्या घरीं भरली आहे. त्या पारशाची सरसुभेदारीवर नेमणूक झाल्यानंतर तो दोन चार दिवसांनीं मजकडे

येऊन संतापानें ह्मणाला कीं, जर नजराण्यामुळें मला मिळणारी सरसुभेदारी त्याला मिळाली असेल, तर त्यानें दिलेल्या नजराण्यापेक्षां दुप्पट, तिप्पट, पांचपट नजराणा द्यायला मी तयार आहे. मला वाटतें शेटजीला परत बोलवितांना याच्याकडून नजराणा घ्यावा आणि तूर्त नेमणूक करतों ह्मणून सांगावें. याउपर श्रीमंतांची मर्जी !

बाजीराव—ती सरसुभेदारी त्या हरामखोराला तर द्यायचीच नाहीं. त्रिंबकजी आतां तुझीच त्या जागेवर आह्मी नेमणूक करणार. तूंच त्या जागेला योग्य मनुष्य आहेस.

त्रिंबक—नजराण्यादाखल श्रीमंतांच्या चरणाजवळ नजराणा देण्यास या माझ्या देहाशिवाय मज गरिबाजवळ दुसरें काय आहे ? बरें देह तरी एकदां श्रीमंतांच्या चरणीं सेवेकरितां वाहिलाच आहे. आतां तो पुन्हा परत घेऊन देण्यास मुळींच राहिला नाहीं. ज्या अर्थी या चरणीं हा देह आर्पण केला आहे, त्या अर्थी जी सेवाचाकरी करण्यास आज्ञा होईल ती केलीच पाहिजे. पण ह्मणतो, सरकारचा नजराणा अनायासें चालून येत आहे तो कां बुडवावा ? मी काय जवळचाच आहे. आज नाहीं उद्या करीन.

बाजीराव—बरें तूं ह्मणतोस तसेंच करूं ! त्या लुच्चानें बराच आमचा पैसा खाल्ला आहे, तो त्याच्या घशांतून काढला पाहिजे. गळाचें घशांत अडकणारें तोंड आमिषानें झांकून टाकल्याशिवाय मासा गळाला सांपडत नाहीं.

त्रिंबक—शेटजी परत आल्यानंतर या दोघांचें पडतरे कसे पडतात, तें मी भगवंतरावाकडून समजून घेऊन श्रीमंतांस कळवीन. ही कामगिरी भगवंतरावाला होनाजी करून तेथें ठेवला आहे ह्मणून होईल आणि गोविंदराव गुणाजी बनवून शास्त्र्याजवळ ठेवल्यामुळें तिकडची सर्व बित्तं बातमी लागेल. या त्यांच्या कामगिरीबद्दल शास्त्र्याला येथून हरप्रयत्नानें परत न जाऊं देण्याची कामगिरी आपण बजावलीच पाहिजे. मोबदल्याला मोबदला दिला ह्मणजे उपकाराचें ऋण डोक्यावर होत नाहीं.

बाजीराव—तो तर लेक जाण्याला अगदीं उतावळा झाला आहे. तो राहतो कसा ?

त्रिंबक—कामाच्या निकालाचें थोडेसें लांबणीवर टाकून कांहीं तरी नाःत्याच्या जाळ्यांत युक्तीनें त्याला अटकावून गुंतवून टाकला पाहिजे. त्याला थोडी युक्ती आहे. श्रीमंतांच्या पसंतीस येईल तर चरणीं सादर करीन.

बाजीराव—त्रिंबकजी, बोल. तूं जी युक्ती काढशील ती अगदीं बिनतोड असेल. माझी पूर्ण खात्री आहे.

त्रिंबक—शास्त्र्याचा मुलगा लग्नाचा आहे. रास्त्याची मुलगी श्रीमंतांची मेहुणी लग्नाजोगती झाली आहे. तेव्हां यासंबंधानें शास्त्र्याजवळ बोलणें लावावें व वैशाख किंवा जेष्ठ मासांत लग्नसमारंभ उरकून घ्यायचा विचार आहे व लग्न स्वतां श्रीमंत मुलीस मांडीवर घेऊन लावणार असेंही सांगवावें. त्याची थोडीशी त्याच्या शहाणपणाबद्दल व कारभाराच्या दक्षतेबद्दल स्तुती केली, आपण आमची दिवाणगिरी पतकरा व आपल्याला वाटेल तशी राज्यपद्धती सुरू करा; वगैरे गोष्टी हरदासबोवांच्या रसाळ वाणीनें त्यांच्या कानांत शिरल्या ह्मणजे तो श्रीमंतांच्या ह्मणण्यास रुकार दिल्याशिवाय कधीं राहणार नाहीं. यायोगानें, शास्त्री थांबेल, भगवंतरावाचें आपण काम करून दिल्यासारखें होईल, शास्त्र्याचें कुटुंब विहिणीच्या नात्यानें अनायासेंच वाड्यांत येईल; या सर्व गोष्टी श्रीमंतांच्या मर्जीप्रमाणें सहज होतील असें मला वाटतें. तितक्या अवधींत आपल्याला पुष्कळ खटपटी करितां येतील.

बाजीराव—होय, त्रिंबकजी, अगदीं नामी, सोळा आणे. युक्ति काढलीस. याला ह्मणावी अक्कल आणि याला ह्मणावी स्वामिभक्ती. बरें, सदोबाकडून बोलण्याला सुरूवात करीन.

त्रिंबक—त्याच्याकडून मी उद्यांच सुतोवाच करवितों. पण आपण स्वतां त्याला बोलावून त्या स्तुतीप्रिय शास्त्र्याला एकदां सांगावें, ह्मणजे त्याला भरंवसा येईल. आपल्या शक्तीच्या जोरानें मोठमोठे वृक्ष व मोठमोठ्या अजिंक्य किल्ल्याचे दरवाजे, आपल्या गंडस्थळाच्या एका धडाक्यासारखा फोडणारा मदोन्मत्त व बेफाम हत्ती सुद्धां जर बोटभर काठ्याच्या चिमट्यानें आकळला जातो, तर आपल्या शहाणपणाच्या झाडावर एका झपाट्यासरसा चढणारा पटवर्धन शास्त्री श्रीमंतांच्या मुठींत येणार नाहीं ही गोष्ट मुळींच संभवत नाहीं.

बाजीराव—तूं सांगितल्याप्रमाणें मी सर्व करीन, समजलास. बरें पण कायरे त्रिंबकजी, त्या रंगाच्या दिवशीं आपल्याला कोणी पाहिलें कायरे! त्या दिवशीं सर्व बायका मलमलीचीं पातळें नेसून रंगानें भिजून गेल्यामुळें काकडत होत्या, त्यावेळीं, कात्यायनी व्रताचे दिवशीं यमुनेंत गोपांगनाची जी स्थिती झाली होती ह्मणून पुराणांत सांगितलें आहे, त्या प्रसंगाची मला त्या वेळीं आठवण झाली.

त्रिंबक—त्यावेळीं श्रीकृष्ण भगवानानीं कृपाळू होऊन जशी गोपींना वस्त्रें दिलीं, तसेंच श्रीमंतांनींही सर्व स्त्रियांस वस्त्रदान केलें व त्यांची थंडी निवारण केली. राजा ह्मणजे या लोकचा परमेश्वर. परमेश्वराच्या लीला जशा अगाध, तशाच आपल्यासारख्या प्रभूच्याही लीला अगाध. त्यांचें दुसऱ्यांनीं श्रवण आणि मनन मात्र करावें. त्याप्रमाणें वर्तन करण्याचें कधींही मनांत आणूं नये.

बाजीराव—त्या दिवशीं सर्व बायका काय ह्मणाल्यारे. त्या खुष झाल्या कीं नाहीं? शास्त्रच्याची बायको कां रे आली नाहीं. ती सडपातळ अंगाची व ताई जिच्याशीं फार गोष्टी करीत होती ती कोण, वगैरे गोष्टी ताईसच जाऊन विचारल्या पाहिजेत त्याशिवाय पत्ता लागणार नाहीं. (जातो)

त्रिंबक—(आपल्याशीं) हा पतंग त्या आमच्या नयनाला आनंद देणाऱ्या रत्नदीप ज्योतीवर झडप घालणार. कारण आतां हा त्या सभोंवती घिरट्या घालूं लागला. तेव्हां मला स्वस्थ बसून कसें चालणार. मला त्याचे खेळ आडून पहाण्यास सध्यां तिकडेच गेलें पाहिजे.

(जातो.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—ताईचा दिवाणखाना.

पात्रें—पार्वतीबाई व ताई येतात.

ताई—पार्वतीबाई, तुह्मी लवकरच परत बडोद्यास जाणार हें भीमीच्या तोंडून ऐकल्यापासून मला किनई बाई अगदीं चैन पडेनासें झालें. माझ्या

घरचं माझें सर्व्यें माणूसच अथवा प्रत्यक्ष माझी धाकटी बहिणच आपल्या गांवीं जात आहे व आतां ती कित्येक दिवसांत तरी मला पुन्हां भेटायची नाहीं असें मला वाटतें. तुमच्यापेक्षां पुष्कळ दिवसांच्या जास्त ओळखीच्या अशा शेकडों बायका या पुण्यांत माझ्या मैत्रिणी आहेत, पण थोडक्या दिवसाच्या सहवासानें तुमच्याकडे मात्र माझें मन पहिल्यापासूनच ओढ घेऊं लागलें. तें कोण जाणे बाई, हें मात्र मला सांगतां येत नाहीं. पण असें झालें हें मात्र खास! हा आपला एकमेकीचा जन्मांतरीचा लागाबांधाच ह्मणायचा. दुसरें काय?

पार्वती—ताई, हा सर्व तुमचा चांगुलपणा. माझ्यावर तुमची इतकी ममता बसावी असा माझ्या अंगीं एक देखील गुण नाहीं.

ताई—बाई ज्याचें त्याला असेंच वाटत असतें, दुसऱ्याला आपल्याबद्दल काय वाटत असतें, तें ज्याचें त्याला मुळींच कळत नाहीं. तुमचा सरळ, सुशील आणि निरभिमानी स्वभाव पाहून मनाला मोठा आनंद होतो व प्रत्येकीला तुमच्याशीं स्नेह करावासा वाटतो. आह्माला वाटेल यांत तर नवलच नाहीं—पण—दुसऱ्यानें जों जों जास्त गुण आठवावें, व माया लावावी. तों तों जास्त दुःखाला मात्र कारण होतें. त्यापेक्षां मुळींच तुटक राहिलें तें बरें कीं नाहीं?

पार्वती—ताई मी आजच कांहीं जायला निघालें नाहीं.

ताई—आज काय आणि पंधरा दिवसांनीं काय केव्हां तरी जाणारचना? दोन्ही सारखींच.

पार्वती—दोन्ही सारखी कशीं! दोहींत अंतर आहे.. बरें त्या जाण्याच्या गोष्टी राहूंद्या मेल्या. दुसऱ्या कांहीं काढा.

ताई—आणखी कांहीं दिवस तुमचा सहवास आहे हेंच मी माझें मोठें भाग्य समजतें. बरें पार्वतीबाई, त्या दिवशींचा रंगाचा समारंभ तुह्माला कसा काय आवडला.

पार्वती—श्रीमंतांच्या घरचा समारंभ. सर्व गोष्टी अनुकूळ, मग तेथें काय पहायचें. ताई, पण त्या दिवशीं माझ्या हातून त्या परख्या पुरुषाच्या अंगा-

वर रंग पडला याबद्दल मला अगदीं चमत्कारिक वाटलें. मी भीतीनें अगदीं गांगरून गेलें. ते गृहस्थ आपल्या मनांत मला काय ह्मणाले असतील—ईश्वरसाक्ष मी—

ताई—त्याबद्दल तुह्मी आपल्या मनाला अगदीं वाईट वाटून घेऊं नका. मी सांगतें, त्यांना त्याबद्दल कांहीं सुद्धां वाटलें नाहीं. ते कोणी परके का होते? अहो ते श्रीमंताचे मुख्य मंत्री त्रिंबकजी.

बाजीराव—(आडून) माझ्या अंगावर तो रंग कां बरें पडला नाहीं.

त्रिंबक—(आडून दुसऱ्या बाजूनें) ताईनें आरंभ तर चांगला केला आहे.

पार्वती—मी पिचकारी जाणून बुजून मुळींच उडविली नाहीं. तुमच्या अंगावर उडवीत होतें इतक्यांत ते मध्यें आले. खरेंच त्यांनीं मला दांडगी व धीट असें आपल्या मनांत ह्मटलें असेल!

ताई—पार्वतीबाई, त्या एवढ्याशा गोष्टीकरितां तुह्मी आपल्या मनाला किती खाऊन घेतां. तुह्मी माझ्या अंगावर किती पिचकाऱ्या उडविल्या, त्याबद्दल तुमच्या मनाला कांहीं वाटतें कां? तसेंच समजा ह्मणजे झालें.

बाजीराव—(आडून) तशी मुद्दाम जरी नाहीं तरी चुकून जरी माझ्या अंगावर तिच्या हातची रंगाची पिचकारी उडती, तरी मी आपल्याला मोठा भाग्यवान ह्मणून समजलों असतों.

ताई—अहो, अशा तुमच्या सरळ आणि सुशील स्वभावामुळेंच तर तुमच्याकडे जीव ओढतो, पण त्याचा उपयोग काय? अखेरीस तुह्मी आह्माला सोडून केव्हां तरी जाणार! बरें पण पार्वतीबाई, तुमचें बडोद्यास काय काय आहे! तुह्मी तिकडे कां जातां?

पार्वती—जिकडे चाकरी आहे तिकडे गेलें पाहिजे. आमचें ह्मणण्यासारखें बडोद्यास कांहीं नाहीं. आतां नुकतें घर बांधलें आहे. शिवाय तात्यासाहेबांची तिकडे फार मर्जी आहे, त्यांच्या हाताखालींच मुतालिकीचें काम आहे; तेव्हां ते जिकडे जातील तिकडे आह्माला गेलें पाहिजे, व ते जेथें राहतील तेथें आह्माला राहिलें पाहिजे. त्यांच्या बरोबरच आह्मी कामानिमित्यानें पुण्यास नाहीं तर इकडे उगीच इतक्या लांब कोण कशाला येतें आहे.

ताई—तुमच्या यजमानास वकिलसाहेबाच्या हाताखालीं मुतालिकीचें काम आहेना? त्यापेक्षां मोठी एखादी मामलत अगर मोठा एखादा अधिकार या दरबारीं जर त्यांना मिळाला तर ते येथें राहतील कीं नाहीं? कारण नोकरी जर करायची तर ती येथें काय आणि तेथें काय सारखीच. उलट जेथें जास्त मिळकत असेल तेथेंच ती मग कां बेरें करूं नये? तुह्मी तुमच्या यजमानास याबद्दल विचारून खुलासा काढून ठेवा.

बाजीराव—(आडून) आतां पटवर्धन शास्त्र्याला लवकर जाऊं देतां कामा नये. तो गेला कीं तो बापू मैराळ जाणार आणि हीही मग जाणार. तें कामाचें नाहीं.

त्रिंबक—(आपल्याशीं) ही जर येथें राहील तर वाटेल ती मामलत रिकामी करून त्याला देईन.

पार्वती—राहणें होईल कीं नाहीं हें बाई मी काय सांगूं. पुरुषाच्या मनांतल्या गोष्टी आपल्याला कशानें कळणार? पण येथें नोकरी मिळेल हें कशावरून? आमचें येथें कोणी वशिल्याचें नाहीं.

त्रिंबक—(मनाशीं) तुझ्या सुंदर रूपापेक्षां आणखी मोठा वशिला कोणचा पाहिजे.

ताई—पार्वतीबाई, नको तुह्माला काळजी. तुह्मी आपल्या यजमानास विचारून तर ठेवा. अहो श्रीमंतांची मर्जी एकदां बहाल झाल्यावर रंकाचे राव होण्याला येथें मुळींच अवकाश लागत नाहीं. ती वाटोळ्या तोंडाची आणि उंच कपाळाची वारूबाई तुमच्या शेजारी बसली होती, तिचा नवरा फडावर खरडे घाशीत होता, तिच्या नवऱ्याचें नांव उगले, त्याला एकदम गारद्याच्या रिसाल्याचें काम श्रीमंतांनीं सांगितलें. दुसरी ती सत्यभामाबाई तरतरीत नाकाची, काळीसावळी, पाणीदार डोळ्याची पण नखरेबाज, ती आपाजी रामचंद्र सहस्त्रबुध्याची बायको. ते सहस्त्रबुद्धे असेच कोठें सांधीकोपऱ्यांत होते, त्यांच्याकडे आतां एका मोठ्या पागेचें काम आलें आहे. जिनें त्या दिवशीं गाणें ह्मटलें, ती वाटोळ्या तोंडाची व जरा अंगानें सुटलेली सखूबाई, ती बाळाजीपंत पटवर्धनाची बायको, त्यांच्यावर तर श्रीमंतांची अ-

त्यंत मर्जी, त्यांना वाड्यांत आणून ठेवून सर्व घरचें खाजगीचें काम सांगितलें आहे. तशीच ती गोरीपान आणि चवळीच्या शेंगेसारखी सडपातळ व कडेवर मुलगा घेतलेली, ती गोविंदपंत गोडबोल्याची बायको. तिच्या नवऱ्याला असेंच मोठें श्रीमंतांनीं काम दिलें आहे. दागदागिन्यांनीं लढलेली जी दिसते, ती आतां दोन वर्षामागें निव्वळ लंकेची पार्वती असुन पुष्करणीच्या हौदाचें पाणी भरीत होती. अहो, लांब कशाला, चिमणाजी नारायण आणि राघोबा भिकाजी करंदीकर हे दोघे दोन महिन्यापूर्वी शागीर्द होते, पण श्रीमंतांची बहाल मर्जी झाल्याबरोबर त्यांना बेटांतल्या वकीलीचीं कामें मिळालीं. त्या सर्वांनीं नोकऱ्या मिळाव्या म्हणून खटपटी तरी केल्या. पण तुम्हाला तें कांहीं करायला नको. तुमच्या करितां दुसरेच खटपट करतील. त्या सर्वांपेक्षां तुमचा स्वतांचा वशिला फारच मोठा आहे.

पार्वती—पुणें राहण्यासारखें शहर खरें ! पण ताई, ती माझ्या स्वाधीनची गोष्ट नाहीं.

ताई—तुमच्याच स्वाधीनची गोष्ट आहे. तुम्ही मनांत आणलें कीं सर्व होईल. वाड्यांत आलें गेलें, बसलें बोललें म्हणजे आपोआपच वशिला लागतो, काम होतें सर्व कांहीं होतें. त्याबद्दल तुम्ही काळजी करूं नका. तुमचें तें काम मजकडे लागलें.

बाजीराव—(पुढें होऊन हलक्या स्वरानें) तुझ्याकडे कशाला, मजकडे लागलें.

भीमा—(घाबऱ्यापणानें) ताई ताई, श्रीमंत. श्रीमंत उठा.

ताई—काय स्वारी आली. (उठते.)

पार्वती—(उठून) काय श्रीमंतांची स्वारी आली. जाते बाई मी.

ताई—अहो जरा बसा. दुसऱ्या पलिकडच्या महालांत जात असतील. जातां, जातां. सहज डोकावलें असेल.

पार्वती—ती पहा स्वारी इकडेच आली. मी नाहीं बाई थांबत. येईन आणखी कधीं तरी. (ती लगबगीनें जाते.)

(बाजीराव येतो व ताईच्या गादीवर बसतो, ताई शेजारी हात जोडून उभी आहे; भीमा उभी आहे.)

त्रिंबक—(आड उभा राहून) आतां मला यांच्या सर्व गोष्टी नीट कान देऊन ऐकिल्या पाहिजेत.

बाजीराव—ताई, त्या रंगाच्या दिवशीं सर्वांच्या मागून जिनें गाणें ह्मटलें तीचना ही आतां गेली ती. ताई, ही फार सुंदर आहे नाहीं. हीच कां ती त्या मुतालिकाची बायको. किती झपाट्यानें गेली. बसली ग कां नाहीं. मी आलों ह्मणून कीं काय? आतां ती पुनः केव्हां येईल.

ताई—ती केव्हां येईल हें नक्की सांगतां येत नाहीं. कदाचित् येणारही नाहीं. पटवर्धन शास्त्री लवकरच परत बडोद्यास जाणार आहे, तेव्हां ती आपल्या नवऱ्याबरोबर तिकडे जाईल.

बाजीराव—तो शास्त्री इतक्यांत जात नाहीं. त्याच्या मुलाचें व आमच्या मेहुणीचें लग्न संबंधाचें ठरत आहे. तेव्हां तो राहणार.

ताई—मग ही देखील राहील.

बाजीराव—त्या दिवशीं त्याची बायको आली नाहींना? न कां येईना.

ताई—आजपर्यंत आली नाहीं, पण आतां विहीण झाल्यावर तर येईलच.

बाजीराव—बरें ही वाड्यांत पुनः केव्हां येईल.

ताई—ती कांहीं निमित्याशिवाय यायची नाहीं.

बाजीराव—कसेंहीं करून तिला एकदां वाड्यांत आण. तिला वाटेल तें देऊं कर. तिच्याकरितां वाटेल तो खर्च कर. तुला सदर परवानगी आहे. केव्हां आणि कोठें गांठ पडेल तें सांग. मला तिच्याशीं दोन शब्द बोलायचे आहेत. तिच्या नवऱ्याला वाटेल तो अधिकार देण्याची लालूच दाखीव.

ताई—वाड्यांतील हळदी कुंकु व्हावयाचें आहे, त्या दिवशीं ती येण्याचा संभव आहे.

बाजीराव—मग परवाच हळदी कुंकु करून घे.

ताई—राणीसाहेबांना विचारलें पाहिजे.

बाजीराव—तिकडे काय विचारायचें आहे. मी सांगतों तें झालेंच पाहिजे.

नाहीं परवाच ठरीव! तिला दुपारपासून वाड्यांत बोलाव. तो नवीन ठेवलेला आपला नारोबा तो तुझ्या तैनातीस राहील. त्याच्याकडून सर्व थाट करीव. विसरूं नको.

ताई—श्रीमंतांच्या आज्ञेबाहेर मी कशी जाईन.

बाजीराव—तूं हुशार आहेसच! मी तुमचें सर्व बोलणें ऐकिलें. सावजाला असेंच तडाक्यांत धरावें लागतें. आतां माझी संध्येची व अग्नीला होम देण्याची वेळ झाली, मी जातों. कामगिरी चांगली बजावलीस कीं तुझें बक्षीस तयार आहे. (जातो.)

(त्रिंबकजी येतो.)

त्रिंबक—(मनाशीं) एकाच वस्तुवर टपून राहिलेला सावध चोर कधीं कधीं चांगला तड़ाक्यांत सांपडतो. श्रीमंत, ती शिकार माझी आहे. आपली नव्हे. (उघड) ताई,—

ताई—(आश्चर्यानें) काय आपलीही स्वारी येथेंच होती वाटतें. केव्हां आलांत.

त्रिंबक—पार्वतीबाई परत लवकरच बडोद्यास जाणार, ह्मणून त्यांच्या वियोग दुःखाखालीं जेव्हां तुह्मी अगदीं दडपून गेलेल्या मला दिसला त्याचवेळीं आलों. ह्मटलें, तो भार आपणही थोडासा घेऊन तुमचें ओझें कमी करावें.

ताई—मग इतका वेळ आपण कुठें होता व काय करीत होता?

त्रिंबक—श्रीमंत जेथें उभे होते, त्यांच्याच पलीकडच्या खोलींत मी ताईला या कामगिरीबद्दल काय बक्षिस द्यावें ह्मणून विचार करीत होतों.

ताई—बरें तर पाहूं आपण आज मजकरितां काय बक्षिस आणलें तें.

त्रिंबक—आपल्या अमोल्य गुणाप्रमाणें व रूपाला साजेल असा एखादा अंगावर घालण्याकरितां दागिना आणणार होतो, व तो कोणता आणावा या विचारांत बराच वेळ घालविला, पण मनाजोगता असा कांहीं ध्यानीं येईना; तेव्हां तसाच येणार होतों, पण ह्मटलें आपला राजा, गुरु आणि आपलें आधीदैवत यांच्या दर्शनाला केव्हांही गेलें तरी रिकाम्या हातानें जाऊं नये; ह्मणून ह्या लहानशा गुजराथेंतील वस्तु मिळाल्या आहेत त्या घेऊन आलों

झालों. (असें ह्मणून खिशांतून मोत्यांचा हार काढून तिच्या गळ्यांत घालतो, व आंगठी हातांत घालतो.) आमच्या आराध्य देवता आपण. तेव्हां ह्मटलें आज आपल्या आराध्यदेवतेचें रूपांत या लहानशा वस्तूंनीं कांहीं भर पडते कां ती पहावी, व देवानें दिलेल्या या डोळ्यांची तृप्ती करून घ्यावी, यापेक्षां जास्त कांहीं नाहीं. देवानें दिलेल्या मुख्य रूपालंकारापुढें या अलंकारांची मोठी मातबरी नाहीं, पण त्यांच्या जन्माचें सार्थक तरी व्हावयाचें केव्हां ? त्यांचा कांहीं तरी उपयोग व्हावा, ते उत्पन्न करणाऱ्याच्या व घडणाऱ्याच्या श्रमाचें सार्थक व्हावें, एवढ्याकरितांच ते अंगावर घालायचे दुसरें काय? (तिच्या गालाला हात लावून) यांच्यामुळें या अलंकारांची शोभा ? नाहीं तर ते लांकडाच्या पेटींतच ठेवण्याच्या उपयोगाचें. खरें कीं नाहीं ?

ताई—(हांसून) या गोष्टींत मला कांहींच कळत नाहीं.

त्रिंबक—नाहीं, आपल्याला नाहीं या गोष्टींत कांहीं कळायचें. ही पहा, ही माणकाची आंगठी. ही जर नुसती हातांत धरली तर जास्त सुरेख दिसतें कीं, ती या सडपातळ करंगळींत असली तर जास्त चमकते. कोणतीही वस्तु काय, जी ज्या स्थळाला योग्य ती त्याच ठिकाणीं असली तर ती चांगली दिसते. समजा हा मोठ्या पाणीदार मोत्यांचा कंठा आह्मीं आपल्या गळ्यांत घातला, तर चांगला दिसेल किंवा तो या कंठांत असल्यानें चांगला शोभेल ! हा कंठा याच गळ्यांत पडला पाहिजे व हे रत्नालंकारांनीं मंडीत, व कमलाच्या देंठाप्रमाणें मृदु हात याच कंठांत असें पडले पाहिजेत. (असें ह्मणून तिचे हात आपल्या गळ्याभोंवतीं घालून घेतो) व ही वस्तु अशी जवळ पाहिजे. [तिला आलिंगन देऊन जवळ घेऊन बसतो.] लांब असून चालत नाहीं.

ताई—मी कुठें पण लांब आहे.

त्रिंबक—लांब असून चालणार कसें ! जेथली वस्तु तेथेंच पाहिजे. बरें तें असो. श्रीमंतांच्या ह्मणण्याप्रमाणें आपण करणार कां ?

ताई—या कामांत मला कीं नाहीं मोठी अडचण येऊन पडली आहे. इकडे आपलें मन मला राखिलें पाहिजे, तिकडे श्रीमंतांची आज्ञा मला मोड-

ता येत नाहीं. इकडे आड आणि तिकडे विहीर अशी माझी स्थिती झाली आहे. तेव्हां मीं अशा ठिकाणीं काय बरें करावें ? आपणच एखादी कांहीं तरी युक्ति काढा.

त्रिंबक—श्रीमंतांचें व तुझें सर्व बोलणें मीं आडून ऐकिलें. त्यांची आज्ञा तर मोडूं नये, आपलें काम तर साधावें आणि आपण अगदीं नामा निराळे ते निराळे रहावे, अशी युक्ति लढविली पाहिजे. श्रीमंतांचें लक्ष तिकडे गेलें खरें, पण त्या ठेवेचा पहिला मालक मी. ती त्यांच्या हातीं मुळींच लागून द्यायची नाहीं. आपल्या फायद्याच्या ज्या श्रीमंतांच्या आज्ञा असतील त्या ताबडतोब पाळाव्या, पण आपल्या इच्छेविरुद्ध कांहीं होऊं लागलें कीं, त्याला प्रतीकार करायला कधीं मागें घेऊं नये. मग त्यांत प्राणापर्यंत येऊन बेतली तरी हरकत नाहीं, समजलीस. हें तत्व पक्कें लक्षांत ठेवून वागल्याशिवाय जगांत कोणीच उदयाला येत नाहीं. तेव्हां असें कर, वाड्यांतील हळदकुंकु परवा करण्याचा हुकूम झाला आहे, त्याप्रमाणें तो समारंभ कर. श्रीमंतांस अगदीं ऐन संध्याकाळीं ज्या गणेशमहालांत नारायणराव साहेब यांचा खून झाला, त्या महालांत एकटे बसण्यास सांग! दिवे फारसे लावूं नकोस. अंधार असेल तितका चांगला. आणि भिमीला नटवून थटवून हलकेच त्या चोर जिन्यानें आंत सोडून दे. त्यावेळीं कसें बोलायचें, काय करायचें, वगैरे सर्व तिला नीट पढवून ठेव; आणि तिनें ही कामगिरी बजाविली कीं, तिचें काम उद्यां झालेंच अशी तिला लालूच दाखीव. ती आंत आली ह्मणजे रात्रंदिवस आपल्या शिकारीवर झडप घालण्याकरितां टपून बसलेल्या लांडग्याप्रमाणें श्रीमंत, ही, ही आपलीच शिकार आली असें समजून झडप घालण्याकरितां जातील, अंगाशीं लगट करतील; कामांध झाल्यामुळें आणि अंधारामुळें त्यांना खरें काय तें दिसणार नाहीं. त्यावेळीं ते जें करतील तें करूं दे, असें भिमीला सांग. त्यांच्या तडाक्यांतून तिला ऐन वेळीं कशी सोडवायची व पुढें काय करायचें तें काम मजकडे लागलें.

ताई—आपल्या ह्मणण्याप्रमाणें करण्यास मी चुकणार नाहीं.

त्रिंबक—मीं सांगितलेल्या सर्व गोष्टी नीट ध्यानांत ठेवा आणि त्याप्रमाणें

वागा. मला आतां राज्याच्या दुसऱ्या भानगडीच्या कामामुळें बसण्यास व तुमच्याशीं स्वस्थपणें बोलण्यास वेळ नाहीं. जातो मी. जर एवढेसें कांहीं चुकलें व मसलत फसली, अगर तुह्मी मला फसविलें तर मात्र संभाळून रहा. अतिशय शांत समुद्र एकदां खवळला ह्मणजे मग काय प्रळय करतो हें तुह्माला निदान ऐकून तरी माहीत असेलच !

(जातात.)

प्रवेश चवथा.

स्थळ—त्रिंबकजीचा दिवाणखाना.

पात्रें—त्रिंबकजी आणि सदाशिव माणकेश्वर येतात.

त्रिंबकजी—भाऊसाहेब, हे घ्या दोन हुकूम. एका हुकुमांत शेट मोद्यास कर्नाटकच्या सरसुभेदारीवरून परत यावें ह्मणून लिहिलें आहे. दुसऱ्या हुकुमांत आपण त्याच्याकडून तेथील कारभाराचा सर्व हिशेब समजावून घ्यावा ह्मणून लिहिलें आहे. झालेंना आतां तुमच्या मर्जीप्रमाणें. आतां तो मोदी जाणें आणि तुह्मी जाणें व तो तुमचा हिशेब आणि ती सरसुभेदारी जाणें.

सदाशिव—अहो त्याची प्रथम नेमणूक झाली हीच मोठी चूक झाली. त्या पारशानें तिकडे अगदीं नुसता पेंढारीपणा मांडला आहे. व तो आपलें घर भरीत आहे.

त्रिंबक—जी प्रथम झाली ती झाली. आतां तर सुधारलीना ? बरें, तुमच्याकडे श्रीमंतांनीं पटवर्धन शास्त्र्याजवळ लग्नसंबंधीं त्याला राहून घेण्याबद्दल, व येथील दिवाणगिरी देण्याबद्दल ज्या गोष्टी त्याच्या कानावर घालून त्याचें मत खरें काय आहे तें ताडून घेण्याविषयीं सांगितलें होतें, त्याचें कोठपर्यंत आलें.

सदाशिव—त्याचें " सुतौवाच " करून ठेवलें आहे. फार करून तें जमेल असें वाटतें. श्रीमंतांशीं अनायासें होत असणारा शरीरसंबंध कोणाला नकोसा आहे. दिवाणगिरीच्या अधिकारामुळें त्याच्या तोंडाला पाणी सुटूं लागलें आहे.

त्रिंबक—पाणी सुटलेंच पाहिजे आणि त्याचे पाय हरप्रयत्नानें येथें रुतलेच पाहिजेत. चालूंद्या. फार दिवस जरी तुह्मी वकिलाच्या मुतालिकीचें काम केलें आहे, तरी बालपणापासून हरीकीर्तनामुळें तुमच्या रसाळ वाणीला गुणवर्णनाचें लागलेलें वळण अद्याप गेलें नसेल. त्याचा चांगला उपयोग करा. श्रीमंत पेशवे सरकारची दिवाणगिरी मिळाल्यामुळें, त्यांचें वैभव सध्यां आहे यापेक्षां किती वाढेल, त्यांचा मानमरातब केवढा राहील, महाराष्ट्राचीं सर्व राज्यसूत्रें हातीं आल्यामुळें त्यांच्या हातीं केवढी सत्ता येईल, शिंदे, होळकर, गायकवाड, निजाम, टोपीवाले वगैरे परदरबारचीं कामें करण्याचे प्रसंग पुष्कळ आल्यामुळें त्यांचें शहाणपण व त्यांची कीर्ति कोठपर्यंत जाईल वगैरे गोष्टींचें सुंदर व मन ओढून घेणारें चित्र तुह्मी आपल्या मधुर वाणीनें त्यांच्यापुढें चांगलें काढा. श्रीमंतांशीं त्यांतले त्यांत शरीरसंबंध झाल्यामुळें, त्यांची व त्यांच्या कुळाची योग्यता केवढी वाढेल, याचाही ठसा त्याच्या मनावर चांगल्या रितीनें उठवून द्या.

सदाशिव—शास्त्र्यानें सर्व गोष्टीला रुकार दिला ह्मणजे झालें कीं नाहीं.

त्रिंबक—त्यापेक्षां आणखी काय पाहिजे. तुमच्याबद्दल श्रीमंतांना चांगली खात्री आहे ह्मणूनच तर ही नाजूक कामगिरी त्यांनीं आपल्याकडे सांगितली आहे. तुह्मी आपल्या कामांत तरबेज आहांतच ह्मणा, पण शास्त्र्याला जरा प्रौढी मिरवावीशी वाटते, व आपल्या गुणांची स्तुती केलेलीही आवडते, या त्यांच्या स्वभावाच्या अंतस्थ गोमा आहेत त्या तुह्माला सांगितल्या. पुष्कळ द्रव्यानें व मोठ्या शौर्यानें ज्या गोष्टी होणें अगदीं अवघड असतें, त्या गोष्टी या अंतस्थ गोमा माहित असल्यामुळें सहज होतात. मोठा अजिंक्य किल्ला, माऱ्याची गुप्त जागा कोणची आहे हें कळलें ह्मणजे ताबडतोब हातीं येतो. ही एक कामगिरी झाली. बरें दुसरी तुमच्या पूर्वीच्या दोस्तासंबंधाची. त्याची मजल कोठपर्यंत आली आहे.

सदाशिव—त्याची मजल बरीच लांबवर गेली आहे. तो येथें आला कीं रेसिडेन्ट साहेब त्याला एक कोणतें तरी काम करण्यास सांगणार अगर घरीं बसविणार.

१७

त्रिंबक---ठीक. बरेंच जुळलें ह्मणायचें.

सदाशिव—आतां मी या दोन्ही कामाकरितां तिकडेच जातों. तिकडून येऊन मग श्रीमंतांस सर्व मजकूर कळवीन.

त्रिंबक--मला तिकडचें बोलावणें आलेंच आहे. तुह्मी सांगितलेला मजकूर मी श्रीमंतांच्या कानावर घालतों. त्याबद्दल माझ्या पाठीमागें सारखें तट्टें लागलें आहे. तेव्हां हा एवढा मजकूर सांगितला ह्मणजे तेवढा ससेमिरा जरा कमी होईल. बरें आहे येतों मी. (जातांना पुनः थांबून) बरें भाऊसाहेब, तुह्माला मुख्य तें विचारायचें विसरलोंच.

सदाशिव—काय तें !

त्रिंबक—(विचार केल्यासारखें करून) ह्मटलें, मागें आपण नजराण्याबद्दल जें ह्मटलें होतें, तें श्रीमंतांच्या कानावर घालतों. कारण तें ठरल्यासारखेंच आहे.

सदाशिव—पण किती !

त्रिंबक—अहो फार नाहीं, निदान पांच पांडव ! मग काय, सांगूंना ?

सदाशिव--अहो फार होतात.

त्रिंबक—घरंदाज मनुष्याला इतकें कांहीं कमी नाहीं. एक दोन वर्षें सरसुभेदारी केली कीं मुद्दल सव्याज यायचेंच ! या गोष्टी कां तुह्माला माहीत नाहींत, कीं मला माहीत नाहींत कीं कोणाला माहीत नाहींत. सर्वांना माहीत आहेत व सर्व करतात. गृहस्थाश्रमाला कानांत अगदीं तुळशीपत्र घालून बसून कधींच चालायचें नाहीं. दोन चार दिवसांत तजवीज करून माझ्याकडे पाठवून द्या. गोष्ट या कानाची त्या कानाला कळूं देऊं नका, बरें.

सदाशिव--पण —

त्रिंबक—पण-बीण नको. मी नाहीं आतां तुमचें ऐकत. (जातो.)

सदाशिव—बरें आहे, पारसुटल्या, आतां आलास कीं नाहीं माझ्या तावडींत. पहातों सरसुभेदारीचा हिशेब कसा देतोस तो !

(जातो.)

प्रवेश पांचवा.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील दालन.

पात्रें—बाजीराव आणि ताई येतात.

बाजीराव—ताई, मग काय केलेंस! काम फत्ते कां?

ताई—इतक्या लवकर काम होईल असें मला मुळींच वाटलें नव्हतें. न जाणो ह्मटलें कोणत्या मनुष्याचा कसा स्वभाव असतो, आणि कोणतें माणूस कोणत्या वेळीं कसें उलटतें! कारण कांहीं माणसांच्या अंगीं करून सवरून अगदीं धुतलेल्या तांदुळासारख्या आपण स्वच्छ आहोंत असें बाहेर दाखविण्याचें चातुर्य असतें. सावज लवकरच आटोक्यांत आले, पण जरा त्यानें एक दोन झुकांड्या मारल्याच!

बाजीराव—तुझ्यासारखी चतुर बायको असल्या कामांत असल्यावर मग तें काम होणार नाहीं ही गोष्टच मुळीं बोलायला नको. आजपर्यंत तूं असलीं नाजूक कामें काय कमी केलीं आहेस. तुला कोणत्या वेळीं कसें वागावें, कशी युक्ती लढवावी, कसें सोंग आणावें, हें सांगायला नको. या सर्व कामांत तूं अगदीं पटाईत आहेस. बरें केव्हांचा मग संकेत ठरला आहे.

ताई—श्रीमंतांनीं अगदीं तिन्हीसांजा होण्याच्यावेळीं गणेश महालांत जाऊन बसावें. तेथें मी त्यांना तो महाल दाखविण्याच्या मिषानें घेऊन येईन आणि तेथें आंत सोडून मी चालती होईन. मग पुढचें श्रीमंत जाणोत. माझी कामगिरी इतकीच.

बाजीराव—बरें मी त्याप्रमाणें त्यावेळीं तेथें जाऊन बसतों.

ताई—त्याबद्दल श्रीमंतांनीं लक्षांत असूं द्यावें. अगबाई, त्या पहा बाया यायला लागल्या. ताईसाहेबांची स्वारी येऊन बसली. मला आतां बायांना हळदीकुंकु देण्याला खालीं गेलें पाहिजे.

बाजीराव—अग ए, थोडें थोडें ऐकून तर घे.

ताई—श्रीमंतांनीं आतां क्षमा करावी. (लगबगीनें निघून जाते.)

बाजीराव—(आपल्याशीं) ताईनें दुसरी जागा ठरविली असती तर बरें

होतें. तेथें संध्याकाळीं मला जाण्याला कसेंसेंच वाटतें. बरें पण आतां काय त्याचा उपयोग. यावेळीं डगमगून उपयोगी नाहीं, धैर्य धरलें पाहिजे. जातो.

(वाड्यांत गौरीचा थाट केला आहे, बायकांची गर्दी जमली आहे. हळदकुंकू देण्याची गडबड उडून गेली आहे, ताई आपल्या ओळखीच्या बायांशीं बोलण्यांत दंग होऊन गेली व जिकडे तिकडे थाटानें वावरत आहे. असा पडदा उघडतो.)

ताई—या बसा अशा ! तुह्माला हळदकुंकू मिळालें. खिरापत मिळाली. तुह्माला देते अंः

बाया—सर्व मिळालें.

ताई—अरे नारोबा, काकड्या, टरबुजे घेऊन ये लवकर. भिमे, भिमे. ठके, मने, विठे, चिमणे, सखे, आहांत कुठें सगळ्याजणी.

भिमा—काय पाहिजे.

ताई—अग डाळीच्या हरभऱ्याच्या पाट्या भर. खिरापत घेऊन ये आणखी. तोंड पहात उभी काय राहिली आहेस ?

भिमा—हें घ्या सर्व तयार आहे.

(ताई सर्वांस हळदकुंकू देते.)

ताई—रमाबाई, सत्यभामाबाई, पार्वतीबाई, सगुणाबाई नांवें घ्या. आज नांवें घेतल्याशिवाय जायचें नाहीं.

रमा—ताई तुह्मी सुद्धां घेतलें पाहिजे.

ताई—अहो प्रत्येकजणीकरितां जर मी नांव घेऊं लागलें तर, नांव घेतां घेतां माझा जीव बेजार होईल. सध्यांच माझा घसा बसला आहे. आणखी कांहीं वेळानें शब्द देखील तोंडांतून निघणार नाहीं.

पार्वती—कांहीं झालें तरी तुह्माला आमच्याकरितां नांव घेतलेंच पाहिजे. मग पाहिजे तर घेऊं नका.

ताई—बरें आधीं तुह्मी घ्या. मग मागून मी घेईन.

रमा—“ चंदनाच्या उटीनें विलेपिली काया, रमाबाईचें तनमन विष्णूपंताच्या पाया. ”

ताई—सत्यभामाबाई आतां आपली पाळी.

सत्यभामा—“ कमलांतील मध पितां पितां भ्रमर झाला गुंग, कृष्णाजीपंताच्या सेवेंत सत्यभामा झाली दंग. ”

ताई—आतां आपली !

सगुणा—“ वृंदावनी गोपीसंगे कृष्ण खेळे फुगडी, गोविंदरावाची आणि सगुणाबाईची असते नेहमीं गडी. ”

ताई—खरेंच कीं काय ? एखादे दिवशीं तरी भांडण होत असेल ! बरें पार्वतीबाई आतां आपण घ्या.

पार्वती—“ यमुनेच्या डोहांत स्वस्थ पोहतात मासे, तात्यासाहेबांच्या हाताखालीं गायकवाडीमध्यें बापूसाहेब मुतालिक खासे ! ”

ताई—खरें, अगदीं खरें.

पार्वती—आतां ताई तुह्मी घेतलें पाहिजे. नाहीं होय ह्मणून चालायचें नाहीं.

ताई—तुह्मी सर्वजणींनीं हट्ट धरलांत तेव्हां मला तुमच्या हट्टाप्रमाणें वागलें पाहिजे. तुह्मी आपला हट्ट पुरविल्याशिवाय थोड्याच राहणार आहांत. “ राधिकेचें मुख पाहून कृष्ण झाले तल्लीन, माझ्या स्वामींच्या ठिकाणीं माझें चित्त असावें सदा लीन. ”

पार्वती—अहो ताई, त्यांत नांव नाहीं आलें नांव ! हें काय असलें नांव घेणें, पुन्हां घ्या.

ताई—आतां कां बरें पुन्हां. अहो स्वामी ह्मटलें त्यांत सर्व आलें. “ नारायणराव ” झालें आतां तुमच्या मनाप्रमाणें.

भीमा—(हलकेच) ताई, श्रीमंतांनीं बोलाविलें आहे.

ताई—चल पुढें हो, घाबरूं नकोस ! मी येतें मागून.

सर्व—ताई येतों अं: !

ताई—या, हळूं या.

(सर्व जातात.)

प्रवेश सहावा.

स्थळ—गणेशमहलांतील दुसरा मजला.

पात्रें—अंधारांत बाजीरावसाहेब एकटे पलंगावर बसले आहेत.

बाजीराव—संध्याकाळ होऊन गेली. ताईनें सांगितल्याप्रमाणें मला येथें येऊन बराच वेळ झाला. अंधारही पडत चालला. यावेळपर्यंत खरें ह्मटलें ह्मणजे तिनें यावें. मग कां बरें उशीर लागला? बायांना हळदीकुंकू देण्याच्या गडबडींत ताई गुंतली असेल. ह्मणूनच ती आली नाहीं. येथें एकटे अंधारांत बराच वेळ बसल्यानें माझ्या मनाला चमत्कारिकच वाटूं लागलें आहे. नारायणरावास, चाफाजीस व नारोबास, सुमेरसिंगानें याच ठिकाणीं ठार केलें होतें नाहीं! त्यांची प्रेतें पडून रक्ताचे पाट येथेंच वाहत जात होते. अरे बापरे, नको त्याची आठवणच नको. आठवण झाली कीं मागें एकदोन वेळ जी मूर्ती माझ्या दृष्टीस पडली होती ती पुनः माझ्या दृष्टीस पडते कीं काय असा मला भास होऊन भीति वाटूं लागते. मी या ठिकाणीं बसण्याचें व निजण्याचें सोडून दिलें होतें. आज या ठिकाणीं आलों तो आलों, आतां पुनः कधीं येणार नाहीं. दादांच्या हातून नारायणरावाचा घात झाला. त्यांच्यावर त्यांचा राग. दादा आणि आई होती तोंपर्यंत मला ती मूर्ती कधीं दिसली नाहीं. त्यांच्यामागें ती मला वर्षातून एखादे वेळ ओझरती दिसे व कधीं धबधब अशीं पावलें सुद्धां वाजल्याचें ऐकूं येई. त्यांच्या प्रित्यर्थ मी नारायण नागबळी करून पुष्कळ ब्राह्मण भोजनें केलीं. त्यामुळें मला आतां तितका पूर्वीप्रमाणें त्याचा भास होत नाहीं. आतां सुद्धां घालीन. (कांहीं वाजल्याचा आवाज होतो.) काय बरें वाजलें. मला वाटतें दारच वाजलें असावें. पण तें वाऱ्यानें वाजलें कीं जिची मी वाट पहात बसलों आहे ती आल्यामुळें वाजलें? फार करून तीच आली असावी. (उठून पुढें होऊन) ये, ये, सुंदरी ये. तुझी वाट पहात हा बाजीराव येथें बसला आहे.

(इतक्यांत पडद्यांत, धबधब असा आवाज होतो) आलों, आलों, तुझा समाचार घ्यायला आलों.

बाजीराव—(घाबरून) अरे वरती हा धबधब आवाज हीं पावलें कोणाचीं वाजतात. कोणी दडदड जिना उतरल्याप्रमाणें हा आवाज कसला होतो. (पडद्यांत) [आलों, आलों थांब. आतां तूं माझ्या तावडींतून कोठें जाणार !] आतां येथें मला कोण सोडविणार. नको, पुनः मी येथें येणार नाहीं. [कानांत बोटें घालतो व डोळे मिटतो.] अरे नारायणरावाची मूर्ती मला आतां दिसूं लागली. ते पहा रागानें दांतओंठ चावून माझ्या अंगावर धांवून येत आहेत. हे भगवन्, हे दत्तात्रय, श्रीराम, हे कृष्ण. [पडद्यांत पुनः आवाज होतो] परस्त्रीशीं व्यभिचार कर्म करायला येथें आलास काय ? माझें वास्तव्य येथें आहे हें तुला माहीत नाहीं काय ? थांब तुझी खोड मोडतो.

बाजीराव—[घाबरून हात जोडून] महाराज चुकलों, असें पुनः मी करणार नाहीं, व पुनः येथें येणारही नाहीं. अपराध माफ करा. मी आणखी ब्राह्मण भोजनें घालीन, आपल्या नांवानें पुण्याभोंवतीं अंबराई लावीन. अन्नछत्रें व पाणपोया घालीन. नारायण नागबळी पुनः करीन. आपली मूर्ती सोन्याची करून देव्हाऱ्यांत बसून तिची रोज पुजा अर्चा करीत जाईन. महाराज आ. पण मला सोडा. माझ्या दृष्टीस पडूं नका, मला फार भीति वाटते. [पडद्यांत] तुझ्या बापानें जसा माझा वध केला, तसा त्याचा सूड उगविण्याकरितां मी तुला नेममीं रोजच्या रोज छळून तुझा वध करीन, तुझा बळी घेईन, कधीं सोडणार नाहीं. हा बघ आलों. तुझ्या उरावर बसतों. तुझी मान मुरगाळतों.

बाजीराव—(कांपत कांपत इकडे तिकडे धांवतो.) आले ते पहा आले. आतां कोठें पळूं ! दरवाजा सांपडत नाहीं कुठें दडूं. महाराज नका नका. मला सोडा. अरे सद्या, गण्या, त्रिंबकजी धांवा धांवारे कोणी. मेलों, मेलों. मारलें मारलें. (असें ह्मणून मूर्च्छित पडतो.)

(पडदा पडतो.)

अंक चवथा.

प्रवेश पहिला.

स्थळ—बाजीराव साहेबांचा महाल.

पात्रें—बाजीराव भगवंतराव आणि त्रिंबकजी, बोलत बसले आहेत.

त्रिंबक—श्रीमंतांनीं या भगवंतरावजीस प्रत्यक्ष विचारावें कीं तो पारशी येथें आल्यापासून काय काय बोलत असतो तें, ह्मणजे त्यावरून श्रीमंतांची चांगली खात्री होईल.

भगवंत—श्रीमंत तो जें बोलतो तें ऐकिलें ह्मणजे असें वाटतें, कीं हा आतां पुढें काय काय भयंकर प्रकार करणार कोण जाणें! बरें तें ह्मणजे तो फारसें कोणाला कळूं नये असें बोलत नाहीं, तर सर्व चाकरा देखत सर्वांना तें कळावें ह्मणून बोलतो. त्यांतलें त्यांत त्याच्या बोलण्यांतून ‘ हें सर्व कृत्य सदाशिव माणकेश्वर यानें श्रीमंतांचे कान भरून आपल्याला कर्नाटकची सरसुभेदारी मिळावी ह्मणून केलें आहे, एरव्हीं श्रीमंत असें कधीं करणार नाहीं अशी माझी खात्री आहे. ’ इतकें सार निघतें एवढें बरें आहे. त्याचा सर्व कटाक्ष त्याच्यावर आहे. त्या दोघांचें आतां अगदीं हाडवैर पडलें आहे. दोघेजण दुखविलेल्या सापाप्रमाणें एकमेकांचा सूड घेण्याचा आपापला डाव केव्हां साधेल ह्मणून सज्ज होऊन बसले आहेत. त्यांतून सदाशिव माणकेश्वराला त्यानें केलेल्या कामाचा हिशेब घेण्याकरितां हुकूम दिल्यामुळें तर तो संतापानें अगदीं बेफाम होऊन वेडा बनला आहे. इतक्या सर्व गोष्टी आहेत खऱ्या, पण मला त्याच्या बडबडीची फार भीति वाटते. आणि तो कदाचित् बोलल्याप्रमाणें खास करील असें मला वाटतें. तेव्हां याचा वेळेवर बंदोबस्त केला पाहिजे.

बाजीराव—तो काय ह्मणतो कीं मी सगळें सांगून देईन!

भगवंत—नुसतें सांगून राहणार नाहीं, तर शिंदे, भोंसले, निजाम पेंढारी यांच्या बरोबर वसईचा तह झाला असून बाजीरावाचीं इंग्रजसरकाराविरुद्ध

कारस्थानें व पत्रव्यवहार सुरू आहे, हें मी पुरव्यानिशी सर्व सिद्ध करून देईन.

बाजीराव—काय ह्मणतां! तो असें ह्मणतो. त्याच्या बडबडीला विचारतो कोण? त्यानें सुभेदारीच्या कामावर असतांना फार पैसा खाल्ला आहे, ह्मणून तो असें ह्मणतो असें आह्मी सांगूं.

त्रिंबक—तें आपण सांगूं खरें, पण त्याच्या बडबडीमुळें होणारे अनर्थ कांहीं टळणार नाहींत; तेव्हां त्याबद्दल आपल्याला सावधगिरी पहिल्यापासून ठेविली पाहिजे. ही गोष्ट कानामागें टाकून उपयोगीं नाहीं. सापाचें वीष जोंपर्यंत सर्व अंगांत भिनलें नाहीं, तोंपर्यंत तें उतरविण्याचा उपाय केला पाहिजे.

बाजीराव—त्रिंबकजी तूं ह्मणतोस तें खोटें नाहीं. हो, याविषयीं आपणाला अवश्य विचार केला पाहिजे. ठीक आहे, भगवंतरावजी, आपण आमची उत्तम कामगिरी बजावीत आहां, त्याबद्दल आह्मी आपल्याला कधीं विसरणार नाहीं. गायकवाडींतल्या मामल्यासंबंधानें आह्मी आमच्या कामाचा जेव्हां अखेर निकाल करून घेऊं, त्यावेळीं तुमच्या जहागिरी व नेमणुकी संबंधानें निकाल करून घेतल्याशिवाय कधीं राहणार नाहीं.

भगवंत—याशिवाय श्रीमंतांजवळ आमचें कांहींच ह्मणणें नाहीं. पण तो दुष्ट पटवर्धन शास्त्री आहेना जेथें तेथें आमच्या कामांत अडथळे करायला एका पायावर तयार!

त्रिंबक—त्याही गोष्टीचा हलकें हलकें बंदोबस्त करूं. श्रीमंतांनीं मनावर घेतल्यावर, तुमचे आनंदराव महाराज असोत, फत्तेसिंग बोवा असोत, बलाढ्य फिरंगी असोत, तो शास्त्री असो अगर त्याचा बाप असो अथवा कोणी असो, कोणाचें कांहीं चालणार नाहीं; तें काम शेवटास गेलेंच ह्मणून समजा.

बाजीराव—भगवंतरावजी, आतां आपण पूर्वीपेक्षां जास्त खबरदारी घेऊन आह्माला रोजची सर्व बित्तं बातमी त्रिंबकजीच्या मार्फत देत जा. पहिल्यापेक्षां आपली कामगिरी आतां जास्त महत्वाची व नाजूक आहे. तेव्हां जा, आपल्या कामावर सावध रहा.

भगवंत—आज्ञा सरकारची! (त्रिंबकजीस खुणावून.)

त्रिंबक—(पुढें होऊन) काय ह्मणतां ?

भगवंत—(हलकेंच) ह्मटलें आमची ठेव.

त्रिंबक—अगदीं सुरक्षीत आहे. ती तुमच्या घरच्या पेटींत आहे असें समजा. जा लवकर. श्रीमंता देखत असें गुपचुप बोलणें बरें नव्हे.

भगवंत—त्यांतलें थोडेंसें पाहिजे.

त्रिंबक—सध्यां जा, उद्यां या मग पाहूं.

भगवंत—बरें, पण लक्षांत राहूंद्या. (जातो.)

बाजीराव—कायरे तो ह्मणत होता.

त्रिंबक—दुसरें काय, कांहीं खर्चाला मागत होता. ही मराठी मंडळी ह्मणजे मोठी पैसे उडावू व व्यसनी. त्यांतून राजघराण्यांतली ह्मणजे मग काय विचारायचें, सतरा हजार कुलंगडी यांच्या मागें! त्यांतून पुण्यासारख्या शहरांत आल्यावर आणि श्रीमंतांकडून खर्चायला मुबलक मिळत असल्यावर यांच्या व्यसनाला जास्त भरती यायचीच! ही मंडळी कुबेराला सुद्धां भीक मागायला लावतील अशी उपद्यापी आहे.

बाजीराव—चार पांच हजार रुपये दे त्यांना.

त्रिंबक—नुकते गेल्या महिन्यांत दोन हजार रुपये दिले. परवा हजार रुपये दिले. पुनः तगादा आहेच.

बाजीराव—कायरे त्रिंबकजी, आतां या पारशाचें कसें करावें. हें लचांड सुटणार कसें व याचें तोंड बंद होणार कसें! याला कांहीं युक्ति काढिली पाहिजे.

त्रिंबक—हो, कांहीं युक्ति काढिली पाहिजे खरी. याचें तोंड अजिबातच बंद करून टाकावें कीं, या जन्मांत पुनः कधीं तोंडावाटे एक शब्द बाहेर पडणार नाहीं.

बाजीराव—तें रे कसें होणार.

त्रिंबक—युक्तीनें साध्य होत नाहीं असें या जगांत काय आहे. टोपीवाल्याकडे आतां त्याची फारशी किंमत नाहीं. त्याच्या बद्दल फारशी कोणी चवकशीही करणार नाहीं. सदाशिव माणकेश्वरास त्याच्याकडून पैन पैचा

हिशेब घेण्यास सांगायचें; त्यांत त्या दोघांची चांगली बाचाबाची होईल. तेव्हांच आपलें काम साधून घ्यावें. कदाचित् आपल्या नांवाचा बोभाटा झाला तर हिशेबाच्या कामांत यांचा फार घोंटाळा होता, तो आतां बाहेर पडेल सबब त्यांनींच असें कांहीं तरी आपली फजिती होऊं नये ह्मणून केलें असेल, असें पुन्हां लोकांत मोठ्यानें गर्जून सांगायला आपण मोकळे ते मोकळेच. हें करणें बरें दिसतें, यावर श्रीमंतांची आज्ञा.

बाजीराव—नामी, नामी युक्ती काढिलीस. नीट संभाळून मात्र कर. तुला सांगायला नकोच.

त्रिंबक—त्यांना उद्यांपासून बेटांत जाण्याचें बंद करतों, व ह्या पारशाचा हिशेब समजून घेण्यास सक्त ताकीद देतों. पण बेटांत कोणाला पाठवायचें.

बाजीराव—त्याची नको तुला काळजी ! आपला तो चिमणाजी नारायण व राघोबा करंदीकर यांना पाठवीत जा.

त्रिंबक—त्यांच्यानें तें काम होईल कां ? कारण तें आजपर्यंत वाड्यांतच राबले आहेत.

बाजीराव—अरे मी ज्याला जें काम सांगेन तो तें काम करील. मग तो शागीर्द असो कीं पाणक्या असो. अक्कल सर्वांना काय सारखी थोडीच असते. लहानापासून थोरापर्यंत सर्व मंडळी सर्व कामाला उपयोगी पडावी अशीच मी निवडून ठेविली आहे. तूं त्या राघोबाला काय कमी समजतोस ! तूं पहिल्यानें जासूद होतास, पण आतां माझ्या हाताखालीं राहून मोठमोठीं राज्याच्या उलाढालीचीं कामें करतोस कीं नाहींस ! मोठमोठ्या शहाण्याशीं टक्कर घेतोस कीं नाहींस ! लिहिणें वाचणें ज्याला येतें तोच मात्र शहाणा हें ह्मणणें अगदीं खोटें !

त्रिंबक—श्रीमंतांची कृपा व वरदहस्त काय करणार नाहीं आणि खरेंच आहे कीं, आजपर्यंत श्रीमंतांचे कोणचें काम अडून राहिलें आहे. फरडे मुत्सद्दी नाना फडणीस, व त्यांच्या फडावरची जमाखर्ची, चिटणीशी, एकेका बैठकीला पन्नास पन्नास कागद काळे करणारी, दौतीच्या दौती शाई संपविणारी, व भाराभर बोरूच्या लेखण्या तासून आपली फर्डेशाही दाखविणारी

बाकी मंडळी मेली किंवा निघून गेली ह्मणून श्रीमंतांचें काम अडलें कीं काय? मी उद्यांपासून आज्ञा झाल्याप्रमाणें रावोबास, व चिमणाजीस बेटांत बोलण्यास पाठवितों, व मी त्याच कामाच्या मागें लागतों. जी आज्ञा श्रीमंतांची होईल ती मग कोणची असो, ती बजावण्यास व हें शीर या पायाकरितां पुढें करण्यास हा त्रिंबकजी सदा तयारच आहे. या देहाचा, स्वामी सेवेखेरीज कांहीं उपयोग नाहीं.

बाजीराव—शाबास, त्रिंबकजी शाबास! अरे तूं तसाच आहेस.

(दोघे जातात.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—शास्त्र्याच्या वाड्यांतील बापू मैराळाचा दिवाणाना.

पात्रें—बापू मैराळ पत्रें लिहिण्याच्या कामांत गुंग होऊन गेला आहे.

बापू—(आपल्याशीं) एवढें हें पत्र पुरें केलें ह्मणजे सुटलों. बाकीचीं पहाटे लिहीन, अथवा उद्यां लिहिलीं तरी चालतील. (पत्र पुरें करून) शागीर्द, पाणक्या, जासूद, हुजऱ्या, आचारी, भट्ट, फकीर, वाणी, पुराणीक, हरदास मंडळी राज्यकारभारांत शिरली ह्मणजे त्या राज्याची स्थिती व तेथील प्रजेची दुर्दशा काय विचारायची आहे? ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं या ढाली पुढें केल्या ह्मणजे राज्याचें व राजाचें रक्षण उत्तम रीतिनें झालेंच ह्मणायचें! खरें आहे, रावबाजीच्या कारकीर्दींत जर अशा बहाद्दरांनीं उदयाला येऊं नये व राज्याचीं सूत्रें चालवूं नयेत, तर त्यांनीं उदयाला यावें तरी केव्हां? बापूसाहेब गोखले, आतां तुह्मी आपली विजयी समशेर म्यान्यांत घालून तिला शेवटची रजा द्या. पानशे तुमच्या तोफा आतां बहुतेक निरुपयोगी झाल्या सारख्याच आहेत. बिनीवाले, जिन्सिवाले आतां तुमच्या बिनीची व जिनसीची बाजीराव साहेबांच्या अमदानींत मुळींच गरज लागणार नाहीं. आजपर्यंत तुह्मी क्षात्रतेज दाखविलेंत व ब्राह्मण ह्मणजे "शापादपि शरादपि" आहेत; असें एक शतकभर सगळ्या जगाला दाखविलेंत, पण

आतां तुह्माला पूर्वींचीच दीक्षा पुनः धारण केली पाहिजे. कलमबहादर व तरवार बहादर अशा शहाण्या आणि शूर पुरुषांचा बोज करणारे ते नाना फडणविस, बाजीराव व भाऊसाहेब, आपला या लोकींचा अवतार संपवून केव्हांच निजधामास विश्रांति घेण्यास गेलें. आतां त्रिंबकजी डेंगळे, राघोबा करंदीकर, आपाजी रामचंद्र सहस्त्रबुद्धे, गोविंदपंत गोडबोले वगैरे मंडळी पुढें सरसावली आहे. बाजीराव साहेबांच्या अंमलांत शहाणपण, शौर्य, हिंमत, मुत्सद्दीपणा वगैरे गुणांची कांहीं एक जरूर नाहीं. हांजीहांजी करीतां आली, कपटकृतीनें लोकांना फसवितां आलें, जुलुमानें गरीबांचे गळे कापतां आले, व जगाला मोहून टाकणारीं एक दोन मोहनास्त्रें घरांत असलीं कीं कोणाचा उदय व्हायला या राज्यांत उशीर नाहीं! महाराष्ट्राचें दुर्दैव ओढवल्याशिवाय अशाचा राजकुलांत जन्म होणें व अशा मंडळीची चळचळाट होणें या गोष्टी घडत नाहींत. असो, आपल्याला काय करायचें आहे. आपण आज येथें आहोंत आणि उद्यां नाहीं.

(लखोटा बंद करून वर पत्ता लिहितो. इतक्यांत पार्वतीबाई येते, व त्याच्या हातांतील लखोटा घेते.)

पार्वती—इतकी रात्र झाली तरी आपलें लिहिणें आहेच! पुरें झालें बाई आतां तें. उद्यां लिहिलें तर नाहीं कां चालायचें?

बापू—या बसा तर खऱ्या. हें पहा, जें काम उद्यां करायचें तें उद्यां केलें तर चालेल, पण जें आज अथवा आतां केलेंच पाहिजे तें उद्यांवर टाकून कसें चालणार? लहान काय आणि मोठी काय, नोकरी ह्मटली ह्मणजे तिचें सुखदुःख काय असतें, याचा अनुभव तुह्माला काय? त्याचा अनुभव तुह्माला नाहीं हें एक प्रकारानें बरेंच आहे. तुमच्या संसाराच्या काळजींत आणखी याही काळजीची भर पडली ह्मणजे मग या सुकुमार शरीराची व मनाची काय बरें स्थिती होईल? आह्मी सर्व दिवसभर प्रपंचाचा गाडा चालण्याकरितां वाटेल तें श्रम करून, संध्याकाळीं दमून भागून विश्रांति घेण्याकरितां घरीं परत आल्यावर, हें नेहमीं प्रफुल्लित असणारें मुखकमल जर चिंतातापानें कोमेजून गेलेलें असलें, तर मग आह्माला घरांत व प्रपंचांत सुख कुठलें! या

हांसऱ्या आणि मोहक चेहऱ्याकडे पाहिलें कीं, जो काय आह्माला बाहेर ताप झाला असेल तो तत्काल निवारण होतो. मनुष्याचें मन बहकून जाईल, अशा ऐन आणीबाणीच्या प्रसंगींसुद्धां आपल्या मुखांतून दोन गोड शब्द आले कीं दुसऱ्या दिवशीं दुसरें काम करायला, व वाटेल त्या संकटाला तोंड देण्याला आह्मांस दुप्पट धैर्य येतें. मध्यान्हीवर आलेल्या सूर्यनारायणाच्या प्रखर किरणांनीं तप्त झालेला कोणी प्रवाशी, आम्रवृक्षाच्या थंड आणि दाट छायेंत गेल्याबरोबर जसा त्याचा ताप निवारण होतो व त्याला विश्रांति मिळते, त्याचप्रमाणें आह्मीं घरीं आलों व आपण आनंदीत आहांत असें पाहिलें कीं आह्माला आनंद होतो व विश्रांति मिळते. प्रपंच्याचा गाडा ओढण्याला आपली जर आह्माला मदत नाहीं, तर आह्मी एकटे काय करणार? तुमच्या वांचून आह्मी त्या कामांत लंगडे.

पार्वती—इतकी जर त्रासाची ही नौकरी आहे, तर ती कशाला करायची? सुखाची मिळाली तर करावी! नौकरी करायची मग ती दुःखाची कशाला?

बापू—नौकरी ह्मटली कीं तें दुःखाचें मूळ! त्यांत भेद कसला. बरें सुखाची नौकरी तूं ह्मणतेस ती कसली?

पार्वती—या नौकरींत आपल्याला दोन हजार रुपये साल मिळतें; शिवाय इतकी रात्रीच्या रात्रीं बसून लिहिण्याची दगदग पडते, त्यापेक्षां जास्त मिळकतीची व कमी दगदगीची जर दुसरीकडे नौकरी मिळाली तर कां बरें करूं नये?

बापू—अग वेडे, अशी कोठें मिळते आहे.

पार्वती—येथें पुण्यास नाहीं कां मिळायची! मी असें ऐकिलें आहे कीं छोट्या भाऊसाहेबांचें लग्न झाल्यावर येथील दिवाणगिरी तात्यासाहेबांस मिळणार. हें खरें कीं खोटें? तात्यासाहेबाना दिवाणगिरी मिळाली कीं आपल्याला मोठी एखादी मामलत अगर सुभायत मिळेल. त्यांना जरी दिवाणगिरी मिळाली नाहीं, तरीसुद्धां आपल्याला येथें मोठें काम मिळेल खास.

बापू—तात्यासाहेबांना दिवाणगिरी मिळणार. बरें ती त्यांना कदाचित्

नाहीं मिळाली तरी मला मोठें काम मिळेल, हें तूं कशावरून ह्मणतेस ? या असल्या बातम्या तुह्माला लागतात तरी कशा. शाबास आहे बोवा तुमची ?

पार्वती—असें वाड्यांत ताई ह्मणत होत्या. येथें पुष्कळांना मोठमोठ्या नोकऱ्या तेव्हांच लागतात. हलक्या माणसांनासुद्धां लागतात, मग आपल्याला कशी नाहीं लागणार ? त्यांतून तात्यासाहेबांचा आपल्याला मोठा वशिला आहे. ताई सांगत होत्या कीं, परवा श्रीमंतांनीं आपल्या दोन शागीर्दांना मोठाल्या मामलती दिल्या; ह्मणून ह्मणतें.

बापू—हें बघ तूं आहेस भोळी ! तुला पाचपेंच कांहीं कळत नाहींत. लग्न कसलें आणि दिवाणगिरी कसली ! काय काय होईल तें मुकाट्यानें पहात रहा. आपल्याला आपलें बडोदेंच सुखाचें आहे. सध्यांच्या काळीं शहाण्या माणसानें पुण्यांत नोकरी करण्याचा धर्म नाहीं, व ती आपल्याला नको. वाड्यांत फारशी जात जाऊं नकोस हो.

पार्वती—तिकडे लग्नाची तर अगदीं तयारी चालली आहे.

बापू—या लग्नाच्या गोष्टी ! ज्या दिवशीं टाळी वाजेल तेव्हां समजावें कीं लग्न झालें. तोंपर्यंत काय होईल आणि काय नाहीं याचा काय नेम सांगावा ?

पार्वती—काय तर भाऊसाहेबांचें लग्न फिसकटलें ?

बापू—तसें कांहीं नाहीं ह्मणा, पण—

पार्वती—पण काय तें मला सांगितलेंच पाहिजे, मी नाहीं ऐकायची.

बापू—भोळी आहेस, वेडी आहेस; पण त्यांत हट्टीही आहेस.

पार्वती—नाहीं—

बापू—(कान देऊन) तो बघ रामू रडायला लागला. बरें चल, मग सांगेन सर्व. आतां त्यावांचून कांहीं फारसें आडलें नाहीं. बायकांच्या तोंडांत गोष्ट मुळींच राहत नाहीं. सांगितलेल्या गोष्टी ध्यानांत ठेव ह्मणजे झालें.

(दोघे जातात.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—गणेशमहालाजवळील दालन.

पात्रें—नारोबा येतो.

नारोबा—(आपल्याशीं) तिनें हळदीकुंकवाच्या दिवशीं नांव घेतलें त्याचवेळीं माझी खात्री झाली. (साशंकित) शंका, छे, आतां शंका कसली ! इतक्या अवधींत तिच्या आणि माझ्या रूपांत बराच फरक झाला आहे. मी तिला जर एकदम ओळखूं शकलों नाहीं, तर तिनें मला ओळखलें असेल असें मला वाटत नाहीं. जर कदाचित् तिनें मला ओळखलें असतें; किंवा तिच्या मनांत मजविषयीं यत्किंचित्‌ही शंका आली असती, तर माझ्याशीं तिच्या वर्तनांत लागलीच बदल झालेला दिसून आला असता. पण तसा कांहीं एक फरक झालेला दिसत नाहीं, हें एक प्रकारानें चांगलेंच आहे. यामुळें योग्य संधी साधून मला, जसा माझ्या मनाप्रमाणें तिच्या दुष्कृत्याचा स्फोट करून सूड घेतां येईल तसा मग घेतां येणार नाहीं. यावेळेस तिच्या हांतात सर्व प्रकारची सत्ता आहे. बाजीराव आणि त्रिंबकजी डेंगळ्याचें या वेळीं तिला पूर्ण पाठबळ आहे. ती यावेळीं वाटेल तें करूं शकेल. या हरामखोरांनीं मला एकदम नेऊन एखाद्या किल्ल्यावर टाकले, अथवा मारेकऱ्याकडून माझे तुकडे करवले, तर माझा कोणाला मागमूससुद्धां लागणार नाहीं. वाईट मार्गाला लागून फार लांबवर गेलेली स्त्री दुखविलेल्या नागिणीसारखी भयंकर होय. तिच्या त्या मार्गांत आड येऊन तिला अडथळा करणारें जर कोणी माणूस तिच्या जवळच्या आप्तस्वकीयापैकीं भेटलें, तर ते तिला दुःसह झाल्यासारखेंच होतें. त्यांतून दुर्दैवानें जर तिची आणि तिच्या पतीची त्या मार्गांत प्रत्यक्ष गांठ पडली, तर ती त्याला हरप्रयत्नानें वाटेनिराळा केल्याशिवाय कधीं राहत नाहीं. केव्हांना केव्हां तरी ती आपला डाव साधून आपला दुर्मार्ग मोकळा आणि अगदीं निष्कंटक करून घेते. करितां तिला तिच्या दुष्कर्माची ओळख करून दिल्यानंतर इकडे तिकडे फिरकूं देतां उपयोगी नाहीं. एक घांव आणि दोन तुकडे लागलेंच करून निकाल लाविला पाहिजे. ही नागीण हातांतून एकदां निसटली कीं, ती प्राणांशीं गांठ घातल्याखेरीज कधीं

राहणार नाहीं. तेव्हां मला आतां योग्य संधीची वाट पहातच बसलें पाहिजे. अग दुष्टे—

[इतक्यांत भिमी येते.]

भिमा—नारोबा, एवढा आपल्याशीं विचार कसला करिता आहांत. एवढें कोणावर संतापला आहांत. तुह्मी रागावलेले दिसतां.

नारोबा—भिमाबाई मी आपल्या प्रारब्धावर संतापलों आहे. दुसऱ्या कोणावर संतापायचें !

भिमा—नारोबा, इतकें वैतागण्यासारखें काय झालें तें तर सांगा, माझ्या-हातीं जर कांहीं तुमचें समाधान होण्यासारखें असेल, अथवा एखादें काम होण्याजोगें असेल तर तें मला अवश्य सांगा. मी तें करण्याला कधीं मागें घेणार नाहीं.

नारोबा—तुमचा स्वभाव मला आवडतो, ह्मणूनच मी तुमच्याशीं वाड्यांतील इतर माणसापेक्षां जास्त मोकळ्या मनानें वागतों. स्त्रियांना काय अगर पुरुषांना काय आपलें मानसिक दुःख कमी करून घ्यायला दुसरें मनुष्य पाहिजे. तें दुसरें मनुष्य जरी त्याच्या दुःखाचा प्रत्यक्ष भार उचलून घेत नाहीं, तरी त्यानें त्याचें दुःख ऐकिलें, त्याच्या दुःखाचें तें वांटेकरी झालें ह्मणजे त्याच्या दुःखाचा भार कांहीं अंशीं तरी हलका होतो. तेव्हां माझ्या दुःखाच्या तुह्मी वाटेकरी होता कां ? मी ह्मणतो यांत तुह्माला कांहीं चमत्कारिक वाटण्याचें कारण नाहीं.

भिमा—जेथें तुमची नोकरी आहे, तेथेंच माझीही आहे, तुमचा माझा अनायासेंच सहवास होतो आहे, एकमेकांचा स्वभावही मिळतो; तेव्हां एकमेकांच्या सुखदुःखाचे वांटेकरी होण्याला आपल्याला काय हरकत आहे ? सहवासानें कांहीं दिवसानें में होईल तें आज झालेलें कांहीं वाईट नाहीं. अहो, कित्येक वेळां आपले शेजारचे ओळखीचे मित्र जसे प्रसंगीं उपयोगी पडतात तसे आपलें आप्त पडत नाहींत. झालें, मी तुमच्या सुखदुःखाचे वांटेकरीण. सांगा तुह्माला आतां जें काय सांगावयाचें असेल तें.

नारोबा—छे, तसें नाहीं. तुह्मी मला वचन दिलें पाहिजे.

भिमा—[मनाशीं] हा एवढें माझ्याकडून वचन मागतों तें कां बरें ? देऊं कां याला वचन. हो द्यायला काय हरकत आहे. याच्या मनांत भलतेंच कांहीं असलें तर. न जाणो कोणाची बुद्धि कोणत्या वेळेला कशी पालटते. पण आपण स्वतः खंबीर असल्यावर दुसरा काय करणार आहे. द्यावें, पाहूं तर खरें काय ह्मणतो तें. [उघड] नारोबा, माझा तुह्माला इतका विश्वास नाहींना ? हो, मी बोलून चालून कुळंबीण पडलें तेव्हां माझा विश्वास तुह्माला कसा येणार ? बरें तर हें घ्या वचन. [त्याच्या हातावर हात मारते.]

नारोबा—झालांतना आतां तुह्मी माझ्या सुखदुःखाच्या वांटेकरीण. तुह्मी माझी बहीण झालांतना ?

भिमा—झालें, मी झालें. अद्यापी तुमची खात्री होत नाहीं काय ?

नारोबा—अहो खात्री झाली. वांटेकरी झाले ह्मणजे मग दुसऱ्याच्या सुखदुःखाची जशी चांगली कल्पना होते तशी एऱ्हवी होत नाहीं, एवढ्याकरितां ह्मणतों. यामुळें काय झालें कीं, तुह्माला माझ्या अंतःकरणांत काय होत आहे हें चांगलें समजेल, व माझ्या पुढच्या कामांत एक तुह्मी मला मदत तरी कराल अथवा तुमच्या हातून मला मदत झाली नाहीं, तर तुह्मी माझें गुह्य तरी बाहेर फोडणार नाहीं.

भिमा—ती गोष्ट माझ्या हांतून कधींच होणार नाहीं. तुह्मी त्याबद्दल निःशंक असा ?

नारोबा—बरें तुमच्या वाड्यांत ताई, ताई, ह्मणून ज्या मिरवतात त्या कोण, त्याच्याविषयीं मी जी एवढी चौकशी करीत आहे याचें कारण काय ? याबद्दल तुमच्या मनांत कांहीं कल्पना आली कां ?

भिमा—मला देखील राहून राहून त्याबद्दल आश्चर्य वाटत आहे. कांहींच जेव्हां ध्यानांत येईना, तेव्हां ह्मटलें, असेल तुमची व त्यांची पूर्वींची ओळख. कदाचित् तुह्मी त्यांच्या गांवचे असाल अगर शेजारी असाल.

नारोबा—त्याशिवाय नाहीं कां कांहीं तर्क चालत ?

भिमा—कदाचित् त्यांचे तुह्मी लांबचे आप्त असाल. पुरती चौकशी करून घेऊन तुमची खात्री झाली ह्मणजे मग तुमच्या मनांतून त्यांना तुमच्या ओ-

ळखीची आठवण करून द्यायची असेल. या वेळेस त्या ह्मणजे हत्तीच्या गंडस्थळावर बसल्या आहेत, त्यांना त्यांच्या माणसांची सुद्धां यावेळीं ओळख पटणार नाहीं.

नारोबा—भिमाबाई, (रागानें) त्या अवदसेला मी तिच्या जन्माची व कर्मांची पुरी ओळख करून देणार आहे.

भिमा—(आपल्याशीं) हे मघाशीं असेंच बोलत होते, व आतांही असेंच रागानें बोलत आहेत, तेव्हां या ठिकाणीं नुसत्या आप्तपणापेक्षां जास्त कांहीं तरी गूढ आहे. काय असेल तें भगवान् जाणें. (उघड) नारोबा, तुह्मी हें काय बोलतां. तुह्माला वेड तर लागलें नाहीं ! तुह्मी हें कोणाविषयीं बोलता हें आहे कां तुमच्या लक्षांत. त्या कोण तुह्मी कोण याचें नीट स्मरण करा.

नारोबा—(संतापानें) माहेरची व सासरची अशी मिळून बेचाळीस कुळें नरकांत घालून, व्यभिचाराची पताका हातांत घेऊन मोठ्या डौलानें व निर्लज्जपणानें या तुमच्या वाड्यांत मिरविणाऱ्या जारणी स्त्रियांपैकीं ही एक राक्षसीण स्त्री होय; आणि भिमाबाई, मी कोण हें तुह्माला कळलें कां ? तिनें मला ओळखलें नाहीं पण मी तिला ओळखलें. तिच्या कृत्याची मी तिला लवकरच चांगली ओळख करून देईन. तशी मला संधि मात्र आली पाहिजे; व मी तिचीच वाट पहात आहे.

भिमा—(आश्चर्यानें) अगबाई, काय आपण ताईचे—

नारोबा—होय, होय, तोच हा अभागी नारोबा. व्यभिचारी स्त्रियांच्या दुर्दैवी पतींना जेव्हां असा आपल्या तोंडानें सांगण्याचा प्रसंग येतो, त्यावेळीं त्यांच्या अंतःकरणांत पेटलेल्या दुःखाग्नीच्या तापाची कल्पना ब्रह्मदेवालासुद्धां होत नसेल, मग दुसऱ्या मनुष्याला कोठून होणार ! तुह्माला माझ्या सुखाच्या वाटेकरीण होण्याचा प्रसंग येणार नाहीं, कदाचित् आला तर तो फारच थोडा वेळ " सुटला बिचारा " असें नुसतें समाधान मानून घेण्यापुरता मात्र येईल. पण आतां माझ्या दुःखाची मात्र तुह्माला बरोबर कल्पना होईल. भिमाबाई, या जगांत ज्यांच्या—

भिमा—गप्प रहा. ते पहा त्रिंबकजी इकडे येत आहे. त्यांच्या देखत आपण येथें बोलत उभें राहणें बरें नाहीं. आतां तुम्ही आपल्या कामाला जा आणि मीही आपल्या कामाला जाते. निवांतपणें मग केव्हां तरी बोलूं.

नारोबा—आपली प्रत्यक्ष स्त्री आणि तिचा जार या दोघांच्या प्रेमचेष्टा चालल्या असतां त्या पाहण्याचा आणि त्यांची नौकरी बजावण्याचा ज्याच्या कपाळीं प्रसंग येत असेल, त्याच्या सारखा दुर्धर प्रसंग व त्याच्या सारखा दुर्दैवी दुसरा या जगांत मुळींच नाहीं. आतां जाऊन त्या दोघांचे तुकडे तुकडे करूं काय ?

भिमा—ते पहा अगदीं जवळ आले. यावेळीं कांहीं अविचार करूं नका.

नारोबा—(शांत होऊन) बरें, माझें गुह्य मात्र कोठें फोडूं नका.

भिमा—नाहीं कुठें फोडणार नाहीं. तुम्ही आपला संताप मात्र आंवरा. जा. जा. निघा.

(दोघे जातात.)

प्रवेश चवथा.

स्थळ—ताईचा दिवाणखाना.

पात्रें—जवाहिराचा डबा पुढें घेऊन आरशांत पाहून ताई अंगावर एकेक दागिना घालीत आहे, बाजूला नारोबा उभा आहे.

ताई—(आरशांत पहात आपल्याशीं) खरोखर गायकवाडींतून आलेलें हें जवाहीर फारच अप्रतिम आहे. हा सात पदरीं मोत्यांचा कंठा चांगला उराच्या खालीं पडतो. एकाखालीं एक असे याचे पदर असून मध्यें रत्नजडीत एकेक पान आहे. या एका कंठ्यामुळें सर्व गळा कसा भरलेला दिसतो. सर्व मोत्यें कशीं एकजात पाणीदार असून वाटोळीं व लहानशा करवंदा एवढीं मोठीं आहेत. ही हिऱ्याची चिंचपेटी या कंठ्यावर चांगली दिसतें. तिच्या खालीं ही ठुशी. पेट्याच्या हिऱ्याचें पाणी जरा कमी आहे, त्या ठिकाणीं दुसरें बसवून घेतलें पाहिजे. ह्मणजे सर्व साज चांगला ठीक झाला. त्याचप्रमाणें या हिऱ्याच्या पाटल्या व बाजूबंद याही दोन चीजा अमोल्य

आहेत. या दोन चीजा खुद्द गहिनाबाईच्या व तरुताबाईच्या घालायच्या आहेत. या आमच्या दृष्टीस पडण्याची देखील पंचाईत, मग या घालायचें नांव कशाला? भगवंतराव व गोविंदराव ही दोन मंडळी पुण्यास आली म्हणून हें जवाहीर इकडे आलें. हें भगवंतरावानें त्रिंबकजीपाशीं ठेवण्यास दिलें आहे. आतां हें त्याला पुनः परत मिळण्याची आशा नको. कंठा व आंगठी तर त्रिंबकजीनें मला दिलींच आहेत. या पाटल्या व हे बाजूबंद मला घ्यायला काय हरकत आहे. हे त्रिंबकजीनें कांहीं आपल्या निढळाच्या घामानें मिळविले नाहींत. त्यांना हे असेंच फुकटांत मिळाले आहेत तेव्हां मलाही फुकटांत कां मिळूं नयेत? हे मीं बाजूला काढून ठेवले तरी त्यांना कांहीं समजायचें नाहींत. (आणखी एक मोत्यांची माळ त्यांतून घेऊन गळ्यांत घालते व आरशांत पहाते) आतां सर्व ठीक झालें. ही नथ, हिचा हिरा दुसरा बसविला पाहिजे. उद्यां तेंच काम. (नाकांत घालते.) गोऱ्या माणसाला मोत्याचे आणि हिऱ्याचे दागिने चांगले खुलतात. आतां मात्र मी खरी भरलेली लक्ष्मी दिसतें.

नारोबा—(आपल्याशीं, मान हालवून) उत्तम कुलांत जन्म घेऊन नीच कुळांतील वेश्येप्रमाणें आपल्या शरीराचा विक्रय करून मिळविलेल्या संपत्तीचा उपभोग राजरोसपणें घेणाऱ्या व तिनें आपलें शरीर भूषित करून त्यांत धन्य मानणाऱ्या जारिणी स्त्रियांच्या बेशरमपणापेक्षां आणखी स्त्रियांच्या बेशरपणाची सीमा ती कोणती! शरीराच्या कोणत्याही भागावर लागलेला डाग जसा आरशांत प्रत्येकीला दिसतो, तसा जारकर्मामुळें आपल्या व आपल्या कुळांतील प्रत्येक मनुष्याच्या तोंडाला लागलेला अखंडचा डाग जर या आरशांत दिसतां तर किती बरें झालें असतें. हिऱ्या मोत्यांचे दागिने घालून स्त्रियांच्या रूपांत जी भर पडते, व ज्याच्यामुळें तें त्यांना अधिक सुंदर दिसतें; तेंच रूप दुर्गुणामुळें किती कुरूप होऊन गेलें आहे हें जर त्यांना या कांचेच्या आरशांत दिसतें, तर किती तरी स्त्रियां या मार्गापासून परतल्या असत्या. या गोष्टी या कांचेच्या आरशांत दिसणार नाहींत. त्या निर्मळ मनोरूपीं आरशांतच दिसतात. पण तो—तो तर यांच्या दुर्गुणांच्या काज-

ळानें सारविलेला आहे. या गोष्टी त्यांना रोज याच आरशांत दिसल्या पाहिजेत. या जर त्यांत दिसत नाहींत, तर हे आरसे काय कामाचे! याचे तुकडेच केले पाहिजेत.

(रागानें आरसा फोडण्यास जातो, इतक्यांत त्रिंबकजी येतो.)

त्रिंबकजी—नारोबा, श्रीमंतांची स्वारी काय करीत आहे, तें पाहून ये.

ताई—आणि येतांना त्या माळ्यानें मोगऱ्याच्या आणि सोनचाफ्याच्या फुलांच्या पाट्या अद्याप कां पाठविल्या नाहींत हें पाहून ये, व येतांना त्या घेऊनही ये.

नारोबा—(उघड) बरें आहे. (मनाशीं) अरेरे, काय हें माझें नशीब. मी आतांच यांचा शेवट केला असतां, पण मला सध्यां तसें करितां कामा नये. याहून चांगल्या संधीची मला वाटच पहात आणखी कांहीं दिवस थांबलें पाहिजे. यांत मुख्य अपराधी कोण ? हा सुशील स्त्रियांच्या पाठीस लागणारा व त्यांच्या पातीव्रत्याचा भंग करणारा पातकी राक्षस, कीं ही जारिणी राक्षसीण; याचा मला विचार केला पाहिजे. जो जसा अपराधी असेल तशी त्याला शिक्षा झाली पाहिजे. पण मुख्य अपराध याच अवदसेचा; तेव्हां हिचाच मला चांगल्या तऱ्हेनें समाचार घेतला पाहिजे. हे मना, आणखी कांहीं दिवस दम धर; क्रोधाची ज्वाला इतक्यांत विनाकारण अनिवार होऊं देऊं नकोस. नेहमीं घासून पुसून तयार ठेवलेली तरवार आयत्यावेळीं उत्तम काम देते. (जातो)

त्रिंबकजी—काय चाललें होतें. जेव्हां पहाव्या तेव्हां आपली स्वारी कामांत दंग असते.

ताई—गायकवाडींतून आलेलें जवाहीर पाहून पुनः नीट ठेवीत होतें. खरेंच एकेक जिन्नस पहातच राहावें असें वाटतें. ही आपल्यापाशीं त्यांनीं ठेव ठेवण्यास दिली आहेना ?

त्रिंबक—होय, आणि दुसऱ्या आमच्या प्रेमाच्या ठेवी बरोबर ही मी आपली ठेव आपल्यापाशीं ठेवण्यास दिली आहे. नीट जतन करून ठेवा बरें.

ताई—मग ही परत द्यायची असेल. ही पेटी मी जशीच्या तशीच अलग ठेविली आहे. वाटेल तेव्हां घेऊन जावी.

त्रिंबक—हिच्या बरोबर दुसरी देखील अलग काढून ठेविली आहे कां? तसें असेल तर मात्र मग येथें येण्याची सोय नाहीं.

ताई—बसायचें नाहीं कां? एवढी मागें घाई कसली आहे.

त्रिंबक—छे, मला बसण्याला वेळ नाहीं. गायकवाडींतून आलेल्या जवाहिरापैकीं दोन चांगल्या हिरकण्या दे पाहूं.

ताई—कशाला त्या?

त्रिंबक—कशाला आणि काय, या रिकामटेकड्या चौकशा बायकांनीं करूं नयेत. दे ह्मटलें दिल्या. राज्यांतील सर्व भानगडीच्या प्रकरणाचा जर आह्मी रोज तुमच्या जवळ पाडा वाचूं लागलों, तर मग एक देखील काम शेवटास जायला नको. चल काढ लवकर.

ताई—(काढून देते) ह्या घ्या.

त्रिंबक—हं:, आतां ठीक केलेंस. ज्या गोष्टी तुह्माला सांगायच्या त्या आह्मी तुह्माला तुह्मी न विचारतां सांगतोंच. बरें आहे येतों आह्मी. कामाच्या गर्दीमुळें आपल्या सेवेंत आह्माला आज राहतां येत नाहीं याबद्दल क्षमा करा. हो, तुला आणखी एक सांगायचें राहिलें. भिमीला सांगितल्याप्रमाणें तिच्या कामगिरीबद्दल तिच्या बापाला व भावाला सोडून दिलें बरें कां? कोणाच्या ऋणांत राहणें आपल्याला आवडत नाहीं. (जातांना आपल्याशीं) ज्या हिरकण्या बाहेर अंगावर धारण केल्या ह्मणजे त्याला शोभा आणतात, त्या सगळ्या कशाला, त्यापैकीं एकच ही पोटांत धारण केली कीं या शरीराचा भडका करून मग तें गार करून टाकतें. दोहींची कांहीं जरूर पडणार नाहीं, फार करून एकीनेंच काम होईल. (जातो)

ताई—आतां नाहीं कळलें तर तें मला मागून कळेलच. कधीं राहणार नाहीं. [जाते.]

प्रवेश पांचवा.

स्थळ—खरशेटजी मोदीचा बंगला.

पात्रें—खरशेटजी मोदी आपल्या बिछान्यावर पडला आहे. जवळ भगवंतराव उभा आहे.

मोदी—[संतापानें] ए समदें त्या लुच्चया सदासिव माणकेसराचं काम होय. आमच्या पक्का खात्री झाला. आह्मी पेसवे सरकाराशीं इतना इमानदारीनें चारला, ते आमच्याशीं असे बेइमान झाले. आह्मी तेंचा किती काम करून दिला. ए सदासिवाला किती पैसा मिलवूनशेनी दिला, तेचा त्यांनीं आह्माला असा नतिजा दिला. बरा आहे. पेसवे सरकार आह्मी तुह्माला पाहून घेल. ए लुच्चा पाजी माणसालाबी पाहून घेल, आमच्याकडून ढाई लाख रुपिया नजराना घेतला, आन आमची सुभेदारीबी काढून घेतली. आम्ही इत्या दिनमधीं कांहीं कमावरा नाहीं. आमचा घरांत जे होता न्व्हता ते आह्मी नजरानापायीं खरचून टाकरा. आतां आमच्या जवर एक कवरी राहिला नाय, आतां आह्मी काय करेल? ए एलफिन्स्टन साहेब आमच्या पाठीस लागरे. तेने आन ए लुच्चयानें आमचा सगळा बिघाड केरा. या हरामखोरास सुभेदारी पाहिजे. ए आह्माला पेनसन घे ह्मणतो, ना तर एक नोकरी सोरायला सांगतो. आह्मी दोन नोकरी करतो तर याचा बापचा काय जाते. ए बदमाष सदासिव आमचा पेहेला बरा दोस्त होता, आतां आमचा ए दुस्मान होऊन आमचा गरा काटायला तयार झाला. याला सामील ते गंगाधर सास्त्रीबी मिराला. तेने आमचा नाम समदे दूर बदू केला. आमचा नाम गेला, आमचा पैसा गेला, आमचा समदा गेला आतां आह्मी काय करेल? बोंबा मारेल, तोबा, तोबा. आमचा तकदीर (डोक्यावर हात मारतो) पेसवे बाजीराव तुह्मी आमच्याशीं अशी दगाबाजी ए लुच्चयाच्या नादीं लागून केरी, तेचा बदला घेतल्याबगर आह्मी कधीं राहणार नाय. तुह्मी, सिंदे, होरकर, निजाम, भोसला, पिंढारी यांच्या बराबर तहा बरखिलाफ चोरून पत्रें पाठवितें, टोपीवाल्याविरुद्ध कारस्थान करते, ए आह्मी एलफिनस्टन साहेबाचे कानावर

घालेल, तुमचा नाम बदू करेल, तुमचा काम बिघारेल, ए तुह्मी चांगला ध्यानांत धरा. तरच आमचा नाम मोदी.

(इतक्यांत त्रिंबकजी येतो.)

त्रिंबक—शेटजी, शेटजी, इतकें संतापायाला काय झालें. थांबा जरा. शांत व्हा. हा कोण, होनाजी आहे कां ?

होनाजी—जी मी आहे.

त्रिंबक—होनाजी, मला शेटजीशीं कांहीं बोलायचें आहे, तेव्हां तूं जरा बाहेर उभा राहून कोणी येईल तर पहा.

होनाजी—जी. (तो जातो)

त्रिंबक—शेटजी काय सांगूं तुह्माला, मोठा भयंकर प्रसंग आला आहे. ती गोष्ट कळल्यापासून मला क्षणभर चैन पडेनासें झालें. तुह्मी माझे स्नेही, आमच्या दरबारांतील मोठे कामगार, त्या तुह्मावर असा प्रसंग आलेला पाहून माझ्यानें कसें राहवेल? शेटजीची भेट केव्हां घेईन आणि त्यांच्या कानावर हा मजकूर केव्हां घालीन असें मला होऊन गेलें. सर्व कामें तशीच सोडलीं, आणि हा असाच तुमच्याकडे धांवत आलों.

मोदी—त्रिंबकजी, तुह्मी आमचा बरा दोस्त. काय कसला प्रसंग आला. ते तो आह्माला कलूं द्या. आह्मी लई घाबरून गेले.

त्रिंबक—अहो, बेटांतून तुमच्या शहाण्या अलफिस्टन साहेबाकडून असें लिहून आलें आहे कीं, मोदीस दोन दिवसाचे आंत आमचे स्वाधीन केलें पाहिजे. ते आमचे गुन्हेगार आहेत; आणि हें सर्व तुमचे पूर्वीचे दोस्त सदाशिव माणकेश्वर यांनीं स्वतां त्या बडोद्याच्या शास्त्र्याच्या मार्फत साहेबाचे कान भरून, आपल्याला कर्नाटकची सुभेदारी मिळावी ह्मणून केलें ! हें दोस्त बरें. जिवाचे दोस्त. कोणत्या वेळीं गळा कापतील याचा नेम नाहीं.

मोदी—काय तिरमकजी, काय तुह्मी ह्मणते काय ? एलफिनस्टन साहेब आह्माला पकरून पाठवून देण्यास तुह्माला सांगतें. आह्मी गुन्हेगार आहे असें ह्मनतो. या भगवान, तोबा, तोबा. आतां आह्मी कसा करावा. आह्मी मेला, ठार मेला. आमचा अब्रू गेला, पेसा गेला, नाम गेला, इतना रोज आह्मी तेंची

चाकरी केली ते संमदा मोफत गेला. हाय भगवान कैसा बुरा बखत लाया. आह्मी मरेल तो आतां चांगला होएल. ए मोदीला, ए कर्नाटकच्या सरसुभेदाराला, ए बरा वकिलाला, बरा कामवाल्याला तो कैद करून नेनार, आन तुह्मी तुमच्या दरबारच्या नौकरास पाठविनार, असा कधीं होनार नाय. आह्मी कधीं जानार नाहीं.

त्रिंबक—शेटजी, तुह्माला तिकडे न पाठविण्याची कांहीं युक्ति काढिली असती, पण तुह्मी सध्यां जसे दरबारचे नोकर आहांत; तसे टोपीवाल्याचेही आहांत. तुमच्याकडचे सुभेदारीचें काम सध्यां निघालेंच आहे, तेव्हां तुह्मी खरे नोकर ह्मटलें ह्मणजे आतां टोपीवाल्याचे. तेव्हां आह्माला तुह्मास तिकडे पाठविणें भाग आहे. याबद्दल कलकत्याच्या लाट साहेबाकडून हुकूम आला असून, त्या हुकुमामावरून आमचा गुन्हेगार, तुह्मी आह्माला परत दिलाच पाहिजे असें साहेब ह्मणतो. त्यामुळें श्रीमंतांचा अगदीं निरुपाय झाला.

मोदी—तिरमकजी, आह्मी कधीं बेटांत जानार नाहीं. आमचा हे काला तोंड आह्मी दुनियेला कधीं दाखविनार नाय. आह्मी जेहेर खाऊन मरेल. पन आह्मी जानार नाय. कबी कबी जानार नाहीं.

त्रिंबक—जर पाठविलें नाहीं तर फौज पाठवून कैद करून घेऊन जाऊं, मग तुमचे आम्ही कांहीं ऐकणार नाहीं, असें साहेब ह्मणतो. मोठा बिकट प्रसंग आला आहे. शेटजी, आतां तुह्मीच याला कांहीं तरी युक्ति सांगा. मला सुद्धां जर तुमच्यावर प्रसंग आल्यामुळें आपण विष खाऊन मरावें असें वाटतें, तर तुह्माला काय वाटत असेल त्याची कल्पना कोणाला करतां येणार आहे? माझ्यावर जर असा प्रसंग आला असतां तर मी तात्काल वीष खाऊन मेलों असतों. अहो, आपल्या अब्रूपेक्षां जास्त मौल्यवान चीज या जगांत दुसरी काय आहे. ती गेल्यावर मग मागें राहून करायचें काय? शेटजी, तुमच्या सारख्या मोठ्या सुभेदाराला, जुन्या वाकबगार आणि फार दिवसाच्या वकिलाला, टोपीवाला एखाद्या चोराप्रमाणें कैद करून घेऊन जाणार? त्यापेक्षां मरण बरें; पण ती अप्रतिष्ठा सहन करणें नको!

मोदी—अरे तिरमकजी, तेचाच तो आह्माला लई दुक होतो. आमचा

दिल फाटून जातो. आह्मी वेरा झालो. सैतान बनलें. ए साहेब आमच्या पुरा पाठीस लागले, ते आमचा खराबा करेल, आह्माला कारेल, आह्माला कैद करेल; समदा करेल. आतां आह्मी कसा करेल. तोबा, हाय देवा—या खुदा, या तकदीर. (डोकें व हातपाय संतापानें आपटतो, व कपडे फाडण्याला लागतो) तिरमकजी, जेहेर, जेहेर दे. आह्मी आतां खातो.

त्रिंबक—(आपल्याशीं) बाबा, त्याची सुद्धां या. त्रिंबकजीजवळ तयारी आहे. आपल्या रोग्याचें निदान त्याच्या वैद्याला जितकें चांगलें कळतें, व कोणत्या प्रसंगाला कोणतें औषध, व कोणती मात्रा द्यावी हें त्याला जितकें चांगलें समजतें, तितकें दुसऱ्याला कळत नाहीं. श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे यांच्या तुला माहीत असलेल्या गोष्टी तूं उन्माद वायू झालेल्या मनुष्याप्रमाणें बाहेर लोकांना समजण्यासारख्या ज्याच्या त्याच्या जवळ बडबडूं लागलास, ह्मणजे तुझा तो वायु उतरण्याकरितां, व तुझें तोंड कायमचें बंद करण्याकरितां कोणती मात्रा द्यावी, हें त्रिंबकजीखेरीज चांगलें दुसऱ्या कोणाला कळणार ! बाबा तुझ्या या वायूला मला महामृत्यूंजयाच्याच मात्रेचा उपयोग केला पाहिजे.

मोदी—तिरमकजी, कांहीं युक्ती लढीव, आह्माला ए फंदातून सोरव. आह्मी काय करावें असें आह्माला झाला आहे. (इकडे तिकडे धांवतो.)

त्रिंबक—शेटजी, असें वेड्यासारखें काय करितां. हें काय ठेवलें आहे जवळ. सरबत आहे वाटतें. तर हें थोडेसें प्या, ह्मणजे तुम्हाला जरा बरें वाटेल, तुमचें डोकें थंड होईल.

मोदी —होनाजी, होनाजी, सरबत, सरबत, शराब, शराब, आन.

त्रिंबक—होनाजी कशाला ! मी तुमचा दोस्त आहे, मीच तुम्हाला देतो. जा तूं आपल्या कामाला. (मनाशीं) या कामाला त्रिंबकजीच पाहिजे. होनाजी नको. (जवळच्या बाटलींतील सरबत पेल्यांत ओतून त्यांत हलकेच खिशांतून पुडी काढून टाकतो.) (उघड) हंः घ्या लवकर. (तो पितो) (मनाशीं) बाबारे, विष कोणी सुखानें कां घेत असतो. त्याला तें द्यावेंच लागतें. रोग नाहींसा होण्याकरितां रोग्याला, कडू औषध वैद्यालाच पाजावें लागतें.

मोदी—पेसवे सरकारास सांगून कांहीं युक्ति काढून जर तुम्ही आम्हाला टोपीवाल्याकडे पाठविला नाहीं, तो तिरमकजी, आम्ही तुम्हाला एक लाख रुपये देएल. आ. आतां जरा बरा वाटतो.

त्रिंबक—पाहीन खटपट करून. तुमच्या दोस्तीकरितां मी एवढें कां कर-णार नाहीं. तुम्ही आतां स्वस्थ पडा. हा पहा, मी आतां श्रीमंतांकडे जाऊन तुमच्या कामाच्या खटपटीला लागतो. (मनाशीं) जितके लाख तुझ्याजवळ असतील तितकें तुझ्यामागें आमेचच आहेत.

मोदी—इस्वर तुमच्या चांगला करेल.

त्रिंबक—[मनाशीं] आणखी कांहीं वेळानें रोग्याची नाडी पहाण्याक-रितां मला यावें लागेल. [उघड] होनाजी, होनाजी. [तो येतो] शेटजी-ची तब्येत बरीच बिघडली आहे, करितां तूं त्यांच्याजवळ रहा. इकडे तिकडे भटकूं नको; आणि कांहीं जास्ती कमी झालें तर ताबडतोब येऊन मला कळीव.

होनाजी—जी. [तो जातो]

मोदी—[आंथरुणावर पडल्या पडल्या] ए लुच्चा सदासिव माणकेस-रानें समदा केला. अरे बदमाष, तूं आमचा दोस्त असून तूं आमचा गला कापायला तयार झालास. तुला आम्ही किती पैसा मिलून देला. साहेब लो-कांत तुझी मुलाखात, तुझी पैचान करून दिली, त्येचा दोस्तीचा बदला तूं आ-म्हासनी ए दिला. हाय भगवान्. या खुदा, या अल्ला. ए कैसा हुवा. आम-च्या बदनाला अंगार लागरा. ते जरते, आम्ही मरतो. आमचा जान जातो. आम्हाला गरमी झाला. [कपडे काढून फेंकून देतो.] होनाजी, ए साला होनाजी. अरे पंखा पंखा कर. पानी लाव, आमच्या बदनपर डाल. ते साला विझव. अरे विस्तु लागला. जलदी,—डाक्टर—जलदी बुलाव. भाग, दौड, निकल जलदी—जलदी आन साला—आम्ही मरते.

[इतक्यांत सदाशिव माणकेश्वर येतो.]

सदाशिव—शेटजी, सरसुभेदारीचा हिशेब, हिशेब द्या, आत्ता पाहिजे. आम्हाला पेशवे सरकारचा सक्त हुकूम आहे कीं, तुमच्याकडून सर्व माम-

त्याचा हिशेब घेतल्याखेरीज तुम्हाला येथून हालूं द्यायचें नाहीं. चला हिशेब आणा.

मोदी—(संतापानें) तूंम तुम साला बदमाष. आमचा दोस्त, तूं आमचा गला कापायला तयार झाला. तुला सुभेदारी पाहिजे, पेसवे सरकारचा कान तुं भरला. साहेबास चुगल्या सांगून समदा आमचा अब्रु घेतला, पैसा खाल्ला, खराबा केरा. तु, तु आमचा दुस्मान बनला. ए सदासिव, ए लुच्चा, बदमाष हरामखोर, पाजी, माणस आतां आह्माला सतावला आले. हिसाब, साला हिसाब मागते.

सदाशिव—शेटजी तोंड संभाळून बोला. हें कोणाशीं बोलतां. हा पेशव्यांचा वकील व कर्नाटकचा सुभेदार सदाशिव माणकेश्वर आहे समजलांत ? बऱ्याबोलानें हिशेब देतोस कीं नाहीं, कीं तुला येथल्या येथें कैद करूं.

मोदी—(संतापानें) कोन साला तु बदमाष आह्माला कैद करनार. हिसाब घेनार. घे, घे, साला हिसाब घे. (असें ह्मणून त्याला मारायला धांवतो, दोघांची झटापट होते, मोदी मोठ्यानें) मेला. मारला, खून, जेहेर दिला, मारला, मारला. मेला. अंगार लागला.

(इतक्यांत त्रिंबकजी आपल्या लोकांसह आंत येतो.)

त्रिंबक—(लगबगीनें येऊन) भाऊसाहेब, भाऊसाहेब, काय हा प्रकार. खून ! मारला, मेलों. जेहेर दिला. असें काय हें ह्मणतात.

मोदी—अरे तिरमकजी, ए, ए, साला सदासिव, आमचा दुस्मान ऐने आमचा खून केला. एने होनाजीला फितविला, आह्माला जेहेर दिला. याला हरामखोराला पकरा. आमचा बदन जलाला. आह्मी मरतो. आमची जान जाती. या अल्ला. तोबा, खुदा. पानी, थोरा थोरा पानी. पानी–पानी.

(तो मरतो.)

त्रिंबक—(शिपायास) अरे पहातां काय ? पकडा, पकडा या दोघांना पकडा. बांधा यांच्या मुसक्या. (शिपाई होनाजीस व सदाशिव माणकेश्वरास पकडतात.)

सदाशिव—हं: खबरदार !

त्रिंबक—तुह्मी त्यांचें कांहीं ऐकूं नका ?

सदाशिव—त्रिंबकजी, मी श्रीमंतांच्या हुकुमाप्रमाणें हिशेब घेण्याकरितां आलों, तो शेटजी बेफाम होऊन मला शिव्या देऊं लागले. हें होऊन माझ्या अंगावर धांवून आले, मी त्यांचे हात धरले तों ते " मारलें जेहेर दिलें. खून खून " ह्मणून ओरडले.

त्रिंबक—भाऊसाहेब, तुमच्या समोरच त्यांनीं तुमच्या तोंडावर सांगितलें. झाला हा प्रकार फार वाईट झाला. तो टोपीवाल्याचा वकील. काय अनर्थ होईल नकळे.

होनाजी—त्रिंबकजी, मला काय ह्मणून कैद करतां.

त्रिंबक—तूं यांना या कृत्यांत सामील ह्मणून. (शिपायास) अरे यांना थेट लागलेच सिंहगडावर पोंचवा. मध्यें सोडूं नका.

सदाशिव—त्रिंबकजी, पहा बरें.

त्रिंबक—एवढ्याकरितां शेटजीच्या तोंडचे मरतां वेळचे शब्द. एवढा पुरावा बस्स आहे. चला—चला—याची पुढें नीट चौकशी होईल.

होनाजी—त्रिंबकजी, मी कोण आहे हें विसरला वाटतें. मी होनाजी नव्हे, भगवंतराव गायकवाड; गोविंदराव गायकवाडाचा मुलगा.

त्रिंबक—अरे हरामखोरा, मग होनाजी ह्मणून येथें कशाला रे राहिलास. तूंच याला वीष पाजलेस. तूं सीतारामपंत दिवाणाचा गुप्त हेर आहेस. अरे चोरा, बेरडा. तूं असें केलें असशील, यांत आतां बिलकूल शंका नाहीं. कमअस्सल मनुष्याखेरीज दुसऱ्याच्या हांतून असलीं गळेकापूचीं कामें होतच नाहींत. याला रायगडावर पाठवा. सिंहगडावर नको. चला ओढा.

होनाजी—अरे त्रिंबकजी, तूं आमचें जवाहीर तीन लक्षांचे घेऊन, आमच्या कामांत मदत करतो ह्मणून सांगून शेवटीं असा उलटतोस काय ?

त्रिंबक—अरे तर मग हा पक्का दरोडेखोर व खुनी ! ! आतां हा बडबडायला लागला. खरे अपराधी आपला अपराध छपविण्याकरितां असेंच दुसऱ्याच्या गळीं पडतात. चला जारे याना घेऊन नीट बंदोबस्तानें न्या.

दोघे—अरे चोरा, त्रिंबकजी विश्वासघातक्या. (शिपाई त्यांस नेतात.)

त्रिंबक—याला तीन लक्षांचें जवाहीर पाहिजे, व त्याला कर्नाटकची सर-सुभेदारी पाहिजे. सिंहगडाच्या अंधार कोठडींत बसून करा तेथें खुशाल सर-सुभेदारी; आणि तूं लेका रायगडावर बसून तीन लक्षाच्या जवाहिराबद्दल हवे तितके खडे गोळा कर, पाहिजे तर काळ्या दगडावर आपलें डोकें खुशाल आपटून आपटून प्राण दे. (मोदीच्या प्रेताकडे पाहून) हा रोगी आतां शांत झाला. श्वासोश्वास नाहींना चालत? सर्व गार झालें आहे! कोठून चाल-णार. महामृत्यूंजयाची त्रिंबकजीनें मात्रा दिल्यावर श्वासोश्वास चालणार कसा? शिंदे, होळकर, निजाम, भोंसले, पेंढारी, याच्या बरोबर टोपीवाल्याविरुद्ध चाललेला पत्रव्यवहाराबद्दल तुम्ही लोकांना सांगणार होता नव्हे? शेट साहेब, बरें. श्रीमंत पेशवे सरकारचा मार्ग चांगला साफ करीत असतां, मध्यें येणारे हे मोठें मोठें दगड, कांटे, हे मला वाटेनिराळे करून टाकलेच पाहिजेत.

(जातो.)

अंक पांचवा.

प्रवेश पहिला.

स्थळ—बाजीरावाचा महाल.

पात्रें—बाजीराव आणि त्रिंबकजी.

त्रिंबकजी—त्या मोद्याकडून कर्नाटकची सुभेदारी काढून घेतल्यापासून तो फारच बेफाम होऊन गेला होता. अवांतर राजे रजवाड्यांशीं राज्यकारण प्रकरणीं झालेला पत्रव्यवहार जो त्याला माहित होता, त्या संबंधानें 'मी असें करीन, मी तसें करीन, मी रेसिडेन्टास, यांचा आंतून फिरंगी लोकांशीं सर्वांना सामील करून घेऊन लढाई करण्याचा व त्यांना येथून घालवून देण्याचा बेत आहे, असें सांगेन.' अशा गोष्टी तो बेधडक यःकश्चित चाकर लोकांसमक्ष मोठमोठ्यानें बोलत असे. मृत्यूनें त्याचें तोंड जर बंद झालें नसतें, तर आज-पर्यंत लढाई उपस्थित होऊन किती रक्तपात झाला असता, व श्रीमंतांना

किती त्रास झाला असतां कोण जाणे! पिसाळलेलें कुत्रें इकडे तिकडे धावूं लागलें, एकसारखें भोंकूं लागलें, व ज्याच्या त्याच्या अंगावर चावा घेण्याकरितां जाऊं लागलें ह्मणजे त्याला ठार मारल्याशिवाय दुसरें गत्यंतरच नसतें. नाहीं तर तें कित्येकांच्या प्राणघातास कारण होतें. एरव्ही एवढ्या भानगडींत पडण्याची येथें कोणाला हौस कां आहे?

बाजीराव—झालें हें फारच चांगलें झालें. पेंढारी लोकांशीं, शिंदे, भोंसले, निजाम वगैरे लोकांशीं चाललेलें कारस्थान तूं बाहेर फोडणार होतास नाहीं? फोड ह्मणावें आतां कसें कारस्थान बाहेर फोडतोस तें! बेइमान, चोर, आमचेंच अन्न खाऊन आमच्यावर उठला होता. पण त्रिंबकजी, त्याच्याविषयीं फारशी कोणी चौकशी केली नाहींनारे!

त्रिंबक—त्याचें वजन टोपीवाल्याकडे आतां पूर्वींप्रमाणें राहिलें नाहीं. ते त्याला फितुरी समजतात, असें मी श्रीमंतांस पूर्वींच विदीत केलें आहे. त्यांतून कर्नाटकच्या सुभेदारींत त्यानें बराच घोंटाळा केला आहे, याचाही पुकार चहूंकडे झाला आहे. शिवाय सदाशिव माणकेश्वराची व त्याची हिशेबासंबधानें झालेली बाचाबाची हीही सर्वांना माहीत आहे. रेसिडेन्टसाहेबानें एक कोणती तरी नोकरी सोडून देण्याबद्दल, त्याच्यामागें लावलेला तगादा हाही सर्वांना कळून चुकला आहे, तेव्हां अशा प्रकारचे सर्व अपमान सोसण्याची पाळी येऊं नये ह्मणून त्यानें विष खाऊन प्राण दिला असावा, अशी आतां सर्वांची खात्री होऊन चुकली आहे; त्यामुळें कोणी त्याची फारशी चौकशी केली नाहीं. इतकेंच वाईट झालें कीं, त्या वेळीं सदाशिव माणकेश्वर व भगवंतराव यांस मात्र कैद करावें लागलें. पण त्या ठिकाणीं माझा अगदीं निरुपाय झाला. ते दोघे त्या वेळीं माझ्यावर अगदीं सर्पाप्रमाणें उलटलें.

बाजीराव—अरे त्यांत वाईट काय झालें! झालें तें सर्व चांगलेंच झालें. तुझ्या हातून गैरशिस्त कांहींच व्हावयाचें नाहीं, ही माझी पूर्ण खात्री आहे. त्या हरामखोराला तसेंच पाहिजे. लेकाचा त्या पारसुटल्याला मिळून गेला होता!

त्रिंबक—श्रीमंतांचा माझ्यावर तसाच भरंवसा आहे ह्मणून मला श्रीमंतां-

करितां आपलें शीर देण्यास मुळींच दिक्कत वाटत नाहीं. हें काय श्रीमंत जाणत नाहींत असें थोडेंच आहे ? तसाच प्रकार या शास्त्र्यासंबंधानें करण्याचा प्रसंग येईल असें वाटतें. परमेश्वर करो आणि तसें कांहीं न घडो ह्मणजे झालें. पण मला वाटतें, त्याच्या विषयींही बंदोबस्त करावा लागेल. त्या कत्र्याचें तोंड बंद झाल्याबरोबर हें कुत्रें पिसाळलें आहे. पहा बरें, श्रीमंतांनीं त्याची स्तुती केली, त्याला आपली मुख्य दिवाणगिरी देऊं केली, त्याच्या मुलाला आपली मेहुणी देऊं करून शरीरसंबंध करून घेण्याचा योग आणला. त्यानें प्रथम होय ह्मटलें, लाख रुपये हुंडा ठरला, येथें नाहीं तर नाशिकास त्याच्या ह्मणण्याप्रमाणें जेष्ठमासीं लग्न समारंभ उरकून घेण्याचें ठरलें, दोन्ही कडची लग्नाची जय्यत तयारी झाली, आणि आतां हा पढत मूर्ख बदलून गेला ! लग्न कर्तव्य नाहीं, कांहीं एक कर्तव्य नाहीं, असें ह्मणून आतां कामाचा काय तो निकाल आधीं करा ह्मणून आपलाच हेका धरून बसला आहे. आतां हा पिसाळला नाहीं ह्मणावें तर काय ह्मणावें ? श्रीमंतांनीं आपली मेहुणी त्याच्या मुलाला द्यावी व त्यांनीं जातीनें तो समारंभ करावा असें याचें कुल कोणचें मोठें आहे ? बारा पंधरा वर्षांपूर्वीं तर फडक्यांच्या घरीं पुराण वाचीत होता. सगळी तयारी फुकट गेली. सर्व सामान मातीमोल होऊन गेलें.

बाजीराव—अरे त्रिंबकजी, त्याचें हें असें दुटप्पी वर्तन पाहून मला त्याचा अत्यंत राग आला आहे; पण करणार काय ? आंजारून गोंजारून त्याच्याकडून आपलें काम करून घेतलें पाहिजे. व तेवढ्याचकरितां मीं त्याला आज मेजवानीस बोलाविलें आहे, व उद्यांच्या आषाढी एकादशीस त्याला पंढरपुरास यात्रेकरितां बरोबर घेऊन जाण्याचा विचारही केला आहे. त्याला वळवायलाही फारसा उशीर लागत नाहीं. शास्त्री बोवाची थोडीशी स्तुती केली, त्यांना थोडीशी जास्त गळ घातली कीं शास्त्री पाघळलाच !

त्रिंबक—मला देखील जर त्याच्या अशा वर्तनाचा राग आला, तर श्रीमंतांस आला असेल यांत नवल काय ?. श्रीमंतांचा सर्व खर्च व्यर्थ जाऊन हिरमोड झाला, आणि शास्त्री वकीलानें स्थळ नाकारिलें; तेव्हां या ठिकाणीं

तशीच कांहीं गोम असली पाहिजे, अशी चर्चा मात्र आतां चहूंकडे सुरू झाली. छे, छे, श्रीमंतांसारखा भोळा आणि सहनशील स्वभाव मीं मुळींच पाहिला नाहीं. बरें, नाहीं ह्मणायला असें मोठें कारण काय सांगतों, तर ह्मणें आमच्या यजमानास हें आवडलें नाहींसें दिसतें! कारण, त्यांचें उत्तर आलें नाहीं. अहारे शहाण्या, आणखी नुकतेंच पुनः गोविंदराव गायकवाडाला बडोद्याहून या शास्त्र्याच्या संबंधांत काय पत्र आलें आहे तें श्रीमंतांजवळ मीं काल विदीत केलें आहेच. 'वाटेल ती खटपट करा, पण शास्त्र्यास इकडे परत येऊं देऊं नका.' अशा मजकुराचें आलेलें पत्र गोविंदराव गायकवाड घेऊन श्रीमंतांस दाखविण्याकरितां मजकडे आज सकाळीं येत होते, तें पत्र त्यांच्या हांतून कुठें गहाळ झालें, तेव्हां त्यांना मोठी काळजी पडली आहे. कारण तें पत्र जर दुसऱ्याच्या हातीं गेलें, तर गुणाजी कोण व होनाजी कोण हें कारस्थान तेव्हांच बाहेर येईल. आणखी बापू मैराळास त्यांचा थोडासा संशयही येऊं लागला आहे; तेव्हां त्यांची विनंती आहे कीं, आतां लवकर जितकें काम होईल तितकें उभयतांसही श्रेयस्कर. त्यांचें हें ह्मणणें कांहीं गैरवाजवी नाहीं असें मला वाटतें; तेव्हां त्याही गोष्टीचा विचार झाला पाहिजे. मी ह्मणतों कीं अनायासें स्वारी पंढरपुरास यात्रेकरितां जात आहे, शास्त्रीही बरोबर कदाचित् येतील. तेव्हां त्या बाहेर ठिकाणीं जर कांहीं कारस्थान केलें तर काय हरकत आहे? येथें तसें कांहींच करितां येणार नाहीं. कारण शास्त्री वकील मोठ्या बंदोबस्तानें व लवाजम्यानिशीं राहतो.

बाजीराव—त्रिंबकजी, माझ्या मनांत तशीच कल्पना येते. तो आतां आला ह्मणजे मी सर्व खुलासा करून घेतो, व बरोबर चलण्याचा त्याला आग्रहही करतो. तूं पुढची सर्व तजवीज ठेव. जसा प्रसंग येईल तसें करावें.

त्रिंबक—त्या दिवसापासून श्रीमंत नारायणराव पेशवे कधीं श्रीमंतांच्या नजरेस पडलें कां? आतां कधीं पाऊलें वगैरे वाजल्याचा श्रीमंतांस भास होतो काय?

बाजीराव—मीं त्या गणेशमहालांत त्या दिवसापासून मुळीं कधीं पाय ठेवला नाहीं. अरे त्या दिवशींचा लक्ष ब्राह्मण भोजनाचा व पुण्याभोंवतीं आम-

राई लावण्याचा, पाणपोया, धर्मशाळा वगैरे बांधण्याचा नवस यंदा फेडले पाहिजेत; नाहीं तर त्रास व्हावयाचा.

त्रिंबक—छे, देवाचे नवस आधीं फेडले पाहिजेत. पाणपोया, आमराई, धर्मशाळा वगैरे बांधण्याचें काम सुरू करतों आणि ब्राह्मण भोजनाचें काम आषाढी द्वादशीपासून पंढरपुरास सुरूं करितां येईल. महाक्षेत्र आहे, त्यांतून श्रीमंतांची स्वारी तेथें आषाढीकरितां यंदा जात आहे, तेव्हां तेथें झालें तर फारच उत्तम!

बाजीराव—योग्य, अगदीं योग्य.

(इतक्यांत भालदार ललकारत पुष्कळ लव्याजम्यानिशीं
गंगाधर शास्त्री व बापू येतात.)

त्रिंबक—हे शास्त्री बोवा आले. मी आतां तिकडची व्यवस्था कशी काय आहे ती पहाण्यास जातो.

बाजीराव—झाली कीं वर्दी दे.

त्रिंबक—आज्ञा. (तो जातो.)

बाजीराव—यावें तात्यासाहेब, असें यावें. असे गादीवर याहो. अहो मुख्य मंत्र्याची गादी ह्मणजे कांहीं येथून फार लांब नाहीं.

गंगाधर—श्रीमंत जें ह्मणतील तें खरें आहे.

बाजीराव—आपल्या कडून लग्नाच्याही कामांत शेवटीं जेव्हां नकार आला, त्या वेळेपासून आमचा अगदीं हिरमोड होऊन गेला. आह्माला कांहीं सुचेनासें झालें आहे. एकमेकांचा शरीरसंबंध झाला ह्मणजे एकमेकाला एकमेकांची काळजी जास्त लागते. आह्माला तुमची काळजी लागेल आणि तुमचेंही लक्ष मग आमच्या राज्यकारभारांत जास्त लागेल; अशा हेतूनें आह्मी तो योग जुळवून आणण्याचें योजिलें होतें. पण आपणा मनुष्याची योजना काय बरें कामाची! त्यांतून या लग्नाच्या कामांत तर मुळींच उपयोगी पडत नाहीं. या कामांत एक परमेश्वराचीच योजना पाहिजे.

गंगाधर—या कामांत माझा अगदीं निरुपाय झाला. महाराजांचें अनुकूळ

उत्तर न आल्यामुळें श्रीमंतांच्या मनाचा हिरमोड करण्याचा प्रसंग आला. असो. अजून कांहीं फारसें बिघडलें आहे असें नाहीं.

बाजीराव—नाहीं, कांहीं फारसें बिघडलें नाहीं. यंदा नाहीं पुढल्या वर्षी! अजून दोघेंही लहान आहेत.

गंगाधर—होय, तोंपर्यंत आमच्या महाराजांच्याही कामाचा निकाल होईल. मग शरीरसंबंध होण्याला कोणताही प्रत्यवाय येणार नाहीं. सध्यां जर असा संबंध झाला, तर यजमानांच्या मनांत विनाकारण किंतु येईल. कदाचित् आला नाहीं तर जवळची चहाडखोर मंडळी जी असते, ती काय उगीच बसेल, ती आणून देईल. मोठ्या लोकांचा, त्याचप्रमाणें राजांचा, आणि त्यामुळें राज्याचा जो सत्यानास होतो तो या हरामखोर, हलकट, आणि चुगलखोर लोकामुळेंच! यांच्यापासून राजे लोकांनीं फार दूर असावें, असें राजनीतींत सांगितलें आहे; पण तसें होणें फार फार डिफीकल्ट असतें. ड्याम् दीज स्लांडरर्स आणि फ्ल्याटरर्स. आभ्रकाच्या अगदीं पातळ पानापेक्षां देखील यांचे कान यांच्यामुळें हलके होतात.

बापू—(आपल्याशीं) बरी बरी कान उघाडणी चालली आहे. पण या आंधळ्या आणि मूढांच्या सभेंत हे शालजोडींतले पायपोस काय कामाचे. यांना चांगले उघड उघड मोजले पाहिजेत. कारण जसे देव तशी पूजा.

बाजीराव—याकरितांच तर मी ह्मणतों कीं, आपल्यामारखे मुत्सद्दी आमच्या दरबारीं पाहिजेत; आणि त्याकरितांच तर आमची सर्व खटपट आहे. तात्यासाहेब, आपल्यासारखे विद्वान, हुशार, मुत्सद्धी असें रत्न आह्माला मिळणार कोठें! अहो, या अमदाबादच्या मामल्यामुळें आपलें येणें आमच्या दरबारीं झालें, त्यामुळें आपला सहवास झाला, आणि सहवासामुळें आपली योग्यता आमच्या व आमच्या दरबारच्या मंडळीच्या नजरेस आली. नाहीं तर कशानें कळणार होती? आह्मी आपल्याला आतां मुळींच सोडणार नाहीं; व राज्यकारभारांतही लक्ष घालणार नाहीं. तुह्मी जाणें आणि तुमचा तो राज्यकारभार जाणे. गायकवाडी जी. एवढी उदयाला आली, व जिनें टोपीवाल्याशीं सुद्धां राज्यशासन नवीन पद्धतींत इतक्या थोड्या दिवसांत टक्कर

मारिली, ही सर्व आपली कर्तबगारी आहे; हें कोणाला माहित नाहीं बरें! तेव्हां आपल्यासारख्याचा हा अपूर्व लाभ होण्याचा सुयोग आला असतां तो हातचा कोण बरें दवडील? तात्यासाहेब आषाढीच्या यात्रेहून परत आलों कीं तेंच काम करायचें. आह्मी आपल्याच आज्ञेप्रमाणें चालूं.

बापू—(आपल्याशीं) बोलण्यांत कशी साखर पेरली जाते! पण हातून कांहीं होईल तर शपथ!

गंगाधर—सर्व धोरणें ज्याला राखतां येतील, असा धोरणी मनुष्य पाहिजे. अहो श्रीमंत पालिसीसी पालिसी लढविली पाहिजे, व जरा स्ट्रेंग्थ आफ् क्यारेक्टर दाखविली पाहिजे; ह्मणजे सर्व नीट होतें.

बापू—(आपल्याशीं) आमचे तात्यासाहेब तेव्हांच पाघळतात, हीच त्यांच्यांत मोठी गोम आहे. तेवढ्यामुळें ते दुसऱ्याच्या तेव्हांच टप्यांत येतात. तेवढें नसतें तर हिरा अमोल यांत कांहीं शंका नाहीं.

बाजीराव—तुमच्या ह्मणण्याप्रमाणें करायचें, दुसरी गोष्ट नाहीं. दुसऱ्यापाशीं चांगला गुण असेल तो कां घेऊं नये.

गंगाधर—चांगला गुण, चांगला उपदेश, लहान मुलापासून सुद्धां घ्यावा. ' सुभाषितं बालादपि ग्राह्यम्. ' बरें कामाचा निकाल श्रीमंत केव्हां करणार? स्वारी पंढरपुरास यात्रेस जाणार, तेव्हां जास्त दिवस लागतील; आतां अवधी राहिली नाहीं.

बाजीराव—आषाढीच्या यात्रेला कांहीं फार दिवस लागायचे नाहींत. आपणही आमच्या बरोबर यात्रेस चलावें.

गंगाधर—छे, छे, मला येतां येणार नाहीं. माफी असावी.

बाजीराव—पण आह्मी आपल्याला घेऊन जाणार. तात्यासाहेब, दहा पंधरा दिवसाची गोष्ट. लौकरच परत येऊं. सड्या स्वारीनिशीच जाऊं. आणखी तुमच्या आमच्या विचारानें पुष्कळ गोष्टी करावयाच्या आहेत; त्याचाही निवांतपणें तेथें विचार करूं.

गंगाधर—नाही ह्मणायचें माझ्या मोठें जिवावर येत आहे.

बाजीराव—तात्यासाहेब, आपण आमची प्रत्येक गोष्ट नाकारतां हें काय?

यांत आपल्याला मोठें ओझें कसलें वाटतें. देवाच्या, त्यांतून पंढरीनाथासारख्याच्या आषाढीच्या यात्रेला नाहीं ह्मणूंच नये. तुह्मी एकदां पहा तर खरें तेथील मौज. भूवैकुंठ आहे. आजच निघायचें. प्रस्थान ठेविलें आहे. शुभ दिवस असून सन्मूख चंद्रमा येत आहे.

गंगाधर—पण माझा उद्यां घातवार आहे. त्या दिवशीं प्रयाण करूं नये असें शास्त्र आहे.

बाजीराव—त्याबद्दल शास्त्रार्थ काढून करूं कांही शांति !

गंगाधर—पण—

बाजीराव—पण बीण नको. बापू, आपण मागची सर्व व्यवस्था ठेवा. तात्यासाहेब आतां घरीं येत नाहींत.

(त्रिंबकजी येतो.)

त्रिंबक—सर्व तयारी आहे.

बाजीराव—आमचीही तयारी आहे, त्रिंबकजी, तात्यासाहेब स्वारी बरोबर येतात; त्यांची सर्व व्यवस्था ठेवा.

त्रिंबक—आज्ञा.

(सर्व जातात.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील बाग.

पात्रें—त्रिंबकजी आणि गोविंदराव येतात.

त्रिंबकजी—गोविंदराव, तुह्मी तुमच्या पत्राबद्दल जी हकीकत सांगितलीत, आणि तुमच्याबद्दल त्या बाप्पा मैराळाच्या मनांत संशय येऊं लागला आहे ह्मणून ह्मणतां, त्या अर्थीं तुह्मी तेथून निसटून आलांत, हें एक अर्थीं फार चांगलें झालें असें मी ह्मणतों. श्रीमंतांच्या कानावर मीं तुमची सर्व हकीकत घातली आहे; व पुढें काय करायचें व कसें करायचें हेंही त्यांनीं मला सांगितलें आहे. बहुत करून तुमचें काम फत्ते होईल असें मला वाटतें. श्रीमं-

तांच्या स्वारीबरोबर तुमचे शास्त्री वकीलही जाणार आहेत. याकरितां माझें तुम्हाला असें सांगणें आहे कीं, तुमच्यापाशीं जें काय जोखमीचें वगैरे असेल तें देऊन तुम्ही लागलेंच आजच्या आज पंढरपुरास चालते व्हा. तेथें गेल्यानंतर तुमच्या जिवाचे व खात्रीचे असे पांच सात असामी तयार करून ठेवा. मी तुमच्या मागून इकडील वाड्यांतील सर्व बंदोबस्त करून आलोंच समजा. पुढें काय करायचें तें मी तुम्हाला तेथें आल्यानंतर सांगेन. हंः मग कसें काय ? आहेना तुमची तयारी.

गोविंदराव—अहो ज्या करितां इतके दिवस येथें खराब झालों व हलकी नोकरीही केली, तो हेतू सिद्धीस जाण्याची वेळ आली असतां हा गोविंदराव गायकवाड मागें घेईल असें तुम्ही मुळींच समजूं नका. त्याबद्दल माझें डोकें गेलें तरी बेहत्तर आहे.

त्रिंबक—(आपल्याशीं) गंगाधर शास्त्र्याजवळ फार इमानें इतबारें नोकरी केलेला गुणाजी हुजऱ्या त्यांच्या मागें ठेवून चालणार कसें ? यजमानाबरोबर चाकर पाहिजेच चाकरी करायला ! (उघड) शाबासरे बहाद्दर ! मला प्रथम वाटलें होतें कीं, गुजराथेंतील सर्व मंडळी तेथील रहिवाशी गुजराथी मंडळीप्रमाणें येथून तेथून भोंगळसूत्री व नामर्द, पण नाहीं, आतां माझी तुमच्यावरून खात्री झाली कीं, समशेर बहाद्दर दमाजी गायकवाडानें जी बहाद्दरी गुजराथेंत गाजविली, ती तुमच्यासारखे कांहीं जवानमर्द बहाद्दर गडी असल्याशिवाय गाजविली नाहीं हें खास. मग काय असेल तें —

गोविंदराव—हें आहे (त्याच्या जवळ गांठोडी देतो.)

त्रिंबक—(हातांत घेऊन चांचपून) कांहीं फारसें जड नाहीं, बरें असो.

गोविंदराव—याच्यांत अगदीं शेलकें जवाहीर आहे.

त्रिंबक—कांहीं असलें तरी तें मला काय करायचें. श्रीमंतांच्या कृपेनें मला आतां कांहीं कमी नाहीं, व पुढेंही पडणार नाहीं. ही तुमची ठेव जशाच्या तशीच तुम्हाला परत मिळेल. अहो मित्राची ठेव ठेवणाऱ्या सावकाराला त्या ठेवीपासून कांहीं फायदा मिळतो कां ? कांहीं नाहीं. उगीच संभाळायचा मात्र त्रास. हें घ्या तुमच्या कामाकरितां तुम्हाला खर्चायला. झालीना

तुमची सर्व तयारी, निद्रा कसे. वाड्यांतील मंडळी बाहेर पडण्याच्या आधीं त्या चोर दरवाजानें बाहेर पडा.

गोविंदराव—सांगितल्याप्रमाणें करण्यास मी चुकणार नाहीं. पण तुह्मी येण्यास मात्र चुकूं नका.

त्रिंबक—नाहीं, नाहीं, माझ्याविषयीं तुह्माला काळजी नको. जातांना कोणाच्या दृष्टीस पडूं नका बरें. तो बाप्या मोठा लुच्चा आहे. त्याची नजर कावळ्यासारखी असते.

गोविंदराव—पण भगवंतरावाची काय व्यवस्था.

त्रिंबक—अहो तें तेवढ्याकरितां उगीच ढोंग करावें लागलें. तुह्मी आणि तुमचे दोस्त एका ठिकाणीं मजा करीत रहाल. पहा तर खरी त्रिंबकजीची करामत.

गोविंदराव—जातो मी. या, या बरें. (जातो.)

त्रिंबक—खास येतों. बाबानों तुह्माला असें अर्धवट तडफडत टाकून मला स्वस्थ कसें बसवेल. कोणत्या रोग्याची कशी स्थिती आहे हें वैद्याला वारंवार पाहिलेंच पाहिजे. (गांठोडी सोडून पाहून) मरतांना, द्रव्यासारखी वस्तु जवळ ठेवून उपयोगी नाहीं. त्यांत मरणाराचा जीव गुटमळतो; व तें पुनः जन्ममरणाला कारण होतें. प्राणी आला तसाच दिगंबर या जगांतून जायचा, हें तत्व या नांगऱ्याला माहित नाहीं; ह्मणून त्रिंबकजीला त्यांना तें शिकवावें लागतें. गायकवाडींतलीं माणसें भोळी खरींच. गुजराथेंतल्या पाण्याचाच गुण तो. जगांत अशी भोळी, श्रीमंत, व मूर्ख मंडळी आहे, व बाजीरावासारखे राजे आहेत, ह्मणून तर आमच्या सारख्याचें चालतें. विश्वंभर परमेश्वराला विश्वाच्या भरणाची काळजी आहेच. कोणत्या तरी तऱ्हेनें तो सर्वांची भर करतो.

(जातो.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—विश्रामबागेंतील महाल.

पात्रें—ताई आणि पार्वतीबाई येतात.

ताई—(आपल्याशीं) आजपर्यंत शेंकडोंजणी कोणी द्रव्याला, कोणी वस्त्राला, कोणी आपल्या घरच्या मंडळीस मोठमोठीं कामें मिळावीं म्हणून, कोणी आपल्यावर श्रीमंतांची मर्जी आहे, आपण त्यांच्या कृपेतल्या आहोंत, असा मोठेपणा मिरवायला सांपडावा म्हणून, अशा कोणत्यांना कोणत्या तरी रितीनें या वाड्यांत येऊन फसल्या; पण ही पार्वतीबाई त्यांपैकीं एकाही गोष्टीनें फसेल असें मला वाटत नाहीं. हिला गफलतींत सोडून एकदां हिची आणि त्रिंबकजीची भेट एकांतीं करून दिली म्हणजे मी त्यांच्या सध्यांच्या कामगिरींतून मोकळी झालें. पुढें ते जाणें आणि त्यांचें काम जाणें. कांहीं तरी निमित्य काढून हिला येथें सोडून जावें, झालें. (उघड) पार्वतीबाई, तुम्हीं गणेशमहाल पाहिलाच आहे. त्याच महालांत भाद्रपदमासीं श्रीमंतांच्या येथला गणेशचतुर्थीचा मोठा उत्सव होतो. आरसेमहालापेक्षां, मस्तानी महालापेक्षां, हा विश्रामबागेंतील महाल कांहीं कमी नाहीं. श्रीमंतांची विश्राम घेण्याची व नानातऱ्हेची मौज करण्याची ही जागा. कित्येक दिवसपर्यंत स्वारी याच वाड्यांत रहात असते. शनिवारच्या वाड्यांत जशी व्यवस्था आहे, तशीच कदाचित् त्याहून जास्त या महालांत श्रीमंतांनीं करून ठेविली आहे. स्वारी पंढरपुरास यात्रेला गेली आहे, त्यामुळें येथें येण्याला फारसी बंदी नाहीं. कांहो, पार्वतीबाई, श्रीमंतांच्या स्वारीबरोबर तात्यासाहेबांची स्वारी पंढरपुरास गेली आहे, तेव्हां त्यांच्या बरोबर बापूसाहेब, आपले यजमानही गेले असतील? तुम्ही घरीं आतां एकट्याच असाल. तेव्हां चार दिवस वाड्यांतच कां येऊन रहात नाहीं.

पार्वती—छे, तात्यासाहेबा बरोबर पंढरपुरास जाणें झालें नाहीं.

ताई—मग काय ठरलें तुमचें येथें राहण्याबद्दल. यजमान येथें नोकरी करण्याला राजी आहेतकां? विचारलें होतें कां तुम्ही.

पार्वती—येथें राहण्याचा मुळींच मानस नाहीं. एकदां ज्या अर्थीं तात्यासाहेबांनीं आश्रय दिला, त्या अर्थीं त्यांचा आश्रय सोडून आतां दुसरीकडे व दुसऱ्या सरकारची नोकरी मुळींच करायची नाहीं, असें तिकडचें ह्मणणें पडलें आहे.

ताई—तात्यासाहेबच येथील मुख्य दिवाण होणार अशी वदंता आहे. तेव्हां बापूसाहेब अनायासेंच त्यांचें नायब ह्मणून राहतील; आणि ते राहिले कीं आपण राहिलांत. मग मात्र आपली रोजची भेट होत जाईल.

पार्वती—पुढें काय होईल तें काय सांगावें बाई? बाकी आह्मी येथें राहिलों तर मात्र तुह्माला विसरणार नाहीं, हें खास. ताई, तुह्माला मी इतके दिवस विचारीन विचारीन ह्मणून मनांत ह्मणत होतें, पण मला तुह्माला विचारण्याचा धीरच होईना. आतां तुह्मी आणि मी या ठिकाणीं दोघीचजणी आहोंत, तेव्हां विचारतेंच. विचारूं कां? रागावूं नका बरें.

ताई—विचारा, खुशाल विचारा. तुमच्या विचारण्याचा मला राग येईल असें कधींच होणार नाहीं. अहो एकमेकांच्या बोलण्याचा, विचारण्याचा व थट्टा मस्करीचा एकमेकीला जर राग आला, तर मग आपली एकमेकीची मैत्री ती कसली?

पार्वती—ह्मटलें, आपल्या यजमानाला कोठें नोकरी आहे? याच पुण्याच्या दरबारीं आहेना? कोणची बरें नोकरी आहे. असेल ती मोठीच असेल.

ताई—पार्वतीबाई आमचें काय गरीबाचें घेऊन बसलांत!

पार्वती—ताई, तुह्मी गरीब कां? मग श्रीमंत कोण? खरेंच आपल्या यजमानाला कोठच्या मामलत्याचें काम आहे. कर्नाटकांत, कीं कोंकणांत. येथें नाहींत त्या अर्थीं ते परगांवीं असावेत असें वाटतें.

ताई—होय; लांब तिकडे कर्नाटकांतच आहे.

पार्वती—ताई, तुह्माला कांहीं मुलबाळ.

ताई—झालें होतें एक! पण तें राहिलें नाहीं. त्यानंतर झालेंच नाहीं. खंडीभर होऊन मरायचीं, त्यापेक्षां देवानें आपलें त्या बाबतींत आतां गाऱ्हाणें ऐकिलें आहे, त्यामुळें मी मोठी सुखी आहे.

पार्वती—तें कांहीं कोणाच्या स्वाधीनचें थोडेंच आहे. अहो ताई, ती भिमा मुलाला घेऊन गेली आहे, ती अद्याप आली नाहीं कशी ? आणि तो तरी पहा तिच्याजवळ कसा गुपचुप आतां राहिला आहे, नाहीं तर कोणाजवळ क्षणभरसुद्धां रहात नाहीं. रडून रडून अगदीं आकांत करतो. तिनें कोणीकडे नेला आहे तों पाहिला पाहिजे. संध्याकाळ होत आली, तेव्हां मला आतां वरींही गेलें पाहिजे.

ताई—मुलाला तिनें नेला काय ?

पार्वती—तिला पाहिल्याबरोबर त्यानें जशी तिच्या अंगावर झेंप टाकिली.

ताई—मी आतां त्याचा शोध करून येतें. तुह्मी येथें जरा त्या पुष्करणीची आणि बागेची शोभा पहात रहा. ही मी आलेंच पहा.

पार्वती—तुह्मीच कशाला जातां.

ताई—नाहीं, खालीं जाऊन शोध करतें. ती येथें आसपास नसेल तर मनुष्य पाठवितें. मग जास्त संध्याकाळ नाहीं कां होत ? (ती जाते.)

पार्वती—(आपल्याशीं) ताईचें महत्व जें एवढें मोठें वाड्यांत आहे, त्याचें काय बरें कारण असावें ! त्यांचा थाट पहावा तर श्रीमंतांच्या राणीसाहेब ज्या ताईसाहेब, व दुसऱ्या धाकट्या राणीसाहेबांच्यापेक्षां सुद्धां जास्त असतो. वाड्यांतील प्रत्येक मनुष्य ताई, ताई, ह्मणून यांच्या पुढें पुढें करीत असतें. यांची मर्जी संभाळण्याकरितां सर्व तत्पर असतात; ज्याचें त्याचें काम पहावें तों आपलें ताई जवळ ! मोठमोठ्या समारंभाचीं कामें श्रीमंत यांनाच सांगतात. संक्रांतीच्या दिवशीं, बसंत पंचमीच्या दिवशीं, रंग पंचमीच्या दिवशीं, हळदीकुंकवाच्या दिवशीं, व परवा मेजवानीच्या दिवशीं पहावें तों प्रत्येक कामांत आपल्या ताई पुढें ! मुख्य मंत्री त्रिंबकजीसुद्धां यांच्याशींच सल्ला मसलती करतात; कोणाला कांहीं आपलें काम करून घ्यायचें असेल तर तो ताईजवळ येतो, आणि पहावें तों ताई आपल्या सर्वांचीं कामें करून देतात ! इतकें त्यांचें वाड्यांत प्रस्थ आहे, असें त्यांच्या यजमानांस मोठेसें दिवाणगिरीचेंही काम नाहीं. एका मामलत्याचें आहे, असें ताई आतांच ह्मणाल्या. तेव्हां यांचें अथवा यजमानांचें श्रीमंतांशीं अगदीं जवळचें नातें असलें पाहिजे; ह्म-

णून अशीं मोठीं समारंभाचीं, व विश्वासाचीं कामें श्रीमंत ताईला सांगत असतील. श्रीमंतांजवळ असें एखादें मनुष्य लागतेंच. बडोद्यास जसें राणीस हेबांजवळ त्या यःकश्चित कुळंबीण आवडाबाईचें प्रस्थ आहे, तसें येथें ताईचें आहे झालें. दुसरें काय? पण बाई (इकडे तिकडे पाहून) अद्याप भिमा कशी आली नाहीं, व ताईही आल्या नाहींत हें काय? संध्याकाळ होत आली. घरीं जायला उशीर होतो. काय करावें बाई. ती दवळी भिमाबाई त्याला कोणीकडे घेऊन गेली कोण जाणें.

(इतक्यांत त्रिंबकजी येतो.)

त्रिंबक—(आपल्याशीं) अशी ही निवांतपणें पहाण्यास कधींच मिळाली नव्हती. संध्याकाळ होऊन किंचित् अंधार पडत चालल्यामुळें जरी थोडेसें कमी दिसतें, तरी हिच्या सुंदर रूपाची परीक्षा झाल्यावांचून राहत नाहीं. श्रीमंतांची नजर जी हिच्यावर गेली व त्यांनीं जो हिजवर झडप घालण्याचा यत्न केला, तो कांहीं उगीच नव्हे. कोणत्याही रितीनें कां होईना हें रत्न एकदां तरी प्राप्त करून घेण्यासारखें आहे, यांत बिलकूल संशय नाहीं. पुण्यांतील हजार पांचशें बायकांमध्यें ही एक बायको आहे. पार्वतीचा आणि त्रिंबकाचा जोडा शोभतो. ही कांहीं तरी आपल्याशीं विचार करीत आहे, तेव्हां एकदम पुढें जाऊं नये. वेळ पाहून पुढें व्हावें. तोंपर्यंत निवांतपणें व डोळे भरून हिला पाहून घ्यावें. अशी वेळ पुनः कधीं येणार आहे.

पार्वती—(आपल्याशीं) किती वेळ तरी मेलें मनुष्यानें तिष्ठत बसावें.

त्रिंबक—(पुढें होऊन) खरोखर, इतकावेळ मीं आपणाला तिष्टत ठेविलें ही माझी मोठी चूक झाली. त्याबद्दल आपण मला माफी करा.

पार्वती—(त्रिंबकजीस पाहून चपापते) हें काय! हे कोण? हे, ज्यांच्या अंगावर माझ्या हांतून चुकून पिचकारी उडाली होती ते त्रिंबकजी! मी येथें एकटी आहे हें यांना काय बरें माहीत? हे या ठिकाणीं काय ह्मणून आले असावे? यांचा काय बरें उद्देश असावा. अद्याप ताई कां बरें येत नाहींत? ताई, अहो ताई, भिमाबाई, अहो भिमाबाई. (ती जाऊं लागते.)

त्रिंबक—(तिला आडविण्याच्या हेतूनें पुढें होऊन) आपण कोणीकडे चाललांत. आपल्याला कोण पाहिजे ?

पार्वती—मला ताई पाहिजेत. मी त्यांना हांक मारते आहे.

त्रिंबक—त्या अंमळशानें येतील. थांबा बसा जरा. बसलांत ह्मणून कांहीं बिघडलें नाहीं.

पार्वती—(थांबून) कशाला थांबायचें. माझें ताईशीं काम आहे. आप—

त्रिंबक—जें ताईशीं असेल तें मला जर आपण सांगितलेंत तर मी सुद्धां करीन. आपलें काम करण्यांत या त्रिंबकजीला मोठा आनंद आहे. मला काम सांगण्यांत आपण परकेपणा मुळींच मानूं नका; व तो आपण मानीत नाहीं, हें मला रंगपंचमीच्या दिवसापासून व ताईकडूनही पूर्वीपासूनच कळून चुकलें आहे. त्यायोगानें आपणा दोघां मधला परकेपणा आतां मुळींच राहिला नाहीं. आपण तर मला परक्या नाहींतच, पण मी सुद्धां आपणास परका नाहीं.

पार्वती—परक्या मनुष्याशीं, त्यांतून आपल्यासारख्या मोठ्या मनुष्याशीं बोलण्याचा मला मुळींच प्रसंग नाहीं. पण—

त्रिंबक—प्रसंग नसला तर आणावा लागतो. त्याशिवाय तो आपण होहून तरी येणार कसा ? बोला. मला परका असें आपण मुळींच लेखूं नका.

पार्वती—मला आपल्या या अशा बोलण्याचा अर्थ मुळींच कळत नाहीं. पण मी आपल्याला इतकेंच सांगतें कीं, रंगपंचमीच्या दिवशीं माझ्या हातून आपल्या अंगावर चुकून पिचकारी उडाली, त्यामुळें आपली समजूत चुकून भलतीच झाली आहे असें मला वाटतें. शिवाय ताईनें आपल्याला माझ्या संबंधानें काय सांगितलें आहे, व आपण काय समजला आहांत, तें त्यांना आणि तुह्माला माहीत ! आपण मोठे आहांत व त्याही मोठ्या आहेत.

त्रिंबक—आपण जर मनांत आणलेंत, तर आपण सुद्धां ताईपेक्षां मोठ्या होऊं शकाल. ताई आपल्या आज्ञेंत वागेल, सर्वजण आपल्यापुढें हात जोडतील व या वाड्यांतील सर्व जिन्नसांची आपण मालकीण होऊन बसाल; आणि तें करणें या त्रिंबकजीच्या हातीं आहे. आपल्या तोंडांतून फक्त हुकार मिळण्याचाच मात्र काय तो अवकाश.

पार्वती—ह्मणजे कसें तें मला कळत नाहीं. माझ्या अंगीं असें काय आहे?

त्रिंबक—अप्रतिम लावण्य, मधुर भाषण व लोकांचें मन आकर्षण करून घेण्याइतका मोहकपणा; यापेक्षां आणखी काय पाहिजे. स्त्रियांच्या अंगीं जितके गुण असावे लागतात, तितके सर्व आपल्या जवळ आहेत.

पार्वती—तें मला माहीत नाहीं, पण माझ्या अंगीं जो गुण पाहिजे तो मात्र नाहीं.

त्रिंबक—तो कोणचा बरें.

पार्वती—तो.—

त्रिंबक—आपण आतां उगीच आडेवेडे कां बरें घेतां. आपल्याला माझ्या मनांतील सर्व हेतू कळून चुकला आहे. आतां जास्त काय सांगूं. हा त्रिंबकजी, बाजीराव साहेब पेशव्यांचा मुख्य दिवाण, ज्याच्या अंगीं ईश्वर कृपेनें आज तो ह्मणेल तें करण्याचें सामर्थ्य आहे; तो आपला दासानुदास आहे. आपण मला वश झालांत ह्मणजे, लक्षावधी रुपयांची दौलत आपल्या पायांपाशीं खेळेल. शेकडों दासदासी आपल्या पुढें हात जोडून हुकुमाची वाट पहात रहातील. आपल्याला वाटेल त्याला रंकाचा राव व रावाचा रंक बनवितां येईल, आपल्या यजमानास अगर दुसऱ्या कोणास पाहिजे असेल ती मोठी नोकरी देतों, मामला देतों, सुभायत देतों व आपल्याला वाटेल त्या वाड्याची मालकीण बनवितों. मग काय—

पार्वती—तोच, आपण आतां ज्या गोष्टी सांगितल्यात त्या गोष्टीला, त्या तुमच्या ऐश्वर्याला, द्रव्याला व अधिकाराला भुलून जाण्याचा माझ्या अंगीं गुण नाहीं. यापैकीं एकाही गोष्टीची मला जरूर नाहीं. माझ्या घरीं मी आहे या स्थितींत फार सुखी आहे. देवा, या ठिकाणीं मी येऊन सर्वस्वी फसलें. येथून माझी सुटका धडपणीं आतां कशी होईल? जा, जाऊं द्या मला. परक्या स्त्रियेला असें भलत्या वेळीं व भलत्या ठिकाणीं आडविणें हें सभ्य गृहस्थास शोभत नाहीं.

त्रिंबक—आपल्याला पाहिल्यापासून मी अगदीं वेडा झालों आहे. आपल्यावर कांहीं दिवसापूर्वी कसा प्रसंग येणार होता, हें आपल्याला कळलें ह्म-

णजे माझें आपल्या ठिकाणीं कसें प्रेम आहे, व मीं आपल्या करितां काय केलें आहे, हें आपणास कळून येईल. श्रीमंत बाजीराव साहेब पेशवे यांची आपणावर, आपल्याला बसंतपंचमीच्या दिवशीं पाहिल्यापासून नजर होती. हळदी कुंकवाच्या दिवशीं ताईच्या संमतीनें त्यांनीं आपणाला वाण्यांत घरण्याचा प्रयत्न केला होता, ती गोष्ट जेव्हां मला समजली, तेव्हां मीं युक्तीनें तो प्रसंग तुमच्यावर येऊं दिला नाहीं. नाहीं तर आपण त्या दिवशीं खास त्यांच्या विषयवासनेला बळी पडला असतां !

पार्वती—काय ह्मणतां, श्रीमंतांनीं असा बेत केला होता. वाड्यामध्यें जे पातळें, पैठण्या, शालू वगैरे वाटण्याचे समारंभ होतात, ते कुलीन स्त्रियां नजरेखालून जाव्या, व आपल्या वासनेला कोण बळी पडेल, वगैरे गोष्टी पाहून ठेवून मग त्या विचारीवर लांडग्याप्रमाणें झडप घालावी ह्मणून होतात अः ! आणि त्याला सहाय्य ताई ?! आग कां लागेना त्या वाईट बुद्धीला. अशा मजसारख्या गरीब बापड्या भोळ्या किती जणी तरी बळी पडल्या असतील. शिव, शिव.

त्रिंबक—तो प्रसंग आपल्यावरचा मीं टळला आहे.

पार्वती—अहो तो प्रसंग टळला कसला ! गाय एका वाघाच्या जबड्यांतून सुटली व दुसऱ्याच्या सांपडली.. प्रत्यक्ष श्रीमंत राजे, त्यांचे मुख्य दिवाण, व ताईसारख्या महाधूर्त शंखिणींचें याला सहाय्य अः ! ताईचें रूप व कृति आतां माझ्या ध्यानांत आली अग चांडाळणी. या राज्याचे पेशवे सरकार मालक आह्मी सर्वजणी त्यांना लेकी, बहिणी, सुनाप्रमाणें असून त्यांची आमच्यावर अशी वाईट नजर ! काय हा अनाचार ! अशानें राज्याचें व श्रीमंतांचें कधीं बरें होणार नाहीं. (आपल्याशीं) आपल्या पतीची अवज्ञा करणाऱ्या, व त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें न वागणाऱ्या स्त्रियांवर कसा प्रसंग येतो, हें आतां मला चांगल्या प्रकारानें कळून आलें. वाड्यांत फारशी जात जाऊं नकोस, ह्मणून मला सांगितलें होतें, त्याचें कारण मला वेडीला आतां कळलें. देवा चुकलें मी ! पुनः कधीं त्यांच्या सांगण्याच्या बाहेर मी जाणार नाहीं, व या असल्या पापी वाड्यांत त्या दुष्टांच्या नजरेस पडण्याकरितां

पाऊलही ठेवणार नाहीं. तात्यासाहेब, माईसाहेबांस जें वाड्यांत पाठवीत नाहींत तें याचकरितां बरें. (उघड) चला, रस्ता सोडता कीं नाहीं ?

त्रिंबक—सोडीन. जरा थांबा. माझें ह्मणणें नाहीं का आपल्या ध्यानांत येत ! (जवळ जाऊन हात धरूं लागतो.)

पार्वती—हंः, लांब उभे रहा. खबरदार जवळ आलात, व अंगाला हात लावलात तर.

त्रिंबक—या भितीचा मला काय बरें उपयोग ? अशा रागावूं नका ! (हात धरतो.)

पार्वती—(हात झिडकारून मोठ्यानें ओरडते) ताई, अहो ताई.

त्रिंबक—ती येईल अंमळशानें.

पार्वती—देवा, मी त्या चांडाळणीला काय ह्मणून हांक मारते; आणि तिचा मला काय उपयोग होणार ? ती अवदसा यांची मिलाफी. तिचेंच हें सर्व कृत्य. हें पहा आपण बऱ्या गोष्टीनें मला येथून जाऊं द्या, नाहीं तर मी आपलें डोकें या ठिकाणीं आपटून अगर या खिडकींतून खालीं उडी टाकून प्राण देईन. मग मात्र आपल्याला जड जाईल. (खिडकी जवळ जाते व उडी टाकूं लागते.)

त्रिंबक—हें काय करतेस ? (तिला धरून मागें ओढूं लागतो.)

पार्वती—ताई, भिमा, अहो कोणी याहो या, धांवा, धांवा.

(इतक्यांत ताई, भिमा व नारोबा येतात.)

भिमा—पार्वतीबाई, काय झालें. ओरडलांत कां ?

ताई—आपल्याला भिती कां वाटली ?

नारोबा—काय झालें सांगा ! सांगा ?

त्रिंबक—(आपल्याशीं) हीं सर्व गाढवें या वेळीं येथें कशाला शेण खायला आलीं ! मूर्खांना अगदीं अक्कल नाहीं. बरें ही शिकार आतां यावेळीं हातांतून निसटली आहे, निसटूंद्या. जाते कोठें ? केव्हां तरी पुनः तावडींत सांपडेल, तेव्हां कशी सुटते तें पाहीन. या वेळेला येथून निघून जावें हेंच

बरें ! दुष्ट या त्रिंबकजी सापाला दुखविलें आहेस, हा आपला डाव बारा वर्षांनींसुद्धां उगवून घेईल कधीं राहणार नाहीं. (जातो.)

ताई—बोला, बोला. या, अशा खिडकीशी वाऱ्यांत बसा. ह्मणजे तुह्माला बरें वाटेल. (तिला जवळ घेते.)

पार्वती—अवदसे चल पलिकडे हो. तूं प्रत्यक्ष राक्षसीण असून, त्या त्रिंबकजी व बाजीराव राक्षसाची मिलाफी आहेस. तुझें तें मायावी प्रेम, कृती व तुझें खरें स्वरूप आज माझ्या चांगलें नजरेस आलें. चांडाळणी, तूंच मजवर आज हा भयंकर प्रसंग आणविला. दुष्टे, आजपर्यंत किती गरीब बापडींचें असें मोहजाल पसरून या राक्षसाकडून पातिव्रत्य भंग करविलें असशील ! आपल्या पापाचीं फळें लौकर भोगशील. मला आतां तुझें तोंड पहाणें नको. भिमा कोठें आहे, माझा मुलगा ! चल लौकर आण. मला आतां येथें एक क्षणभर उभें राहावयाचें नाहीं.

भिमा—तो खालीं ठकीपाशीं.

पार्वती—तूं माझ्या बरोबर पोंहचवायला येत असलीस तर चल. पण नको. मीच एकटी जातें. तुह्मी सर्वजण त्रिंबकजीचे व बाजीरावाचे नोकर. परमेश्वर तुह्मां सर्वांना पाहून घेईल. (जाते)

ताई—नारोबा, भिमे, जा त्यांच्या मागून जा आणि त्यांना घरीं सुरक्षीत पोंहचव.

नारोबा—(आपल्याशीं) तुझ्या पापाचा घडा आज पूर्ण भरला, व त्याचें फळ तुला आजच मिळेल. (उघड) ठीक. (दोघे जातात.)

ताई—झालें हें एक बरेंच झालें. त्रिंबकजीला असेंच पाहिजे. (जाते.)

प्रवेश चवथा.

स्थळ—पुण्यांतील गंगाधरशास्त्री यांचा वाडा.

पात्रें—बापू मैराळ हातांत पत्र घेऊन येतो.

बापू—(आपल्याशीं) आमच्या येथील अत्यंत गुह्य गोष्टी बाहेर कशा फुटतात, याचें आजपर्यंत मला मोठें गूढ होतें, तें आतां नाहींसें झालें. मला

पूर्वीं पासूनच आमच्या येथील माजी दिवाण सीतारामपंताच्या खटपटीविषयीं संशय आला होता, तो अखेरीस खरा ठरला. त्याचे गुप्त हेर गोविंदराव गायकवाड व भगवंतराव, हे गुणाजी आणि होनाजी ह्मणून हुजरे होऊन आमच्या व मोद्याच्या घरीं राहिल्यावर, आमच्या घरचें सर्व गुह्य बाहेर पडल्याशिवाय कसें राहील? सीतारामपंत व त्याचे गुप्त हेर यांच्यामध्यें चाललेल्या पत्रव्यवहारांपैकीं हें पत्र आज मला जिन्याच्या खालीं पायरी जवळ सांपडलें, त्यामुळें या लुच्चाचें सर्व कारस्थान बाहेर आलें. अरे सीताराम, तूं जरी बंदीखान्यांत पडला आहेस तरी तुझीं कारस्थानें आणि खटपटी अद्याप बंद होत नाहीं अं: ! आतां तर तुला तेथून सुटण्याची मुळींच आशा नको! बाजीराव, आणि त्यांची हस्तक मंडळी त्रिंबकजी वगैरे बदमाष लोकांकडून सीतारामपंताला व त्याच्या गुप्त हेराला चांगलें पाठबळ आहे, त्यांना तिकडून आणि इकडून खबरा मिळतात; ह्मणूनच कामाचा उलगडा होत नाहीं. तात्यासाहेब जितके भोळे, हुशार, राज्यकारभारांत दक्ष व मेहनती आहेत, तितके जर ते चाणाक्ष व स्तुतीला न पाघळणारे असते तर किती तरी चांगली गोष्ट झाली असती. मनुष्याचा एकदां कोणत्या तरी तऱ्हेचा स्वभाव बनून गेला ह्मणजे तो मग कांहीं केल्या बदलत नाहीं. या पत्रांत (पत्र पाहून) तर त्यांनीं स्पष्ट लिहिलें आहे कीं, " तात्यासाहेबास कसेंही करून परत लौकर बडोद्यास न येऊं देण्याची तजवीज ठेवा. " यावरून बाजीरावाचे व त्रिंबकजीचें, त्यांना दिवाणगिरी देण्याच्या संबंधांत, लग्नाच्या संबंधांत, व आतां पंढरपुरास यात्रेच्या निमित्यानें त्यांस नेण्याच्या संबंधांत खास कांहीं तरी कारस्थान असलें पाहिजे. तरी मी त्यांना सांगत होतो कीं, आपण एकटे जाऊं नका, आपली सर्व मंडळी बरोबर न्या; निदान मला तरी न्या. पण त्यांनीं माझें ऐकिलें नाहीं. छे, छे, आतां वाट पाहून उपयोग नाहीं. पंढरपुरास जाऊन त्यांच्या कानावर सर्व मजकूर घालून जितकें लवकर बडोद्यास जातां येईल तितकी तजवीज केली पाहिजे. मोदी मेला, यांत देखील कांहीं गूढ आहे. आज दोन चार दिवसापासून गुणाजी ह्मणजे गोविंदरावही कोठें दिसत नाहीं; तेव्हां त्यावरून, व पारशाच्या मरणावरून कांहीं

जास्त भयंकर प्रकार न होवो ह्मणजे झालें. परत येईपर्यंत सर्व मंडळीस सावध राहण्यास सांगून, एक घटकेचाही विलंब न करितां मला पंढरपुरास जाऊन आधीं त्यांची भेट घेतली पाहिजे. (जातो.)

प्रवेश पांचवा.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील खोली.

पात्रें—भिमा आणि नारोबा येतात.

भिमा—नारोबा, तुमचा अगदीं निश्चय झाला अं:! थोडासा विचार करा. तुमच्या जिवावर उगीच संकट येईल.

नारोबा—भिमाबाई, तें मी जर जाणत आहे, तर मला त्या संकटाचें भय मुळींच वाटत नाहीं. अहो, आतां या जगांत माझें राहिलें आहे काय? व मी जगण्याची तरी इच्छा कां करावी. मला भाऊ, बहिण, आई, बाप, इष्ट, मित्र, घर, दार, नांव लौकिक कांहींएक नाहीं. मीं जिवंत राहावयाचें कशासाठीं व कोणत्या आशेवर! आपली स्त्री व्यभिचारी निघालेली, असें ऐकण्याचा प्रसंग बऱ्याच लोकांना येत असेल, पण आपली स्त्री आपल्या जाराबरोबर राजरोसपणें व्यभिचारकर्म करते, तो पहाण्याचा व त्या दोघांची चाकरी करण्याचा अत्यंत दुर्धर प्रसंग मजसारख्या लक्षावधि प्राण्यांपैकीं एखाद्या दुर्दैवी प्राण्याचाच कपाळीं येत असेल! त्या गोष्टी त्यांना मी राजरोसपणें आणि निर्लज्जपणें करूं देऊं? मी पूर्वी गरीब स्थितींत होतों, हिचे गुण थोडेसें माझ्या दृष्टीस पडले होते, पण हिला चांगली शिक्षा लावावी, व आपणही परदेशांत जाऊन कांहीं तरी नांवलौकिक व द्रव्य कमवावें आणि मग येऊन स्वस्थपणें संसार करावा, अशा हेतूनें मी घराच्या बाहेर पडलों. जातांना मीं तिला तिच्या अवगुणाबद्दल थोडीशी ओळख करून दिली होती; आणि ती तितक्यांत समजेल अशी माझी समजूत होती, पण ती माझी त्यावेळची समजूत खोटी ठरली, व माझी सर्व आशा नाहींशी झाली. बाहेर निघून गेल्यानें एका गोष्टींत मला देवानें हात दिला व थोडासा लौकिक कमावून मीं जवळ चार पैसेही केले. पण या अवदसेनें माझ्या पुढील सर्व सुखाची

माती केली. पुण्यास जेव्हां यशवंतराव होळकरानें गर्दी केली, त्यावेळीं मी येथून निघून उत्तरहिंदुस्थानांत गेलों. तेथें शिंद्याच्या पदरीं शिपाईगिरींत नांव कमावून सध्यां मी तेथें एका लहानशा पागेचा अधिकारी आहे. फार दिवस झाले, इकडचा शोध करावा व कशी व्यवस्था आहे हें पहावें ह्मणून मी गुप्त वेषानें येथें आलों. थोड्याशा श्रमानें शोध लागून माझा वाड्यांत शिरकाव झाला, आणि त्यामुळें हें मला कळलें, व हळदीकुंकुवाचे दिवशीं त्या जारिणीनें माझ्या नांवाचा उच्चार केल्यामुळें तर माझी पुरी खात्री झाली.

भिमा—(डोळ्याला पाणी आणून) खरेंच हो, वाईट छंदाला लागून तिनें आपल्या कुळाचें नांव बुडविलें.

नारोबा—पण तिला कुठें तसें वाटतें आहे. ती तर त्यांत उलटें भूषण मानते. मी परदेशीं निघून गेल्यामुळें तिच्या वांटेतला एक कांटाच निघून गेल्यासारखें झालें. तिला स्वेच्छाचारी होण्याला फार चांगली सवड सांपडली. तिच्या दुर्गुणाला ऊत आला. तिचा जार त्रिंबकजी अथवा बाजीराव यांपैकीं सध्यां येथें कोणीच नाहीं; मला जशी संधी मिळावी ह्मणून मी कित्येक दिवस टपून बसलों आहे, तशी संधी आज आहे; आणि मी ती आतां फुकट घालविणार नाहीं. आज मी तिला तिच्या कर्माची ओळख करून देणार आणि त्याचें फळही देणार; याकरितां आज रात्रीं काय झालें हें पहाण्याकरितां अगर ऐकण्याकरितां तुह्मी या वाड्यांत आतां मुळींच राहूं नका. नाहीं तर फुकट दुर्दैवाच्या फेऱ्यांत पुनः सांपडाल. निघा, आजच्या आज येथून चालत्या व्हा. ज्या कामाकरितां तुह्मी ह्या अधमांची नीच नौकरी पतकरली होतीत, तें तुमच्या बापाच्या व बंधूच्या मुक्ततेचें काम झालें. त्या पार्वतीबाईच्या जवळ जाऊन रहा अगर आपल्या घरीं जा, अथवा दुसऱ्या चांगल्या ठिकाणीं नोकरीस रहा, पण या ठिकाणीं राहूं नका. माझी हकीकत मी तुह्माला बहिण ह्मटली ह्मणून सांगितली. त्यापैकीं एक अक्षरही बाहेर बोलूं नका. तुमचे माझ्यावर अत्यंत उपकार आहेत, त्याबद्दल परमेश्वराजवळ मी प्रार्थना करीन.

भिमा—माझें तरी येथें राहण्याचें आतां काय उरलें आहे. पण आप-

ल्याकरितां मला फार वाईट वाटतें. त्या गारगोटीकरितां हा हिरा मात्र फुकट जात आहे.

नारोबा---तसा योगायोग. त्याला तुह्मी अथवा मी तरी काय करणार ? आतां मला तुमच्याशीं फार वेळ बोलत बसण्याला वेळ नाहीं. माझ्या कामाची मला तयारी केली पाहिजे. (तो जातो.)

भिमा---बायकोला व आपणाला सुख लागावें, आपण आनंदानें रहावें, संसार करावा, ह्मणून येथपर्यंत विचारा देश धुंडाळीत आला, तों त्याच्यापुढें येथें हें वाढून ठेवलें होतें. जरी तो माझ्या जातीचा नाहीं. तरी थोडक्या दिवसांत त्यानें मला किती माया लावली. मला तो माझ्या भावाप्रमाणेंच वाटतो. आतां त्यानें सांगितल्याप्रमाणें पार्वतीबाईकडे जावें, तिला सगळें सांगावें आणि मग आपल्या गांवीं जावें. अरेरे गरीब बापडा. (ती जाते.)

प्रवेश सहावा.

स्थळ---शनवारच्या वाड्यांतील ताईची खोली.

पात्रें---ताई आपल्या मच्छरदानीच्या पलंगावर निजली आहे, रोषनाई केलेली आहे, समोरच्या बाजूला आरसा ठेवलेला आहे; ताईला गाढ झोंप लागली आहे; अशा मध्यरात्रीच्या सुमारास नारोबा हलके हलके येतो.

नारोबा---(आपल्याशीं) अगदीं चहूंकडे सामसूम झाली आहे. मी आंत येतांना सर्व दारांना कड्या घालून पक्का बंदोबस्त केला आहे. या ठिकाणीं मीं कांहीं जरी केलें आणि हिनें किती जरी आरडाओरड केली, तरी कोणाला बाहेर एक शब्दही ऐकूं जायचा नाहीं, व कोणीही चौकशी करण्याला येणार नाहीं. मला अशीच संधी साधावयाची होती, ती ईश्वर कृपेनें चांगली मिळाली. (इकडे तिकडे पाहून) ह्या जारिणीला चांगली गाढ झोंप लागली आहे. मोलमजूरीनें, काबाडकष्टानें व प्रामाणिकपणानें साऱ्या दिवसभर

श्रम करणाऱ्या गरीबगुरिबांकरितां संसाराचा निम्मा भार आपल्या शिरावर आहे असें समजून दिवसभर घरगुती कामामुळें ज्यांना यत्किंचित् सुद्धां दिवसा विश्रांति मिळत नाहीं, अशा कुलीन, सत्वशील व पतिव्रता स्त्रियांना पतिसमागमाचें सौख्य मिळावें व आपापल्या कामानंतर विश्रांती मिळावी याकरितां परमेश्वरानें ही रात्र निर्माण केली आहे. आणि त्यांनींच रात्रीं स्वस्थ विश्रांति घ्यावी, असें असून जिनें आपलें बहुतेक आयुष्य व्यभिचारकर्मांत घालविलें; त्या या जारिणीकरितां व सत्वशील, कुलीन आणि पतिव्रता अशा पार्वतीबाईसारख्या स्त्रियांच्या सौंदर्याचें, व पातिव्रत्याचें भांडार लुटणाऱ्या या बाजीराव व त्रिंबकजीसारख्या जार आणि अधमाधमांना स्वस्थ विश्रांति घेण्याकरितां ही रात्र निर्माण केली नाहीं. कारण जगत्चक्षु नारायणानें आणि सगळ्या जगानें डोळे झांकलें ह्मणजे, या अशाच वेळेला यांची हीं गुप्त आणि अघोर कर्मे चालावयाचीं ! चोर, जार वगैरे मंडळी यावेळीं जागीच असली पाहिजे. मग हिला गाढ झोंप काय ह्मणून लागावी? व मी तरी तिला ती काय ह्मणून लागू द्यावी ? (तिच्या जवळ जाऊन तिला धक्का मारतो. ती कांहींशी जागी होते.)

ताई—[कांहींशीं जागी होऊन व इकडे तिकडे पाहून] कोण आहे तें. कोणी मला उठविलें.

नारोबा—ताईसाहेब, मी कांहीं कोणी परका नाहीं. आपला नेहमींचा तैनातीतला चाकर हा नारोबा आहे.

ताई—इतक्या रात्रीं रे येथें कशाला आलास ? जा आपल्या ठिकाणीं. यावेळीं माझें कांहीं काम नाहीं.

नारोबा—आपलें नाहीं, पण माझें आहे.

ताई—काय तुझें काम आहे, असलें तरी तें उद्या सकाळीं पहातां येईल.

नारोबा—नाहीं, माझें आपल्याशीं आतांच काम आहे. मला आपल्याला कांहीं गोष्टी विचारायच्या आहेत, कांहीं सांगायच्या आहेत व कांहींची आपल्याला ओळख करून द्यायची आहे; हें सर्व आतांच झालें पाहिजे. उद्यां नाहीं. आज यावेळपर्यंत आपण मजवर अंमल गाजविलांत, मी आपलें ह्मण-

णें ऐकिलें, तसें यावेळपासून पुढें मी आपल्यावर अंमल गाजविणार व आपल्याला माझें ह्मणणें ऐकिलें पाहिजे.

ताई—तें कां ?

नारोबा —कां बी कांहीं नाहीं. मी सांगतों ह्मणून. आणि त्याचें कारण आपल्याला थोडक्याच वेळांत कळेल.

ताई—नारोबा, तुह्मी असें बोलण्याचें साहस आजपर्यंत कधींच केलें नव्हतें. आजच्या तुमच्यावर्तणुकीचें मला मोठें आश्चर्य वाटतें. (बिछान्यावर पडते)

नारोबा —जारिणी स्त्रीनें आपल्या पतीसमोर, आपल्या जाराबरोबर थट्टामस्करी, व धिंगामस्ती करावी, जारकर्मानें मिळविलेल्या संपत्तीचा यथेच्छ उपभोग घ्यावा, सर्व स्वर्गस्थ कुळें नरकांत बुडवून व जीं असतील त्यांच्या तोंडाला काळीमा लावून, आपल्या पातिव्रत्याचें भांडार आपल्या जाराकडून लुटवून, आणि वेश्यापेक्षांही नीच व निर्लज्ज होऊन, आपल्या शरीराचा विक्रय करून मिळविलेल्या अलंकारांनीं नटून आपलें रूप कसें दिसतें, ह्मणून आरशांत पाहावें याचें आश्चर्य वाटतें ! मला वाटतें, आपल्या कृतीपेक्षां माझी आजची कृती कांहीं आश्चर्यकारक खास नाहीं. आपल्याला कोणची अधीक आश्चर्यकारक वाटते? ही कीं ती? बोला, बोला. अशा स्तब्ध कां ? मी ह्मणतों हें खरें कीं खोटें. (तिला हातानें धरून ओढतो.)

ताई—(जरा रागानें) नारोबा, हें त्याहूनही आश्चर्य आहे !

नारोबा—नाहीं हो ताईसाहेब. आणखी निर्लज्जपणानें वर्षेंच्या वर्षें जारकर्म करून मग राजरोसपणानें चार चौघा कुलीन स्त्रियांत हळदी कुंकवाच्या दिवशीं आपल्या पतीचें नांव घ्यायचें, हें त्यांहूनही आश्चर्य ? सांगा तर मग जास्त आश्चर्याची गोष्ट कोणती, ही कीं ती ?

ताई—नारोबा तुह्मी हें काय बोलता हें मला समजत नाहीं.

नारोबा—जारिणी स्त्रियांचे गुप्त कर्म ब्रह्मदेवास देखील कळत नाहीं, मग मनुष्यास कोठून कळणार ? आपली कृति कांहीं त्याविरुद्ध नाहीं. आपलें ढोंग, सोंग, कर्म व रूप खरें आजपर्यंत कोणाला कळलें आहे.

ताई—तुह्मी या गोष्टी कोणाजवळ बोलतां याचा कांहीं तुह्माला विचार

आहे ? इतक्यानें उमजून आपल्या ठिकाणीं चालते व्हा. नाहीं तर उद्यां सकाळीं जेरबंदानें पाठ फुटली जाईल, अथवा एखाद्या किल्ल्यांतील अंधारकोठडींत पडून, भुकेनें तरफडून, आपल्याच अंगाच्या मांसाचे लचके तोडून तोडून, टांचा घासून मरावें लागेल समजलांत. निघा येथून.

नारोबा—आपल्या प्रियकर जाराशीं स्वेच्छाचारानें दुष्टकर्म करितां यावें, मध्यें कोणाची, त्यांतून आपल्या नवऱ्याची आडकांठी असूं नये, ती जर दुर्दैवानें आली तर जारिणी स्त्री ती नाहींशी करण्याकरितां त्याला जेरबंदानें झोडपील, अंधार कोठडींत कोंडून ठेवील, भुकेनें त्याला तरफडण्यास लावील, त्याच्या अंगाच्या मांसाचे लचके त्याला तोडवायला लावील, अथवा आपण सुद्धां सुरीनें लचके तोडील; त्याचा कडेलोट करील, त्याच्या गळ्याला फांस लावील, तो निजला असेल त्या ठिकाणीं आग लावून त्याला जाळून टाकील, अथवा मोठें मोहजाल पसरून वरवर प्रेम दाखवून, त्याला एखादे दिवशीं विष घालील, अगर त्याचा गळा तरवारीनें कापील; इतकेंच नव्हे तर मनुष्याला मारण्याचे जितके ह्मणून जगांत प्रकार असतील तितके सर्व प्रकार योजील; पण त्याला जगांतून केव्हांना केव्हां तरी नाहींसा करील तेव्हां राहील, मग पाहिजे तर त्याच्या करितां रडेल, आरडेल, डोकें फोडील, केंस तोडील अन्न पाणी सोडील, झुरणीस लागलों आहोंत असें ढोंग करून सर्व जगाला दाखवील. यत्किंचित् सुद्धां कमी करणार नाहीं. वाईट मार्गाला लागलेल्या स्त्रियां करणार नाहींत अशी एक देखील गोष्ट या जगांत नाहीं. अवदसे, तूं कोणाबरोबर बोलतेस याचा तुला तरी विचार आहे काय ? (तिला फरफरा ओढून) पहा, नीट डोळे उघडून मजकडे पहा, त्याबरोबर हा माझ्या मानेवरचा काळा डाग पहा, आणि यावरून मी कोण आहे व तूं कोणाशी बोलत आहेस याची तुला ओळख पटते कां ती पहा. (मान पुढें करतो.)

ताई—(त्याच्याकडे न्याहाळून पाहून व ती खूण ओळखून चपापते.) (आपल्याशीं) मी पहातें आहे हें खरें, कीं स्वप्न ? छे, आतां शंका कसली तेच तें. पण हे माझ्या जवळ चाकर काय ह्मणून राहिले ! यांत यांचा हेतू काय बरें असावा !

नारोबा—कां पटली कां ओळख ? आपल्याशीं बोलण्याचा माझा अधिकार आहे कां ?

ताई—(जवळ जाऊन) एवढी ख़ूण दाखविल्यावर मग ओळख कशी बरें पटणार नाहीं ! आपली स्वारी येथें केव्हां आली ? आज सतरा वर्षांत आपल्याला माझी आठवण झाली नाहीं ना ? मीं आपल्या मागें कसे बरें दिवस काढले असतील. आपण माझ्यावर रागावून देशांतरीं निघून गेल्यावर आपल्या रोजच्या स्मरणानें माझी काय बरें स्थिती झाली असेल याचे आपल्याला कांहींच वाटत नाहींना ? तें मेलें मागचें असो. सतरा वर्षांनीं मला पुनः हे पाय दृष्टीस पडले यांतच मी आपणाला भाग्यवान समजतें. आतां हे पाय मी कधीं सुद्धां सोडणार नाहीं. आपण माझ्यावर इतके कां बरें निष्ठुर झालांत. महाराज—ही—दासी—हें—सर्व—(रडूं लागते व त्याला मिठी मारते.)

नारोबा—(आपल्याशीं) सर्वांशीं मीं जे यांच्या स्वभावाचे प्रकार सांगितले, त्यापैकीं हा पहा एक प्रत्यक्ष मासला ! अहाहा, काय हिच्या प्रेमाला व मागच्या सर्व दुःखाला ऊत आला आहे ! हे पहा डोळ्यांतून पाण्याचे सारखे लोट चालले आहेत; मग ते मागच्या दुःखाकरितां आहेत किंवा मी आल्यामुळें यांच्या अबाधित चालणाऱ्या व्यभिचार कर्मांत अडथळा आला ह्मणून होत असलेल्या दुःखाबद्दलचे आहेत, हें एका परमेश्वराखेरीज दुसऱ्या कोणाला कळणार ? चित्रपट दाखविणाऱ्या तमासगीरानें आपल्या चित्रपटाच्या कपाटांतील एकेक पूड उलगडल्यावर जसें प्रत्येक वेळेला नवीन नवीन चित्र दिसतें, तसें हिच्या अंतःकरणाच्या पुडांतील एकेक पूड आपोआप उलगडून हें नवीन नवीन चित्र दिसत आहे. हें एक त्यापैकींच आहे. अशीं हीं चित्रांनीं भरलेलीं पुडें स्त्रियांच्या अंतःकरणांत किती असतात कोण जाणे ! मला वाटतें अनंत असतील. [उघड] खरेंच, माझ्यामुळें तुला दुःख झालें व होत आहे. आतां दोघांच्याही दुःखाचा शेवट झाला असेंच समज.

ताई—अगबाई कोणकोणत्या देशीं तरी आपल्याला हिंडावें लागलें असे-

ल, किती कष्ट भोगावे लागले असतील कोण जाणे! देवा—इकडच्या बद्दल मला कां नाहीं कष्ट भोगायला लावलेंस!

नारोबा—[आपल्याशीं] असुरी माया ह्मणतात ती ही बरें. काय पण वरवर मायेचें जाळें पसरलें आहे. पण मनांतून या चांडाळाचा निःपात कोणत्या रीतिनें करावा हे विचार व बेत चालले असतील. [उघड] पुष्कळ देश हिंडलों. नानातऱ्हेचे कष्ट सोसले, पण अखेरीस परमेश्वरानें शेवट मोठा गोड करण्याचा प्रसंग आणला, यामुळें मला मोठा आनंद होत आहे.

ताई—[रडून] आपल्याला पाहिल्यापासून माझ्या अंतःकरणांत कसे उमाळे येत आहेत, ते आपल्याला मला दाखवितां येत नाहींत.

नारोबा—[उघड] खरेंच अगदीं खरें. [मनाशीं] चांडाळणी, तुझी दुष्ट कृति व तुझें खरें स्वरूप मला समजल्यापासून, माझ्या मनाची काय स्थिती झाली असेल, अथवा मजसारख्या जारिणी स्त्रीच्या दुर्दैवी पतीच्या मनाची कशी होत असेल, याची कल्पना तुला अथवा जारिणी स्त्रियांना कधींच होणार नाहीं. त्यांना आपल्या जाराचें आणि आपलें मात्र मन समजतें. पतीच्या अंतःकरणाची प्रत्येकक्षणीं होणारी स्थिती पतिव्रताच स्त्रिया जाणतात. त्यांनाच आपल्या मनावरून त्यांच्या मनाची स्थिती कळते.

ताई—देशांतरीं जाऊन इतके दिवस आपण वनवास भोगितलेत ते कशाकरितां बरें? आपण दुःखाचे आणि दारिद्र्याचे दिवस जर तसेंच नेटानें कंठिले असते तर या पूर्वींच आपण सुखी झालों नसतों कां? मग परदेशीं जाऊन असें आपण मिळविलें तें काय?

नारोबा—देशांतरीं जाऊन मी एक आपल्याकरितां अमोल्य चीज आणिली आहे. बाजीरावानें, त्रिंबकजीनें अथवा अन्य कोणी आपल्या रूपलावण्याला पाहून त्यांत आणखी भर पडावी ह्मणून जे काय हिरे, मोतीं, व माणिक यांचे अलंकार दिले असतील, ज्या काय उत्तमोत्तम अमोल्य चीजा त्यांनीं आपणाला अर्पण केल्या असतील, आणि त्या आपण ज्या ठिकाणीं ठेविल्या असतील, त्यापेक्षां निराळ्या ठिकाणीं ती माझी चीज आपण ठेविली पाहिजे. ठेवालना पण?

ताई—ह्मणजे काय? आपण काय ह्मणतां हें मला कळत नाहीं. पण आपण मजकरितां इतकीं वर्षें प्रवास करून मोठ्या मेहनतीनें आणलेली चीज मी कशी बरें ठेवणार नाहीं. आपण सांगाल तेथें ठेवीन.

नारोबा—खरें ना पण? नाहीं तर ती वस्तु पाहून आपण मग ती ठेवण्याचें नाकाराल. ती वस्तु तुह्माला दाखविल्यावर मग जरी तुह्मी ती ठेवण्याचें नाकारिलेंत तरी मी ती, तिच्या योग्य जागीं खास ठेवणारच!

ताई—अशी कोणची बरें ती चीज! दाखवावी गडे लवकर! (त्याला झोंबते.)

नारोबा—हो, ती वस्तु आपणास ठेवण्याकरितां देण्यापूर्वी मला आणखी एक गोष्ट आपण कराल, अशी आपल्याकडून कबूली करून घेतली पाहिजे.

ताई—मी आपली दासी आहे, तेव्हां आपण जी मला आज्ञा कराल ती मला मान्य आहे.

नारोबा—तें करणें कांहीं फारसें अवघड नाहीं. एके दिवशीं मोत्याचा कंठा, त्या चिंचपेट्या, ती हिऱ्याची ठुशी व बाजूबंद वगैरे अलंकार अंगावर घालून आपलें रूप आरशांत पाहून जशा आपण त्याबद्दल आपल्याला धन्य मानीत होता, अथवा ज्यांनीं तुह्माला पाहून आपल्या ठिकाणीं धन्य मानिलें, तसें ती चीज आपल्या अंगावर घातलेली मी पाहून धन्यता मानावी अशी माझी मोठी इच्छा आहे. कराल ना पण एवढी आमची पूर्ण? तुमचा भिडस्त स्वभाव आहे, तुह्मी दुसऱ्याच्या जर इच्छा पूर्ण करितां तर माझ्या करितां आपला तो भिडस्त स्वभाव नष्ट होणार नाहीं असें मला वाटतें.

ताई—आपल्याकरितां मी काय वाटेल तें करीन.

नारोबा—आपण तशाच आज्ञाधारक आहांत. बरें तर या अशा इकडे पाहूं! (तिला आरशाजवळ नेतो) या आरशांत आतां आपण कशा दिसतां?

ताई—जसें मनुष्य असेल तसेंच तें आरशांत दिसतें. तेव्हां मी जशी आहे तशीच आरशांत दिसतें.

नारोबा—हें अगदीं खोटें आहे. तुह्मी जशा आहांत तशाच आरशांत दिसत नाहीं. उलटें यांत उलट दिसून हा तुह्माला, मला व सर्व जगाला

फसवीत आहे! मला ही असली फसवणुकीची चीज डोळ्यापुढें असलेली एक क्षणभरही आवडत नाहीं. खोट्याचा मला अत्यंत तिटकारा आहे; खोट्याला व असल्या चीजेला पाहिल्या बरोबर मला असा संताप येतो कीं, त्या लागल्याच जगांतून नाहींशा कराव्याशा वाटतात. याकरितां हा आरसा तसा आहे तेव्हां तो माझ्या डोळ्यासमोर नको. (असें ह्मणून आरसा जोरानें फोडून टाकतो.)

ताई—हें काय आपण केलेंत ?

नारोबा—एक फसवणुकेची चीज नाहींशी केली. दुसरें कांहीं एक केलें नाहीं. आरशांत नाहीं दिसत तर नाहीं दिसत, आपण आपल्या डोळ्यांनींच पाहूं. ती चीज आपल्या अंगावर कशी शोभते ती!

ताई—मघापासून हें काय बरळणें चाललें आहे. काय आहे अशी मोठी मौल्यवान चीज ती मला दाखविलीच पाहिजे. (पुनः त्याच्या अंगाजवळ जाते)

नारोबा—त्या करितां एवढी खटपट नको. ही पाहिलीत. (असें ह्मणून कंबरेचा खंजीर काढतो.) ही आपल्या जवळ माझ्या मनांतून ठेवावयाची आहे.

ताई—(घाबरून) महाराज—मला माफ करा. हें काय आहे. आपण इतक्या वर्षांनंतर प्रवासाहून आलांत, तेव्हां आतां राहिलेलें दिवस आपण सुखांत घालवूं. आपल्याला कशाचीही आतां काळजी करायला नको. आपल्याला राहाण्याकरितां वाडा, हवें तितकें खर्चावयाला द्रव्य, सेवेला दासदासी, नोकरी करण्याची इच्छा असेल तर एखादा मामला, सुभायत, पागा वाटेल तें मिळूं शकेल, किंवा स्वस्थ राजासारखें घरीं बसून चैन करायची असेल तर तेंही सर्व आज देवाच्या दयेनें अनुकूळ आहे. जास्त काय सांगूं. या वाड्यांतील प्रत्येक जिन्नसाचें, येथील भरलेल्या द्रव्याचे, कापडाचे व या देहाचे आपण मालक आहांत. जी आपली इच्छा असेल ती मला सांगा ह्मणजे ती लागलीच पूर्ण होईल. या असल्या स्थितींत राहण्याची व नोकरी करण्याची आपल्याला आतां कांहींएक जरूर नाहीं. आयुष्य काय वारंवार मिळतें. एकदां गेलें ह्मणजे गेलें. कां बरें उगीच—

नारोबा—(मनाशीं) हें यांच्या अंतःकरणांतील दुसऱ्या पुडांतील दुसरें चित्र ! वारे वा ! (उघड) दुष्टे, आपण जारकर्मानें मिळविलेल्या संपत्तीचा उपभोग घेण्याकरितां आपल्या बरोबर मलाही वांटेकरी करून जगानें माझ्याकडे बोट दाखवावें, व " हा अमकीचा नवरा " असें ह्मणून ध्यावें, तुझ्या आणि तुझ्या जाराच्या घरीं कुत्र्यासारखा पडून आपलें आयुष्य काढावें इतका मी निर्लज्ज आहे असें तुला वाटतें काय ? बरोबर आहे, तूं आपल्यावरून जगाची पारख करीत असशील. ह्मणूनच मी ह्मणतों कीं तूं जशी खरोखर आहेस, तशी त्या आरशांत दिसत नव्हतीस. बाईसाहेब, नाहीं. अहो ताईसाहेब, बाजीराव व त्रिंबकजीचें पात्र हस्तक आणखी कोणा कोणाचें असाल कोणास ठाऊक ? आपण ज्या देणग्या मला देऊं केल्यात त्यापैकीं एक देखील घेण्याची माझी इच्छा नाहीं. माझी इच्छा फक्त आपण ही चीज आपल्यापाशीं ठेवावी इतकीच आहे. तुला आणि मला ह्मणजे, नारायण आणि लक्ष्मी यांना राहण्याला हें स्थळ मुळींच योग्य नाहीं. त्यांचें राहण्याचें अक्षय्य सुखाचें स्थान ह्मटलें ह्मणजे वैकुंठ. तेव्हां येथील सर्व अविनाशी वस्तूंचा जातांना आपल्याला त्याग केला पाहिजे. मागें हें पाश नकोत. तेथें आपल्याला काय कमी आहे. याकरितां हें असें केलें पाहिजे. (असें ह्मणून दिवा घेऊन बिछान्याला व कापडाला आग लावतो.)

ताई—(ओरडून) अहो हें काय ? धांवा हो धांवा, कोणी आग आग. (इकडे तिकडे धांवते.)

नारोबा—तूं कितीही जरी ओरडलीस तरी तुझ्या ओरडण्याचा कांहीं एक उपयोग व्हावयाचा नाहीं. अशी धांवतेस कां ? स्वस्थ हो, आणि आपलें वचन पुरें करतेस कीं नाहीं, तें सांग.

ताई—अहो, मला सोडा, मला वांचवा, मला जाऊं द्या. मी आपल्याला वाटेल तें देतें. धांवा, धांवा. वाचवा, आग, खून ! !

नारोबा—आपण ही वस्तु पाहिलीत ह्मणजे ती ठेवण्यास आपण नाकाराल हें मला प्रथमच वाटलें होतें. बरें आपण ठेवीत नाहीं तर मी ठेवतों. (खंजीर सरसावून) ही ठेवण्याकरितां चांगली जागा पाहिजे. व याला

पापी मनुष्याचे हात लागतां कामा नयेत, याकरितां जे हे पापानें विटाळलेलें हात आहेत ते मला आधीं एकीकडे करून ठेवले पाहिजेत, बाजीराव, त्रिंबकजी आणखी कोणी ज्यांच्या गळ्याभोंवतीं जे हे हात पडले ते पापी नव्हेत, नाहीं तर काय? तेव्हां त्यांना प्रथम अलग करतों, ह्मणजे त्यांचा विटाळ त्या वस्तुला होणार नाहीं. [हातावर वार करतो] ही एक गोष्ट झाली.

ताई—अग आई, मेलें, मेलें. अहो मला कोणी सोडवा हो सोडवा. मी त्याला वाटेल तितके द्रव्य देईन. [तरफडते.]

नारोबा—आतां ज्या ठिकाणीं बाजीराव, त्रिंबकजी यांच्या मूर्ती नसतील त्या ठिकाणीं ही वस्तु मला ठेविली पाहिजे; व त्यांच्या मूर्ती जर तेथें असतील तर मला त्यांना तेथून हुसकून लाविल्या पाहिजेत. कारण त्या चांडाळांनीं, त्या अधमांनींच जिकडे तिकडे फार प्रळय केला आहे. अरे चोरांनों, या निर्मळ अंतःकरणासारख्या पवित्र ठिकाणीं तुमची अधमाधमांची मुळीं छायासुद्धां उपयोगी नाहीं! ती देखील एखाद्या विषारी सापाच्या छायेप्रमाणें दुसऱ्याला बाधेल. पण यानें, त्या ठिकाणीं प्रवेश केला कीं तुह्मी तेथें राहतां कशाला. चला निघा येथून—[असें ह्मणून तिच्या उरांत खंजीर खुपसतो.)

ताई—मेलें, मेलें. राम–राम–अखेरीस असा–परिणाम–देवा–नारायणा–

नारोबा—आपल्या पापी जिभेनें त्या पुण्यकारक नामांचा उच्चार करून त्यांना कां उगीच विटाळतेस. दुष्टे, त्या बाजीरावाचें, त्रिंबकजीचें अथवा आणखी जे कोणी तुला प्रिय असतील त्यांचीं नांवें घे. [तिच्याकडे पाहून] तुझ्यासारख्या अवदसेला असाच मृत्यू यायला पाहिजे होता. या कृत्यांत मी परमेश्वराचा कोणत्याही रीतिनें अपराधी नाहीं. त्यांतल्यात्यांत दुष्टे, तूं स्वतां एकटीच व्यभिचारी असतीस तर बरें होतें, पण तूं आपल्या बरोबर किती बिचाऱ्या स्त्रियांचे पातिव्रत्य भंग करण्याला कारण झाली असशील कोण जाणे! त्या दुर्गुणाची घाण तुझ्यापाशींच राहिली नाहीं. ती तूं आपल्या हातानें जास्त फैलावून कित्येकांचा नाश करून आणखीही करशील, ह्मणून अग्नीनें ही जागा जाळून मला ती घाण घालवावी लागली. कुलीन

स्त्रियांनीं या घाणीचा आतां तुह्माला मुळींच उपद्रव होणार नाहीं. पण या घाणीनें बळावलेले ते बाजीराव, त्रिंबकजी वगैरे रोग तुमच्या पाठीस लागले आहेत, ते दवडण्याचा मात्र तुह्मी प्रयत्न करा. तें आतां माझ्या स्वाधीनचें नाहीं, नाहीं तर तेंही काम मीं केलें असतें. पण आतां निदान कांहीं वेळ तरी या घाणीपासून तुह्माला त्रास होणार नाहीं. पुढें या पुण्याचें दैव! काय होईल ते होईल. त्याची काळजी मला कशाला? (इकडे तिकडे पाहून किंचित् आनंद झाल्यासारखे दाखवून) अहाहा—जरी हा आतां चहूंकडे आगीचा डोंबाळा होऊन गेला आहे, व येथील प्रत्येक वस्तुची एका क्षणांत राखरांगोळी होऊन जाईल इतकी आग भडकली आहे, तरी मला त्या आगीपासून अगदीं त्रास होत नाहीं. मी अगदीं थंड जागेंत उभा राहिलों आहे असें मला वाटतें. आपली स्त्री व्यभिचारी आहे अशी आपली पक्की खात्री झाल्यावर अंगांत भडकलेली आग या आगीपेक्षां शतपटीनें कमी आहे. शेकडों विषारी सर्प, विंचू, इंगळ्या यांनीं अत्यंत नाजूक अशा काळीजाच्या ठिकाणीं एकदम दंश केल्यामुळें, अंतःकरणाला होणाऱ्या वेदना आपण एका दुष्ट मार्गाला प्रवृत्त झालेल्या स्त्रीचे पती आहोंत हें समजल्यामुळें होणाऱ्या वेदनापेक्षां सहस्रपटीनें कमी आहेत. भयंकर विषारी सर्पाचें वीष मंत्रानें उतरेल, काळकूटासारख्या जगाला जाळणाऱ्या विषाचा ताप एखाद्या दिव्यौषधीनें देखील शमेल, पण हा ताप शमन व्हायला हेंच औषध पाहिजे. आपली स्त्री कुलवधु असून पण्यांगना बनली आहे, असें समजल्यानें क्रोधानें संतप्त झालेली दृष्टी तिच्या रक्तपाताशिवाय कधींच निवत नाहीं. युगानुयुगें रौरव नरकांत होऊन पडणाऱ्या किड्यांपेक्षां देखील व्यभिचारी स्त्रीचा पती दुर्दैवी होय! हे स्वामि कार्तिकया, सगळ्या देवांत तूंच एक शहाणा खरा. या स्त्रियांच्या अंतःकरणांत काय काय भरलें आहे, हें एक तूंच जाणलेंस. बाकी मोठमोठें देव, मोठमोठे त्रिकालज्ञानी मुनी, यक्ष, गंधर्व, राक्षस, मनुष्य यापैकीं कोणा एकाला सुद्धां त्याची खरी परीक्षा झाली नाहीं. विश्वकर्मा ब्रह्मदेव तर प्रत्येक ठिकाणीं चुकला आहे. त्यानें प्रथम मनुष्य प्राणी निर्माण केला ही त्याची पहिली चूक. मग स्त्री निर्माण केली ही दुसरी चूक. मला निर्माण केलें ही

तिसरी चूक. आणि या जारिणी स्त्रीचा मी पती व्हावे, असें माझ्या कपाळीं लिहिलें ही सर्वांपेक्षां मोठी चूक!! तेव्हां मला ती चूक सुधारली पाहिजे. पण देवा, त्यापूर्वीं मी एक आपल्यापाशीं मागणें मागतों, तेवढें आपण मला कृपा करून द्यावें. तें इतकेंच कीं, माझ्यावेळीं जन्माला घालण्यांत जशी चूक केलीत तशी पुनः करूं नका. त्यांतल्या त्यांत जारिणी स्त्रीचा पती करण्याची तरी चुकी करून मजसारखा आणखी दुर्दैवी प्राणी तरी जगांत निर्माण करूं नका. नाहीं तर त्या बिचाऱ्यालाही मजप्रमाणेंच ती चुकी सुधारून घेण्याचा हा असा दुर्धर आणि असह्य प्रसंग येईल, रामा. (असें ह्मणून खंजीर मारून घेऊन मरतो.)

प्रवेश सातवा.

स्थळ—पंढरपुरांतील पेशव्यांचा वाडा.

पात्रें—त्रिंबकजी आणि गोविंदराव गायकवाड येतात.

त्रिंबकजी—कां गोविंदराव, तुह्माला वचन दिल्याप्रमाणें मी आलों कीं नाहीं. आतां एखाद दुसरा दिवस जास्त लागला, त्याला माझा निरुपाय झाला. कामामुळें मला नेमल्यावेळीं यायला झालें नाहीं. नाहीं तर मी सांगितलेल्या दिवशींच आलों असतों.

गोविंदराव—तुह्मी आल्यामुळें आह्माला दुप्पट हिंमत चढली.

त्रिंबक—मी आधीं कोणाला वचन देत नाहीं; आणि दिलें ह्मणजे त्याप्रमाणें वागण्याला चुकत नाहीं. बरें, तुमची कशी काय तयारी आहे. मंडळी अगदीं हुशार, शूर आणि खात्रीची आहेना?

गोविंद—विश्वासाची. अगदीं जिवाची आहे. त्याविषयीं काळजी नको.

त्रिंबक—बरें तर चला मजबरोबर. कसें, केव्हां, कोठें आणि काय काय करायचें तें मी तुह्माला सर्व दाखवितों.

गोविंद—चला, मी एका पायावर तयार आहे.

(दोघे जातात.)

प्रवेश आठवा.

स्थळ—पंढरपुर येथील गंगाधर शास्त्र्याचें राहण्याचें ठिकाण.

पात्रें—गंगाधरशास्त्री गादीवर विचार करीत पडले आहेत.

गंगाधर—(आपल्याशीं) छे, आजचें श्रीमंतांच्या घरचें जेवण अतिशय आग्रहाचें झालें. जेवणांत अत्याग्रह झाल्यामुळें चैन पडत नाहीं. हु:श. हु:शः उकडतें तरी किती ! तो लेकाचा गुणाजी हुजऱ्या मोठा चाणाक्ष, हुशार, चलाख आणि मोठा घोरणी होता. त्याला कोणतेंही काम फारसें सांगावें लागत नसे. घोरणानें तेव्हांच तो ताडून करित असे. पुण्याहून निघण्याचें पूर्वीं एक दोन दिवस त्याचा पत्ता लागला नाहीं ! कोणीकडे लेकाचा गेला कोणाला ठाऊक. येथें आलों, कामाचें नांव काढलें कीं, श्रीमंत बाजीरावसाहेब पेशव्याचा, हो आतां करतों, उद्यां करतों, विचार चालला आहे, वगैरे पूर्वीं-चा धडा आहे तोच आहे. बाजीरावाच्या बोलण्यांत जितकी गोडी आहे, व जितकें आगत्य दिसतें, तितका जर त्याच्या बोलण्यांत खरेपणा, आणि बोल-ण्याप्रमाणें वागण्यांत नियमितपणा असता तर किती नामी गोष्ट झाली अ-सती. पण त्यापैकीं एकही गोष्ट त्यांच्या अंगीं नसल्यानें सर्व गोष्टींचा नास होत आहे, पण पुण्यास गेल्यावर अगोदर कामाचा निकाल करून घ्यायचा, दुसरी गोष्ट नाहीं. आतां त्यांचे ते वायदे मुळींच ऐकायचे नाहींत.

(इतक्यांत एक हुजऱ्या येतो.)

हुजऱ्या—श्रीमंतांची स्वारी देवदर्शनास निघण्याची तयारी आहे, व आपणास त्यांनीं बरोबर चलण्याकरितां बोलाविलें आहे.

गंगाधर—जा, माझ्यातर्फें श्रीमंतांस अशी विनंति कर कीं, माझी तब्येत नीट नाहीं, त्यामुळें मला येववत नाहीं, याबद्दल माफी असावी.

हुजऱ्या—जी आज्ञा. (तो जातो.)

(इतक्यांत दुसरा हुजऱ्या येतो.)

दु. हु.—(हात जोडून) श्रीमंतांनीं पोषाख केला. आपल्याला ताबडतोब दर्शनास चलण्याकरितां बोलाविलें आहे.

गंगाधर—जा बाबा, त्यांना सांग कीं माझें डोकें अतिशय दुखतें आहे. माझ्यानें आज येववत नाहीं. मी उद्यां येईन.

दु. हु.—जी हुकूम. (मुजरा करून जातो.)

[इतक्यांत तिसरा हुजऱ्या येतो.]

ति. हु.—स्वारी दाराशीं येऊन आपली वाट पहात उभी आहे. लवकर चलावें.

गंगाधर—अरे, मला मळमळतें आहे, माझें डोकें चढलें आहे. माझ्यानें आज मुळींच येववत नाहीं. जा सांग असें !

ति. हु—जी हुकूम सरकारचा ! [तो जातो.]

[इतक्यांत त्रिंबकजी येतो.]

त्रिंबक—[मनाशीं] मृत्यूच्या घरीं कोणी आपल्या पायानें आणि सुखासमाधानें थोडाच जातो. त्याला ओढूनच न्यावें लागतें. [उघड] तात्यासाहेब, तात्यासाहेब, चला चला, लौकर. श्रीमंतांची स्वारी आपल्याकरितां बाहेर येऊन दाराशीं वाट पहात उभी राहिली आहे. लवकर आपण चलला नाहीं, तर स्वारी स्वतां येईल. हंः चला आटपा.

गंगाधर—अहो माझी प्रकृती चांगली नाहीं, माझ्यानें येववत नाहीं. डोकें चढलें आहे, पोटांत ढवळत आहे, जीव घाबरत आहे, ह्मणून ह्मणतों. मी उद्यां खास येईन.

त्रिंबक—देवदर्शनानें, आणि बाहेर जरा फिरून आल्यानें सर्व नीट होईल. उठा, उठा.. श्रीमंत खोळंबले आहेत. (हुजऱ्याकडे पाहून) अंगरखा पागोटें आण लौकर. तोंड पहात काय उभा राहिला आहेस ? [अंगरखा पागोटें देतो.]

गंगाधर—तुह्मी तर शर्थ केलीत बोवा. बरें बोवा, चलारे तयार व्हा.

त्रिंबक—करायची काय मंडळी बरोबर. एखादें माणूस असूंद्या.

[दोघे जातात.]

प्रवेश नववा.

स्थळ—पंढरपुरांतील विठोबाचें देऊळ.

पात्रें—भजनी मंडळीचा मेळा उभा राहिला आहे, भजन कडाक्यानें चाललें आहे. अशा वेळेला त्रिंबकजी, गोविंदराव आणि साथीदार मारेकरी मंडळी येतात.

त्रिंबकजी—गोविंदराव, विठोबाचें दर्शन करून प्रदक्षिणा घालून मंडळी अशी यायला लागली ह्मणजे महाद्वाराबाहेरच करा काम ! मी तुमच्या जवळपासच आहे. तुमच्या मंडळीला अगदीं तयारीनें उभें राहण्यास सांगा. श्रीमंतांची स्वारी पुढें गेली कीं, प्रथम मशालजी उडवा. मग त्याचा तो कारकून आणि नंतर ज्यानें टोपीवाल्या रेसिडेन्टाच्या हिमायतीवर गायकवाडींत अनर्थ उसळून दिला, सीतारामपंतासारख्या हुशार अशा माजी दिवाणाला कैदेंत टाकिलें, तुमच्यासारख्या राजघराण्यांतील पुरुषाला ज्यानें देशोधडी लावून नीच हुजऱ्याची चाकरी देखील करण्याचा प्रसंग आणला, गहिनाबाई, तख्ताबाई वगैरे राण्यांस सुद्धां ज्यानें छळण्यास कमी केलें नाहीं; त्या या तुमच्या पुरातन वैऱ्याचा सूड कसा घ्यावा, व फार दिवसाचा हेतु सिद्धीस नेवून गायकवाडी मंडळीला त्याच्या त्रासांतून कसें मुक्त करावें, हें निदान गोविंदराव गायकवाडास तरी सांगायला नको. यावेळीं फसलें कीं पुढच्याविषयीं जबाबदार मात्र मी नाहीं, माझी कामगिरी संपली.

गोविंद—हा शास्त्री येथून आतां जिवंत कसचा जातो. त्याला काळानें घेरलेंच आहे.

त्रिंबक—हंः तयार रहा. ती पहा मंडळी आली, तरवारी उपसून ठेवा, मीही आपली तरवार प्रसंग पडल्यास तिचा उपयोग करण्याकरितां अगदीं साफ पुसून ठेवतों.

[बाजीराव व गंगाधर शास्त्री दर्शन करून येतात, इतक्यांत गोविंदराव व त्रिंबकजी मारेकऱ्यास इशारा करतात, ते मशाली विजवितात, व गंगाधर शास्त्र्यावर हल्ला करून त्याला ठार

मारतात. पडद्यांत खून. खून, ह्मणून ओरड होते.
इतक्यांत बापू मैराळ आपल्या लोकांसह
तरवार उपसून येतो. गोविंदरावास व
मारेकऱ्यांस कैद करतात.

बापू—खून, खून, अरे पहातां काय, येथें दगा आहे. सर्व मंडळीस कैद करा. एक मनुष्य जाऊं देऊं नका. आणखी मशाली आणा. धांवा. अरे देवा हें काय येथें पडलें आहे. [मशाल पुढें करून] अरे हा आपला सोनोपंत, हा मशालजी आणि हे, हाय हाय! घात, घात, हे आपले तात्यासाहेब! नशीब. [दुःखानें] हें पत्र माझ्या हातीं लागल्यापासून कांहीं तरी खास दगा आहे; असें मला वाटलें होतें तेंच अखेरीस खरें झालें. मी ताबडतोब निघालों, मध्यें कोठें विसांवा घेतला नाहीं कांहीं नाहीं, पण तें सर्व व्यर्थ गेलें. किंचित् अगोदर आलों असतों, तर किती बरें झालें असतें, पण तें होणार कोठून! होणार भवितव्यता कांहीं चुकत नाहीं. हाय, हाय, गायकवाडींतील आज एक अमोल्य रत्न हारपलें. कर्ता पुरुष नाहींसा झाला. शहाणा, चतुर आणि स्वामीभक्त असा एक मुत्सद्धी [त्रिंबकजीकडे व गोविंदरावाकडे पाहून] या अधमाधमांच्या, ब्रह्मद्वेष्ट्यांच्या भयंकर कारस्थानाला व्यर्थ व्यर्थ बळी पडला. [चाकराकडे पाहून] अरे पाहतां काय, या मांगाच्या मुसक्या बांधून चला घेऊन? अरे चोरा दरोडेखोरा त्रिंबकजी, तुझें तुझेंच आणि त्या तुझ्या ब्रह्मकुळांत जन्म घेऊन त्याला काळिमा आणणाऱ्या त्या मांग हृदयी बाजीरावाचेंच हें कृत्य, यांत बिलकूल शंका नाहीं. गोविंदराव, गायकवाड्यांच्या कुळांत जन्म घेऊन फार चांगलें मारेकऱ्याचें काम केलेंत!

त्रिंबक—गायकवाडींतल्या मनुष्यांना लोकांचे गळे कापण्याची संवयच पडून गेली आहे. त्याबद्दल त्यांना हें असेंच शासन पाहिजे. [त्याला जाऊन वार करतो.]

बापू—अरे हाही पक्का मांग मारेकरीच आहे, पकडा याला पहातां काय
[इतक्यांत पार्वतीबाई आणि भिमा घाईघाईनें येतात.]

गोविंद—मेलों, मेलों.—

पार्वती—(बापू मैराळास कवटाळून) महाराज, मला त्या मेल्या त्रिंबकजीपासून सोडवा. (त्रिंबकजीकडे पाहून) अग आई हा मेला चांडाळ, स्त्रियांचें पातिव्रत्य भंग करणारा, सुशील आणि पतिव्रता स्त्रियांच्यामागें लागलेला काळ येथेंही आहे काय ? अहो मला याच्या पासून वाचवा हो वाचवा. आणि हें काय येथें रक्ताचें पाट ! ! (प्रेतें पाहून तिला मूर्च्छा येते.)

(शिपाई त्रिंबकजीस धरूं लागतात.)

त्रिंबक—(त्यापैकीं एकास जखमी करून निसटून निघून जातो) अरे तुझ्यासारख्या भोंकणाऱ्या कुत्र्याकडून माझें काय व्हावयाचें आहे. हा नांवाचा त्रिंबकजी आहे समजलास. (तो जातो.)

बापू—धरा, धरा, धांवा त्याच्यामागें. बरें आहे, दरोडखोरा तूं आतां माझ्या हातून निसटून गेला आहेस, पण तुला जर टोपीवाल्याकडून बांधून आणवीना तर मी नांवाचा बापू मैराळच नव्हे. तात्यासाहेबांच्या जिवाचे टोपीवाले जामीनदार आहेत. (बाई, तुझी हिला जरा पलिकडे न्या. हा सर्व प्रकार पाहून हिला मूर्च्छा आली आहे.) (विठोबाकडे पाहून) देवा, पंढरीनाथा, या तुझ्या समोर प्रत्यक्ष होत असलेल्या ब्रह्महत्या तुला आवडतातना? देवा तूं बौध्यरूप धारण केलें आहेस, आणि डोळे मिटले आहेस, ह्मणूनच तुझ्या समोर अशीं भयंकर कृत्यें होत आहेत ! पंढरीनाथा, डोळे मिटून तूं स्वस्थ आणखी किती युगें बसणार ? हे ब्राह्मणाधमा बाजीरावा, ब्रह्मघातकी व बंधुपुत्र घातकी राघोबादादाच्या व आनंदीबाईच्या पोटीं येऊन त्यांच्या-प्रमाणें तूंही आपल्या जन्माचें सार्थक केलेंस ! त्यांचें ब्रह्महत्येचें व्रत तूं उत्तम रीतिनें पुढें चालविलेंस. या तुझ्या नीच कृत्यानें तूं आपल्या वडिलाची, मातोश्रीची आणि आपली कीर्ति अजरामर करून ठेवलीस. ज्या ज्या ठिकाणीं महाराष्ट्र राज्याचें, महाराष्ट्र मंडळीचें व पेशव्यांच्या गादीवर बसलेल्या पुरुषांचें नांव जेव्हां जेव्हां निघेल, तेव्हां तेव्हां तुझी आणि तुझ्या आईबापांची : महाराष्ट्रांतील सध्यां जिवंत असलेल्या व पुढें होणाऱ्या सर्व आबालवृद्धांस : कित्येक शतकें आठवण झाल्याशिवाय व तूं आपल्या खऱ्या आईबापाचा खरा पुत्र आहेस याचें स्मरण झाल्याशिवाय व त्यांच्या डोळ्यांतून प्रत्येक क्षणोक्षणीं

महाराष्ट्राच्या दुर्दैवाबद्दल पाणी गळल्याशिवाय कधीं राहणार नाहीं! बाळाजी पंत, ज्या आपल्या उत्तम कुलखानींत बाजीराव, चिमणाजी आप्पा, नानासाहेब, भाऊसाहेब, माधवरावसाहेब, नारायणरावसाहेब, सवाई माधवरावसाहेब, असे एकापेक्षां एक तेजःपूंज हिरे, निर्माण झाले, त्याच कुलांत राघोबादादा सारख्या व बाजीरावासारख्या गारगोट्या पुढें निर्माण होतील असें आपल्याला कधीं तरी वाटलें असेल काय? बाजीराव, चिमणाजी आप्पा, भाऊ साहेब, माधवराव असे रणधुरंधर पुरुष, ज्यांनीं पेशव्यांच्या गादीवर बसून आपल्या पराक्रमानें महाराष्ट्राचें नांव सर्व हिंदुस्थानभर दुमदुमून सोडलें व काबूल कंदाहारपर्यंत आपला दरारा बसविला; त्याच पेशव्यांच्या गादीवर हा असला दिग्विजयी, ब्रह्मघातकी व विजवटा पुतळा बसून सर्व राष्ट्र व नांव बुडविण्यास कारण होईल असें तुह्माला कधीं तरी वाटलें असेल काय? बाजीरावासारखे ब्रह्मघातकी, विषयी, भित्रे, मूर्ख व दीर्घद्वेषी राजे गादीवर बसल्यावर, व त्रिंबकजी, चिमणाजी, राघोबा असे शागीर्द, हुजरे, आचारी लोकांचें मंत्री मंडळाचें त्यास सहाय्य मिळाल्यावर तेथील राज्यकारभार किती सुरळीत चालत असेल, तेथील प्रजेला दिवसा ढवळ्या घाशीरामी चालविणाऱ्या चांडाळ, दुष्ट व घातकी लोकांकडून किती त्रास पोंहचत असेल, त्यांच्या वित्ताचें व प्राणांचें रक्षण कसें काय होत असेल, व गरीब रयतेची दाद लागून तिला न्याय कितपत मिळत असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. ज्या देशांत बाजीरावासारखे राजे व त्रिंबकजीसारखे त्यांचें मंत्री निर्माण होतात, त्या देशांतील पूर्वीच्या राजांची पूर्व पुण्याई, तेथील प्रजेचें पूर्व संचित, पुण्य व सुदैव संपलें, असेंच ह्मटलें पाहिजे. राज्याधिकाऱ्यांची नीति सुटली व एखाद्या राष्ट्रांतील लोकांच्या मनाची प्रवृत्ति अनीतीच्या मार्गाकडे वळली, आणि त्यांना ती आवडूं लागली, ह्मणजेच अशा गोष्टी घडून येतात व त्रिंबकजी, गोविंदराव वगैरें सारखीं नीच मनुष्यें नीच कृत्यानें पुढें येऊन सर्व राष्ट्राच्या नाशास कारण होतात! राष्ट्रांतील लोकसमुदायांचें व त्याबरोबर राजाचें एकनीतितत्व व धर्मतत्व सुटलें ह्मणजे राज्याला उतरती कळा लागलीच ह्मणून समजावें! हाय, हाय! महाराष्ट्रांचा

काळ फिरला, लोकांची भलत्या मार्गाकडे प्रवृत्ती होत चालली, त्यामुळें महाराष्ट्रांतील वैभव, बुद्धिचातुर्य, मुत्सद्दीपणा, शौर्य वगैरे महाराष्ट्रांतील प्रत्येक चांगल्या गोष्टींच्या अस्तकालास आतां आरंभ झाला; देवा या गोष्टी घडून याव्या व आमचें महाराष्ट्रांचें सर्व महत्व नष्ट व्हावें, असें तुझ्याच मनांत आहे असें दिसतें; त्याशिवाय असें कसें होईल ? हा अस्तकाल आतां केव्हां संपेल तो संपो ! हाय, हाय. महाराष्ट्राचें दुर्दैवच या रावबाजीच्या रूपानें उदयाला आलें दुसरें काय ? दुर्दैव दुर्दैव ! सर्व राष्ट्राचेंच दुर्दैव होय ! ! !

समाप्त.

जाहिरात.

कादंबरीसंग्रह

(ऐतिहासिक पुस्तकमाला.)

कल्पनातीत व श्रृंगार परिप्लुत कादंबऱ्यादि पुस्तकें वाचण्याची अभिरुचि लोकांस अधिक लागल्यामुळें आपल्या पूर्वजांच्या अभिमानार्ह चरित्राच्या, त्यांच्या सर्वमान्य कृतीच्या त्यांच्या स्वाभिमानाच्या, व त्यांच्या मुत्सद्दीपणाच्या हकिगतीकडे कोणाचें लक्ष लागत नाहीं; तें लागावें; व विद्यमान पिढीला गतपिढीची ओळख पटावी ह्मणून " कादंबरी संग्रहा " च्याद्वारें आह्मीं ऐतिहासिक कादंबऱ्या, नाटकें, प्रसंग, चरित्रें व गोष्टी प्रसिद्ध करीत असतों, हे आज नऊ वर्षांच्या अनुभवावरून आमच्या प्रिय वाचकांस अवगत आहेच. यांतून आजपर्यंत जीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं तीं खालीं लिहिल्याप्रमाणें—

१ माधवराज्यारोहण ८१०. २ धर्माजीरावचे कुटुंब १. ३ महाराष्ट्रवीर ८१०. ४ ताराबाई ८६. ५ मराठ्यांच्या वैभवाचा शेवटचा पडदा ८६. ६ महाराणा राजसिंह ८९. ७ सटवाई ८६. ८ पृथ्वीराज संयोगीता ८१२. ९ पितृबंधमोचन भाग पहिला ८१२. १० माधवनिधन ८१०. ११ रावबाजी ८१०. १२ छोटी भेट८२. १३ फाळके यांच्या घराण्यांची कैफियत (सचित्र) ८१०. येणेंप्रमाणें आजपर्यंत पुस्तकें प्रसिद्ध झाली असून यांपैकीं दोन तीन पुस्तकांस दक्षिणाप्राईझ कमेटीकडून बक्षिसें मिळालीं आहेत. एकाचें गुजराथी वगैरेमध्यें भाषांतर झालें आहे. कित्येकांस राजाश्रय मिळाला असून कांहींवर सुंदर अभिप्राय आले आहेत.

यापुढेंही अशाच तऱ्हेच्या ऐतिहासिक विषयावर या पुस्तकमालेंतून अनेक ग्रंथ प्रकाशित करण्याचा संकल्प असून, त्यापैकीं " नूरजहान " ही कादंबरी तूर्त सुरू आहे. तरी अशा ऐतिहासिक पुस्तकमालेस, सर्व महाराष्ट्रीय देशबांधवाकडून उदार आश्रय मिळेल अशी उमेद आहे.

पांडुरंग बळवंत देसाल.

